पाक्षिक

समाज आणि राष्ट्राच्या नवरचनेसाठी


www.peoplespost.in

# द पीपल्स पोस्ट

स्थापना : २९ ऑगस्ट २०१८ । वर्ष : ४ । अंक ४ था । मूल्य : रु. ३० । दिनांक : १ ते १५ ऑक्टोबर २०२१

## भ्रष्टाचारात बरबटलेला

# श्रीमंतांचा स्वर्ग




**INSIDE**

हवा दिल्लीची: राजकीय पक्षांसाठी आव्हान उत्तर प्रदेशाचे

हवामान अरिष्ट, महामारी निवारणार्थ गांधीमार्ग...

सामाजिक अत्याचार रोखण्यासाठी...

# वाचकांची पत्रे

## विद्यार्थ्यांना संपवणाऱ्या स्पर्धा परीक्षा कशासाठी?

१६ ते ३० सप्टेंबरच्या अंकातील संपादकीय 'स्पर्धा परीक्षा कुणासाठी?' हा प्रश्न उपस्थित करणारे आहे. 'नीट' परीक्षेतील अपयशाला कंटाळून तामिळनाडूतील विद्यार्थ्यांनं केलेल्या आत्महत्येच्या पार्श्वभूमीवर त्या राज्य सरकारने नीट परीक्षा रद्द करण्याचा निर्णय घेतला. या अनुषंगाने लिहिलेलं हे संपादकीय भांडवलशाही व्यवस्थेचे धिंडवडे काढणारे आहे. स्पर्धा कोणतीही असो, ती समाजात सौहार्द निर्माण करणारी असावी. स्पर्धा परीक्षा ही विद्यार्थ्यांना प्रेरणादायी ठरणारी असावी. पण आज स्पर्धा परीक्षांचं भूत विद्यार्थ्यांच्या मानगुटीवर बसून त्यांना छळताना दिसतेय. विद्यार्थ्यांना संपवणाऱ्या अशा स्पर्धा परीक्षा कशासाठी घ्यायच्या, असा माझा प्रश्न आहे.

- **विजय पाटील**, नाशिक

## मालमत्ता चलनीकरण योजना देशाच्या मुळावर

'देश भांडवलदारांच्या दावणीला बांधला जातोय का?' हा लेख लिहून भास्कर नाशिककर यांनी मालमत्ता चलनीकरण योजनेवरील चर्चा सुरू केलीय; पण या योजनेच्या अंमलबजावणीचे सूत्र लक्षात घेता ही योजना देशाच्या मुळावर येणारी आहे, असे वाटते. सरकारी मालमत्ता खाजगी कंपन्यांच्या घशात घालण्याऐवजी त्या नफ्यात आणण्याचे प्रयत्न सरकारने करायला हवे होते. केवळ तोट्यातीलच नाही तर रेल्वेसारख्या सार्वजनिक वाहतूक व्यवस्थाही भांडवलदारांच्या हातात देण्याचा डाव सरकार आखत आहे, हे अतिशय चुकीचे आहे.

- **शरण प्रधान**, विनायक कांदे, पुणे



## गांधींना कमी लेखणारे संपले

'गांधीजी आजही 'जिवंत' आहेत, चर्चिलचे काय?' हा प्रा. रोहिदास जाधव यांचा लेख अतिशय अभ्यासपूर्ण होता. गांधीजी आणि चर्चिल यांच्यातील संबंध अधोरेखित करणारा हा लेख होता. देशाला इंग्रज राजवटीपासून मुक्त करण्याचा चंग बांधलेले गांधीजी आणि दुसरीकडे, भारतावर वर्षानुवर्षे अधिराज्य आमचेच राहील अशी भावना बाळगून असलेले चर्चिल, यात वास्तवात जगणारे गांधीजी होते. त्यांचा दुस्वास करणाऱ्या चर्चिल यांना आयुष्याच्या अखेरीस का होईना, गांधीजींच्या चांगुलपणाची उपरती झाली. आयुष्यभर गांधीजींना कमी लेखण्याची चूक करणारे चर्चिल आज कुठेच नाहीत.

- **वंदना नाईक**, सांगली

## सामाजिक परिवर्तनाला पुढे नेणारी घटना

पौरोहित्यासाठी ब्राह्मणेतर समाजातील तरूणांना नियुक्ती आदेश देऊन तामिळनाडूचे मुख्यमंत्री स्टॅलिन यांनी जे सांस्कृतिक परिवर्तन सुरू केले आहे, ही देशाच्या सामाजिक परिवर्तनाला आणखी पुढे नेणारी गोष्ट आहे, असे मला वाटते. 'द्रविड चळवळ : सांस्कृतिक बदलाचा महामार्ग' हा लेख लिहून भीमराव सरवदे यांनी या सांस्कृतिक बदलाची जी दखल घेतली, ती कौतुकास्पद आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी ८५ वर्षांपूर्वी पौरोहित्यासाठी कायद्याची गरज व्यक्त केली होती. त्याची पूर्तता आता दक्षिणेतून होताना दिसते आहे.

- **प्रकाश वाघमारे**, माणिकराव जाधव, अमरावती



## प्रसिद्धीचा एवढा सोस कशासाठी?

'कोरोनाकाळात सरकारच्या प्रसिद्धीवर खर्चले २१२ कोटी' हा प्रकाश खंडेलोटे यांचा लेख वाचून सरकारला प्रसिद्धीचा एवढा सोस कशासाठी, असा प्रश्न आम्हाला पडला. कोरोनाकाळात गरिबांना दिलासा देणाऱ्या आरोग्य योजनेच्या प्रचारासाठी पैसा खर्च केला असता तर अनेक गरिबांचे प्राण वाचले असते. जनतेचा पैसा सरकारच्या प्रसिद्धीवर खर्च करण्याचा सरकारला काहीही अधिकार नाही.

- **संजय गायकवाड**, उत्तम गायकवाड, नागपूर

**संपादक**
चेतन शिंदे

**मांडणी व सजावट**
गायत्री ग्राफिक्स्, नाशिक

**मुखपृष्ठ**
सचिन ओव्हाळ

**संपादकीय पत्रव्यवहार**
११, तळमजला, बी ब्लॉक,
लक्ष्मी निवास, जे. के. सावंत मार्ग
यशवंत नाट्यमंदिरासमोर, माहिम (प.)
मुंबई ४०००१६

**संपर्क**
८८८८५४१८२२
९५८८४५११५१

E mail : thepeoplespost2014@gmal.com
(या अंकातील सर्व लेखांचे हक्क सुरक्षित)
* अंकात व्यक्त झालेल्या लेखकांच्या मतांशी संपादक सहमत असलेच असे नाही.

द पीपल्स पोस्ट
8888541822

**• जाहिरात विभाग संपर्क**
९८२१४४५४०९ / ८८०५१५१४५२

**• वर्गणीदारांसाठी संपर्क**

**महाराष्ट्र / मुंबई :**
गजानन आठवले : 9076065215
विदर्भ : आंकुश वाकडे : 9421424242
मराठवाडा : सचिन : 7350091569
कोकण : संकेत तांबे : 7738784132

वर्गणीचा धनादेश, धनाकर्ष
द पीपल्स पोस्ट या नावाने काढावा

पाक्षिक
समाज आणि राष्ट्राच्या नवरचनेसाठी
# द पीपल्स पोस्ट

स्थापना : २९ ऑगस्ट २०१८ । वर्ष : ४ ।
अंक ४ था । मूल्य : रु. ३० । दिनांक : १ ते १५ ऑक्टोबर २०२१

संपादकीय ४

हवा दिल्लीची : राजकीय पक्षांसाठी आव्हान उत्तर प्रदेशाचे
– विजय नाईक ६

हवामान अरिष्ट, महामारी निवारणार्थ गांधीमार्ग...
– प्रा. एच. एम. देसरडा १०

बॅड बँक : बुडित कर्जे व डळमळत्या अर्थव्यवस्थेवर रामबाण ?
– श्रीनिवास खांदेवाले १२

सामाजिक अत्याचार रोखण्यासाठी...
– डॉ. गौतम कांबळे १५

धर्मांतरविरोधी कोल्हेकुई निष्प्रभ ठरवत धम्मक्रांती
– डॉ. रोहिदास जाधव १८

धर्म एक चक्रव्यूह : ईहवादी धर्म घेत असतात माणसाचा शोध
– बी. जी. वाघ २१

दुसऱ्या पिढीतील दोन दलित लेखक
– डॉ. सूर्यनारायण रणसुभे २५

चैतन्य हरवलेली नेतृत्वहीन काँग्रेस
– भास्कर नाशिककर २८

व्यक्तिविशेष : बहुआयामी व्यक्तिमत्व – योगिराज वाघमारे
– पंडित कांबळे ३१

ग्रंथ परिचय : उत्तुंग व्यक्तिमत्त्वाचा लालित्यपूर्ण
आलेख: भावलेली माणसं – प्रा. डॉ. शंकर विभुते ३३

आज–कालचे प्रश्न ३५

कविता : याच दिवसांत – सायमन मार्टिन,
कविता काय असते ? प्रा. शिवाजी वाठोरे ३८

कोण काय बोलतं ३९

हे पाक्षिक, मालक, मुद्रक, प्रकाशक धम्मपाल भीमराव शिंदे यांनी मेत्ता प्रिंटर्स सीटीएस नं. १४४ मिल कॉर्नर, छावणी रोड, बारापुल्ला गेटजवळ, औरंगाबाद ४३१००१ येथे छापून फ्लॅट नंबर ए-४०३, जीएन नं. १०/२, ग्लोरियासिटी, एमएसईबी पावर हाऊसजवळ पडेगाव, औरंगाबाद ४३१००१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. * संपादक चेतन भीमराव शिंदे (पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी यांची राहील) सर्व वादविवाद औरंगाबाद जिल्हा न्यायालयीन कक्षेत. प्रकाशित झालेल्या लेखकांच्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही क्र. MAHMAR/2018/76460

संपादकीय

# भ्रष्टाचारात बरबटलेला श्रीमंतांचा स्वर्ग

जगातील अनेक श्रीमंत लोक आपली संपत्ती अवैधरित्या लपवून ठेवण्यासाठी खास अशा स्वर्गाची निर्मिती करत असतात. भांडवलशाही पैशाच्या जोरावर काहीही करू शकते. गोरगरिबांचा आवाज दडपण्यापासून ते प्रतिकृती निर्माण करण्यापर्यंत काहीही तिला शक्य असतं. आपण वैध किंवा अवैध मार्गानं जमवलेली माया सुरक्षित असावी, तिच्यामागचं रहस्य कुणालाही कळू नये यासाठी ती खूप सावध असते. स्वित्झरलँडमध्ये जमिनीखाली गुप्त बँका तयार करण्यापासून ते गुप्त कागदपत्रे ठेवण्यासाठी अशीच सुरक्षित जागा शोधत असतात. बर्म्युडा या देशात अशाच गुप्त कागदपत्रांना खूप महत्त्व असतं, अगदी स्वर्गासारखं. म्हणून याला पॅराडाईज पेपरही म्हणतात. स्वर्गाची कल्पना बदनाम करणारीही कल्पना असते. भ्रष्टाचारात बरबटलेली किंवा आपण जे काही करतो आहोत ते जगाला कळू नये यासाठी तयार केलेली ही व्यवस्था असते. हा स्वर्ग सगळ्यांनाच काही मिळत नाही. तो मिळतो धनिक, राजकारणी, मोठे कलावंत, कंपन्या आणि खोऱ्यानं पैसा मिळवणारे खेळाडू यांना. एरव्ही समाजात उजळ माथ्यानं फिरणारे, प्रसिद्धीच्या झगमगाटात असणारे लोक यांची एक काळी बाजूही असते, हे या स्वर्गातील कागदपत्रांवरून कळत असतं. जगातल्या साडेसहाशेहून अधिक पत्रकारांनी (त्यात भारतीय नाही) इंटरनॅशनल कन्सोर्टियम ऑफ इन्व्हेस्टिगेशन जरनॅलिस्टमार्फत ही स्वर्ग तपासणीची मोहीम हाती घेण्यात आली. एक-दोन नव्हे तर सुमारे दीड कोटी कागदपत्रांची तपासणी करण्यात आली. शंभर उद्योग समूहासंदर्भातील ही कागदपत्रे आहेत. त्यांची पाने होतात दीड लाख. त्यातील मजकूर संगणकाच्या भाषेत सांगायचा झाला तर चौदाशे गिगाबाईट. ६७ देशांतील पत्रकारांनी भाग घेतलेल्या या मोहिमेत स्वर्गाचे एक अक्राळविक्राळ, भ्रष्ट, चिखल आणि दलदलीने माखलेलं स्वरूप बाहेर आलं आहे. यात भारतातील अनिल अंबानी आणि क्रिकेटचा देव सचिन तेंडूलकर यांचीही नाव आलं आहे. पाकिस्तान, अमेरिका, युरोपमधील अनेक नेते, नोकरशहा, सेलिब्रेटी यात आहेत. पत्रकारांनी शोधून काढलेली माहिति सर्वप्रथम नाकारली जाते. चुकून काही माहितीचा तपास होतो. बाकी अलबेल चालते.

कर चुकवणारे, संपत्तीचा हिशेब चुकीचा देणारे, संपत्ती व्यक्त न करणारे धनदांडगे यांचा गट तयार होतो. तो चालवणारी व्यवस्था वेगवेगळ्या नावानं तयार करते. वर्षानुवर्षे हा व्यवसाय चालतो. साध्या भाषेत सांगायचं झालं, तर अवैध मार्गानं पैसा सुरक्षित ठेवण्याचा हा व्यवसाय. यापूर्वी फिनलेस फाईल्स, पॅरॉडाइज पेपर, पनामा पेपर, लक्सलिक आणि आता पॅन्डोरा पेपर या नावानं या गुप्त भानगडी उजेडात आल्या आहेत. पूर्वी अशा प्रकरणातील खूप कमी लोकांची नोंद त्या त्या देशातील न्यायालयानं घेतली. अपवादात्मक नेत्यांना शिक्षाही झाल्या. पाकचे पंतप्रधान नवाज शरिफ त्यापैकी एक. बाकीचे आपल्या कागदपत्रांइतकेच सुरक्षित आहेत, उजळ माथ्यानं जगत आहेत. गुंतवणुकीवर कमीत कमी कर किंवा करमुक्त आहे अशा ठिकाणी माया घेऊन जाणे म्हणजे टॅक्स हॅवन्स असतो. जागतिकीकरण आणि खाजगीकरणात अनेक देशांनी आपल्या देशात भांडवलदारांना वळवण्यासाठी टॅक्स हॉलिडे म्हणजे कराला सुट्टी अशा योजना आखल्या होत्या. थोड्या वेगवेगळ्या स्वरूपात, पण मर्यादित धनिकांसाठी स्वर्गासारख्या योजना आखल्या जातात. आपल्या देशातील संपत्ती, कर न भरलेली संपत्ती, दडवलेली संपत्ती अनेकजण या स्वर्गात नेतात किंवा त्याबाबतची कागदपत्रे तेथे ठेवतात. कर बुडवणे म्हणजे देश आणि समाजाशी गद्दारी करणेच असते.



करबुडव्यांच्या किंवा ऑफशेअर वित्तीय प्रकरणात शेकडो राजकीय नेते, कंपन्या, सेलिब्रिटिज् अडकले आहेत. इंग्लंडची राणी, डोनाल्ड ट्रम्प यांचे वाणिज्य सचिव, कॅनडाचे पंतप्रधान जस्टिन टुडो



यांचे सहकारी, ब्रिटनच्या हुजूर पक्षाचे उपाध्यक्ष लॉर्ड अॅशक्राप्ट, ब्रिटनचे माजी पंतप्रधान टोनी ब्लेअर आणि त्यांच्या पत्नी, झेक रिपब्लिकनचे पंतप्रधान आंद्रेज, अनेक नामवंत कंपन्या ज्यात फोनचा सम्राट म्हणून ओळखली जाणारी अॅपल, विल्बर रॉस अशी अनेक नावे या कागदपत्रांच्या संबंधात आहेत. भारताचे माजी अर्थमंत्री यशवंत सिन्हा यांचं नावही त्यात आहे. ज्यांची नावे त्यात आली ते सर्वच गुन्हेगार ठरतील असं नाही. देशात भरावयाचा कर त्यांनी चुकवला आहे का, हा महत्त्वाचा प्रश्न आहे.

कोणत्याही देशातील कर हेच त्या देशाचे एक महत्त्वाचे उत्पनाचे साधन असते. याशिवाय देशाच्या नैसर्गिक साधनसंपत्ती, व्यापार वगैरे गोष्टी वेगळ्या, पण कर हे महत्त्वाचे साधन असते. श्रीमंतांवर अधिक कर आणि गरिबावर कमी कर असा मार्गही गरीब देश अवलंबतात. पण श्रीमंतांनी कर चुकवला, माफी मागितली, अवैध मार्गांनी कर कमी दाखवला तर कर उत्पन्नात मोठी तूट तयार होते. देशावर, गरिबांवर त्याचा भार पडतो. तो सहन करण्याची शक्ती गरिबामध्ये नसते. दारिद्र्य, बेकारी या गोष्टी वाढतात. लोकांचे जगणे कठीण होते, अशांतता माजते. दुसरीकडे, बडे लोक सत्तेच्या माध्यमातून, मध्यस्थांच्या माध्यमातून कर चुकवण्याचा प्रयत्न करत असतात. सत्तेतील लोकांचा आणि उद्योजकांचा त्यात अधिक समावेश असतो. भांडवलशाही आणि सत्ताधारी यांच्यात साखळी तयार झालेली असते. अमेरिकेत भांडवलदारच सत्तेत जाऊन बसतात. स्वतःच्या हितासाठी कायदे करून घेतात. असलेले कायदे फिरवत राहतात, पळवाटा काढतात. भारतासारख्या देशात अनेक भांडवलदार संसदेच्या वरिष्ठ सभागृहात स्थिरस्थावर होतात. काहीजण माध्यमांवर पकड बसवतात. राजकारणात, सत्ताकारणात कोणतीही भानगड करण्याइतके ते सक्षम होतात. या सर्वाचा एकच परिणाम होतो आणि तो म्हणजे बडे मासे कायद्याचा वापर करून संपत्ती आपल्या मुठीत ठेवतात आणि गरीब शासकीय सवलतीची, कोणत्या तरी थाळीची, कोणत्या तरी मनिऑर्डरीची वाट बघत असतात. धनिकांची संपत्तीची हाव सतत वाढत असते. 'कर लो दुनिया मुठ्ठी में' हे त्यांचं घोषवाक्य असतं. संपत्तीनिर्मिती करण्यासाठी थोडा जरी अवैध मार्गाचा पाठिंबा मिळाला तरी ते मोठी झेप घेऊ शकतात. त्यांचे नाव असते, त्यांच्याकडे सत्ता असते, जगभर त्यांचे नेटवर्क असते, त्यांच्याकडे सामर्थ्यही असते. या सर्वांतून ते नव्या व्यवस्थेची म्हणजे स्वर्गाची निर्मिती करतात. आपल्याला हवा तसा कायदा, हवी तशी व्यवस्था ते तयार करू शकतात. वर्षानुवर्षे हे चालू आहे. हुकूमशाही, लोकशाही, साम्यवाद, आघाडी सरकार असो, हा स्वर्गबांधणीचा कार्यक्रम कायम सुरू असतो. शासनपद्धती कोणतीही असली तरी अधिक कमवण्याची, अधिक जमवण्याची, अधिक गुप्त करण्याची वृत्ती जगभर कायमच असते. लोकांच्या मनात या सर्वांनी अतिशय आदराचे स्थान निर्माण केलेले असते. लोकही सारे काही सहन करतात. राजा चुकला, नेता चुकला, धनिक चुकला, सेलिब्रिटी चुकला, मनात ज्याला देवाचं स्थान दिलेला चुकला तर न्याय कोणाकडं मागायचा, असा प्रश्न असतो. न्यायव्यवस्थेतील, कायदा व्यवस्थेतीलही काही जण त्यात अडकलेले असतात. दाताने जीभ चावली तर न्याय कोणाकडे मागायचा, असा प्रकार तयार होतो. चार दिवस या सर्वांची नावे माध्यमात गाजतात. पुन्हा सारं काही शांत होतं. कागदपत्रांची सहा प्रकरणे बाहेर पडल्यावरही सहावं जन्माला आलं. सातव्याच्या जन्मकळा कदाचित चालूही असतील. काही सांगता येत नाही. हे सारं असंच चालणार अशा हताश भूमिकेत जनता जाते, पण ते काही बरोबर नाहीय. जनतेची गरज म्हणून सरकार, देश जन्माला येत असतो. जनतेने जन्मास घातलेल्या व्यवस्थेनं विश्वस्थांची भूमिका करायची असते. जर कोण ती नाकारत असेल तर जनतेनेच अशांना दणका द्यायला हवा. त्यासाठीचे हत्यार फक्त जनतेकडेच असते. जनता सार्वभौम असते. तिने तयार केलेल्या व्यवस्था बेईमान, फितूर, गद्दार होत असतील तर जनतेनेच त्यांना धडा शिकवला पाहिजे. तसे न झाल्यास आज स्वर्गाच्या नावानं जमवलेली कागदपत्रे उद्या नरकाच्या नावानंही जमवली जातील. त्याची वाट न पाहणे हेच उचित असतं.

●●●

# हवा दिल्लीची :
# राजकीय पक्षांसाठी आव्हान उत्तर प्रदेशाचे



**उत्तर प्रदेशातील आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर गेली तीन महिने भाजपने राज्यात योजनांचा धडाका सुरू केला आहे. पण अन्य राज्यांप्रमाणे त्यांनी मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांना बदलले नाही. योगी सरकारने कोरोनाची परिस्थिती नीट हाताळली नसल्याचा राग लोकांमध्ये आहे. त्याचे काय?**




विजय नाईक

दिल्लीतील कोणत्याही वर्तमानपत्राचे पान उघडून पाहा, आठवड्यातून दोन ते तीन वेळा उत्तर प्रदेशचा विकास व मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांची छायाचित्रे याच्या पानभर जाहिराती दिसत आहेत. त्यावर कोट्यवधी रुपये खर्च होत आहेत. आदित्यनाथ यांच्या कारकीर्दीत उत्तर प्रदेशाचा कसा कायापालट झाला, हे सांगण्याची जणू तेथील प्रत्येक मंत्रालय व विभाग यांच्यात चढाओढ लागल्याचे दिसते. विधानसभेच्या निवडणुका पुढील वर्षी व्हावयाच्या आहेत. त्यास जेमतेम सहा महिने उरल्याने मोदी-शाह यांचे असे प्रयत्न सुरू आहेत, की कोणत्याही परिस्थितीत भाजप जिंकलाच पाहिजे. निवडणुका आदित्यनाथ यांच्या नेतृत्वाखाली होणार असल्याने तेच भावी मुख्यमंत्री असतील, अशी घोषणा करण्याशिवाय भाजपला पर्याय नाही. उलट, एकत्र होऊ पाहणाऱ्या विरोधकांचा मुख्यमंत्री कोण हे शेवटपर्यंत घोषित होऊ शकणार नाही. निवडणुकीपूर्वी जागांबाबत समझोता करून एकत्रितपणे भाजपला टक्कर द्यावयाची, की निवडणुकीनंतर सत्तेसाठी एकत्र यायचे याबाबत त्यांची कोणतीही रूपरेषा समोर आलेली नाही.

उत्तर प्रदेशातील ७५ जिल्ह्यांत विकासाचा वारू कसा घोडदौड करतोय, शेतकरी कसे हायटेक बनत आहेत, ग्रामीण भागातील महिला कशा स्वयंपूर्ण होत आहेत, प्राणवायू पुरविण्यासाठी ३६४ कारखाने लावण्यात येणार आहेत, उच्च शिक्षण व कापड व्यवसायात उत्तर प्रदेश व ब्रिटन यांची भागीदारी, नोएडामध्ये देशातील पहिल्या हँडिक्रॅफ्ट उद्यानाची उभारणी, ग्रेटर नोएडाला राज्याची शोकेस बनविण्याचा निर्धार, त्याला चीनी व कोरियन कंपन्यांचे केंद्र बनविण्याची योजना, अशा एक ना अनेक तपशीलवार घोषणांची माहिती दिली जात आहे. निवडणुकीला सहा महिने असल्याने त्याच त्या गोष्टींचा पाऊस वृत्तपत्रांतून, दृकश्राव्य माध्यमातून पडणार, हे निश्चित; परंतु बऱ्याच वेळा कागदावरील योजना कागदावरच राहतात व त्यामुळे निर्माण केलेले चित्र भ्रमनिरासक ठरते, असा लोकांचा अनुभव आहे. त्यामुळे या घोषणांवर मतदार किती विश्वास ठेवणार, हा प्रश्न अलाहिदा.

## मोदींकडून आदित्यनाथांची प्रशंसा

कोविडच्या काळात आदित्यनाथ यांनी केलेल्या व्यवस्थापनाबाबत मोदी यांनी जेव्हा त्यांच्याबद्दल प्रशंसोद्गार काढून पाठीवर थाप मारली, तेव्हा लोकांना अचंबा वाटून त्यांनी तोंडात बोटे घातली. त्या दिवसात उत्तर प्रदेश शासनाचे कसे बारा वाजले होते, प्राणवायूच्या तुडवड्यामुळे एकामागून एक रूग्ण मरण पावले व स्मशानघाटात जागा नसल्याने प्रेते कशी गंगेत फेकून देण्यात आली होती, हे साऱ्या जगाने पाहिले. उत्तर प्रदेशाचे वर्णन 'उल्टा प्रदेश' असे करण्यात आले, तरीही जाहिरातींद्वारे तो कसा 'सुल्टा प्रदेश' आहे, हे जनतेच्या मनावर बिंबविले जात आहे. पंतप्रधान मोदी आदित्यनाथ यांची प्रशंसा करीत आहेत. कदाचित, त्यांना त्याशिवाय पर्याय नसावा.



## पंजाबात पंचरंगी लढतीची शक्यता

पुढील वर्षी मार्चमध्ये उत्तर प्रदेश, गोवा, मणिपूर, पंजाब व उत्तराखंड या राज्यांच्या विधानसभांची

मुदत संपत आहे. त्या दृष्टीने निवडणूक आयोगाची तयारी सुरू आहे. भाजपसह समाजवादी, बहुजन समाज पक्ष, काँग्रेस हे पक्ष जोमाने कामाला लागलेत. देवदेवक सुरू झालंय. पंजाबमधील प्रसिद्ध वैष्णोदेवीला राहुल गांधी यांनी भेट दिली. 'जय मातादी, जय मातादी' घोषणा झाल्या. राजकीयदृष्ट्या दुभंगलेल्या पंजाबसह उत्तर प्रदेशात आपली सरशी व्हावी, यासाठी देवीला त्यांनी कौल लावला. हिंदूंच्या ध्रुवीकरणाच्या युगात आपण कसे सच्चे हिंदू आहोत हे दाखविण्याचा ते प्रयत्न करीत आहेत. आता माजी मुख्यमंत्री कॅप्टन अमरिंदरसिंग व काँग्रेसचे प्रांताध्यक्ष नवज्योतसिंग सिद्धू यांच्यातच जोरदार जुंपणार. त्याचे संतुलन नवे मुख्यमंत्री चरणजितसिंग छन्नी त्यांच्यात संतुलन साधणार काय, हे लवकरच दिसेल. अमरिंदरसिंग यांना भाजप जाळ्यात ओढण्याचा प्रयत्न करणार. दुसरीकडे, अकाली दलही त्यांना जवळ करण्याचा प्रयत्न करील. समझोता झाला नाही, तर पंजाब विधानसभेच्या निवडणुकांतील सामना काँग्रेस, अकाली दल, भाजप व आम आदमी पक्ष असा पंचरंगी असेल.

खरं तर, देवपूजा, राम मंदिर उभारणी हे भाजपचे प्रांत; परंतु हिंदूंची मते फोडायची असतील, तर धर्मनिरपेक्षतेबरोबर आपणही हिंदू आहोत, असे दाखवायला हवे म्हणून काँग्रेसचा एकीकडे बदललेला पवित्रा, भाजपला त्यांच्याच मतपेढीत शह देण्याचे चाललेले प्रयत्न, तर दुसरीकडे, बहुजन समाज पक्षाच्या अध्यक्ष मायावती (जाटव) यांनी 'ब्राह्मण ब्राह्मण' असे भजन चालविले आहे. मायावती यांनी आधीही ब्राह्मणांना जवळ केले होते. त्यांचे खास सल्लागार व नामवंत वकील सतीश मिश्रा हे राज्यसभेतील त्यांच्या पक्षाचे प्रमुख नेते. मुख्यमंत्री असताना नोएडा व लखनौतील आंबेडकर पार्कावर मायावती यांनी कोट्यवधी रुपये खर्च केले होते. 'तसा खर्च आता मी करणार नाही,' असे त्या म्हणाल्या. आपण केवळ दलितांचे नव्हे, तर सवर्ण व उच्चवर्णीय ब्राह्मणांचेही कैवारी आहोत, असे मायावती दाखवित आहेत. उत्तर प्रदेशच्या एकूण लोकसंख्येपैकी ब्राह्मणांचे प्रमाण १२ टक्के आहे.



## मायावतींना हवी ब्राह्मणांची साथ

२००७ मधील निवडणुकीत ब्राह्मणांनी मायावतीला साथ दिली. त्यावेळी त्यांचा नारा होता, 'हाथी नही गणेश है, ब्रह्मा, विष्णू, महेश है.' यावेळी त्या कोणता नारा देतात, ते दिसेलच; परंतु आपल्यात गेल्या वेळेपेक्षा बराच बदल झालाय, हे दाखविण्यासाठी आजवर बरोबर व



तुरूंगात असलेला माफिया राजकारणी नेता मुख्तार अन्सारी (कौमी एकता दल) याला विधानसभेच्या निवडणुकीत उमेदवारी देण्याचे नाकारले आहे. २०१७ पासून अन्सारी बहुजन समाज पक्षात आहे. तेव्हा मायावती यांनी त्याच्यावर काही कारवाई केली नाही, उलट त्याला मानाने वागविले. त्याच्या मऊ या मतदारसंघातून आता भीम राजभर याला उमेदवारी देण्याचे ठरविले आहे. प्रत्युत्तर म्हणून, ऑल इंडिया मजलीज-ए-इत्तेहादुल मुसलमीन या असाउद्दीन ओवेसी यांच्या अध्यक्षतेखालील पक्षाने मुख्तार अन्सारी याला उमेदवारी देण्याचे जाहीर केले आहे. ही लढत चांगलीच रंगणार आहे. मायावती यांनी ब्राह्मणांना बरोबर घेण्याचे आणखी एक कारण म्हणजे, ते भाजपबाबत नाराज झाले आहेत, असा त्यांचा झालेला समज. दुसरे म्हणजे, केवळ दलित व जाटव यांचा पाठिंबा तोकडा पडेल, याची झालेली जाणीव.

समाजवादी पक्षाचे अध्यक्ष अखिलेश यादव हे यादवांसह ठाकूर, कुर्मी, दलित, राजभर, जाट, अन्य मागासवर्गीय मुस्लिम व काही प्रमाणात सवर्णांना आपलेसे करण्याच्या प्रयत्नात आहेत. ब्राह्मणांचा भाजपबाबत काही प्रमाणात भ्रमनिरास झाल्याने त्यांची मते मिळविण्यासाठी सपा, बसपा व काँग्रेस प्रयत्नशील झालेत. सीएसडीएसनुसार, २०१७ मध्ये ८० टक्के ब्राह्मण, ६१ टक्के अन्य मागासवर्गीय व ३७ टक्के जाट मतदारांनी भाजपला मतदान केले होते. पाच वर्षानंतर हे गणित कितपत बदलतेय, याकडे देशाचे लक्ष असेल. मुस्लिमांच्या एकूण १८ टक्के मतदारांपैकी भाजपला मते मिळण्याची शक्यता नाही. तथापि, त्यांची मते काँग्रेस, सपा व बसपा यात विभागली जातील.

## २०२४ चे रण जिंकण्याची शिकस्त

पाच राज्यांपैकी पंजाबमधील काँग्रेसचे सरकार वगळता गोवा, उत्तराखंड, उत्तरप्रदेश व मणिपूर यात भाजपची सरकारे आहेत. पाच राज्यांतील एकूण मतदारांची संख्या १७.८४ कोटी असून, त्यापैकी एकट्या उत्तर प्रदेशात त्यांची संख्या १४ कोटी ६६ लाख आहे. मोरारजी देसाई, देवेगौडा, इंद्रकुमार गुजराल, पी.व्ही.नरसिंह राव, डॉ मनमोहन सिंग व अटल बिहारी वाजपेयी वगळता उत्तर प्रदेशने देशाला नऊ पंतप्रधान दिले. गुजरातचे असूनही पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी उत्तर प्रदेशातील वाराणसी हा मतदारसंघ निवडला व ते तेथून निवडून आले. उत्तर प्रदेश हे कोणत्याही राजकीय पक्षासाठी अत्यंत महत्त्वाचे राज्य आहे. वाराणसी, प्रयागराज, अयोध्या आदी शहरे हिंदू धर्मासाठी जशी जवळची, तसंच राम मंदिराची निर्मिती, हे भाजपच्या



दृष्टीने हिंदूंचे स्वप्न आहे. त्याची पूर्तता करून उत्तर प्रदेशासह २०२४ मधील लोकसभेच्या सार्वत्रिक निवडणुकांतही बाजी मारायची, या जिद्दीने मोदी-शाह व आदित्यनाथ हे त्रिकुट काम करीत आहे.

## टीकाकारांनी तोंडं बंद केली

आदित्यनाथ यांना उत्तर प्रदेशचा 'पोस्टर बॉय' म्हटले जाते. नव्या योजनेनुसार, आदित्यनाथ यांची प्रचारादरम्यान प्रामाणिक नेता म्हणून प्रतिमा निर्माण केली जाईल. 'दमदार व इमानदार' हे दोन शब्द त्यांच्यासाठी वारंवार वापरले जातील. त्यांच्या काळात झालेल्या प्रगतीसाठी 'फर्क साफ है (फरक स्पष्ट दिसतोय)' असा संदेश सोशल मिडियातून दिला जाईल. कोविड-१९ च्या दुसऱ्या लाटेदरम्यान झालेल्या गलथान कारभारामुळे आदित्यनाथांवर सर्व थरातून टीका झाली. त्या दिवसांत केंद्र सरकारच्या आकडेवारीनुसार उत्तर प्रदेशात करोनामुळे १८ हजार लोकांचा मृत्यू झाला. तथापि, मृतांची नोंदणी व आकडेवारी जमा करणाऱ्या आर्टिकल १४ या संकेतस्थळाने २१ जून रोजी जारी केलेल्या अहवालात म्हटले आहे, की २४ जिल्ह्यांतील मृतांची संख्या (जुलै २० ते मार्च २१) १ लाख ९७ हजार होती. यावरून, सरकारी आकडे व प्रत्यक्षातील मृत्यू यातील तफावत ध्यानी यावी. जे टीका करतात त्यांच्याविरूद्ध कायदा वापरून त्यांची तोंडे मुख्यमंत्र्यांनी बंद केली. त्या दिवसात देशाच्या आरोग्याचे बारा वाजले होते, त्यास उत्तर प्रदेशचे शासन बऱ्याच प्रमाणात जबाबदार होते. उलट भाजप म्हणतो, की उत्तर प्रदेशात त्यांच्या कारकीर्दीत मेडिकल कॉलेजची संख्या चौपट झाली. आरोग्यसेवा अधिकारी व आरोग्य केंद्रांमध्ये वाढ झाली. याचा अर्थ, तिसरी लाट आल्यास उत्तर प्रदेशासह देश त्या संकटाचा सामना करण्यास गेल्या वेळेपेक्षा अधिक सिद्ध आहे, असे मानावे लागेल.

२०१७ च्या निवडणुकीत भाजपला ३१२, समाजवादी पक्षाला ४७, बहुजन समाज पक्षाला १९, काँग्रेसला केवळ ७ व अपक्ष व अन्य पक्षांना १८ जागा मिळाल्या होत्या. एबीपी-सी व्होटर पाहाणीनुसार, भारतीय जनता पक्षाला आगामी निवडणुकीत पाच टक्के कमी मतदान झाले, तरी भाजपचा विजय होईल. भाजपला २५४, तर, समाजवादी पक्षाला १२० जागा मिळतील. सहा महिन्यांपूर्वी केलेली पाहाणी व वर्तविलेले अंदाज चुकण्याचीही शक्यता आहे. कारण, मतदान सहा महिन्यानंतरच्या परिस्थितीवर अवलंबून राहील; परंतु भाजप पुन्हा सत्तेवर आल्यास आदित्यनाथ यांचे दिल्लीतील राजकीय वजन बरेच वाढलेले असेल. ते मोदी-शाह यांच्या रांगेत जाऊन बसलेले असतील. विरोधी पक्षांना यामुळेच कंबर कसावी लागेल. नेहमीप्रमाणे उत्तर प्रदेशात विधानसभा व लोकसभेच्या निवडणुकांत चौरंगी लढत होईल, असेच दिसते. गेल्या निवडणुकांत काँग्रेस व समाजवादी पक्षात जागांबाबत समझोता झाला होता; परंतु त्याचा लाभ समाजवादी पक्षापेक्षा काँग्रेसला झाला. तेव्हापासून अखिलेश यादव यांनी काँग्रेसला दूर ठेवले. शिवाय, माजी काँग्रेसाध्यक्ष रिटा बहुगुणा आता भाजपवासी झाल्यात. ज्यांच्यावर राहुल गांधी यांनी उत्तर प्रदेशची जबाबदारी सोपविली होती, ते ज्योतिरादित्य शिंदे केंद्रात नागरी उड्डाण मंत्री झाले आहेत. त्यांनाही मोदी उत्तर प्रदेशात कामाला लावण्याची शक्यता आहे. परिणामतः निवडणुकांची जबाबदारी प्रामुख्याने राहुल व प्रियंका गांधी यांच्यावर पडणार आहे. प्रियंका गांधी यांच्यासाठी पक्षाने भरगच्च जनसंपर्क कार्यक्रमवजा मोहीम

## दुफळीचा काँग्रेसला फटका?

पंजाबमध्ये माजी मुख्यमंत्री कॅप्टन अमरिंदरसिंग व प्रांताध्यक्ष नवतेजसिंग सिद्धू यांच्यातील मतभेद भाजपच्या पथ्थ्यावर न पडले, तरच नवल. काँग्रेसला एकामागून एक राज्य गमविण्याची फारच आवड निर्माण झाली आहे. सोनिया गांधी, राहुल व प्रियंका हे तिन्ही नेते मिळूनही पंजाबमधील बेदिली सोडविण्यात असमर्थ ठरलेत. काँग्रेसमध्ये जी-२२ (पक्षांतर्गत विरोधक) व विद्यमान हायकमांड यात सरळसरळ दुफळी पडल्याने त्याचे दुष्परिणाम या निवडणुकांत दिसतील.

मणिपूर पुनश्च भाजपच्या हाती जाईल. उत्तराखंडमध्ये गेल्या पाच वर्षात भाजपला चार मुख्यमंत्री बदलण्याची वेळ आली, यावरून तो पक्ष आतून किती पोखरला गेलाय व खिळखिळा झालाय, हे स्पष्ट होते. भाजपमध्ये सारे आलबेल आहे काय? राज्याराज्यातील परिस्थिती समाधानाकारक नाही. पक्षांतर्गत मतभेदांमुळे मोदी यांना गेल्या काही महिन्यांत तब्बल चार राज्यांचे मुख्यमंत्री बदलावे लागले. त्यात कर्नाटकचे बी.एस.येदियुरप्पा, आसामचे सर्वानंद सोनोवाल, गुजरातचे विजय रूपानी व उत्तराखंडचे त्रिवेंद्रसिंग रावत यांचा समावेश आहे. निवडणुकांना सामोरे जाताना नवे चेहरे घेऊन गेल्यास मतदारांना अधिक आकर्षित करता येईल, असे भाजपचे गणित असावे. गोव्यात भाजपचे सरकार असले, तरी तेथे भाजप व काँग्रेस या दोन्ही पक्षांकडे आलटून पालटून सत्ता गेली आहे. तेथे काय होते, हे पाहाणे उद्बोधक ठरेल. ●●●



ठरविली आहे. तीनुसार, प्रियंका गांधी वड्रा यांच्या नेतृत्वाखाली काँग्रेसतर्फे उत्तर प्रदेशातील तब्बल ४०३ मतदारसंघातून १२ हजार कि.मी.ची 'प्रतिज्ञा यात्रा' काढण्याचे जाहीर करण्यात आले आहे.

''आदित्यनाथ यांनी दिलेली आश्वासने पाळली नाहीत. उलट त्यांच्या कारकीर्दीत राज्यात भ्रष्टाचार, जीवनावश्यक वस्तू, गुन्हेगारी, विशेषतः महिलांविरूद्धचे गुन्हे, बेरोजगारी व आरोग्य व्यवस्था यात बेसुमार वाढ झाली,'' हे काँग्रेस व विरोधी प्रचाराचे प्रमुख मुद्दे असतील. यात्रा महत्त्वाकांक्षी आहे. त्यातील मेख म्हणजे, काँग्रेस ना केंद्रात, ना राज्यात सत्तेवर आहे. त्यामुळे आश्वासने दिली, तरी तो सत्तेत येण्याची चिन्हे नसल्याने मतपेटीत काँग्रेसच्या बाजूने किती मतदान होते, ही शंका उरतेच. वर दिलेल्या आकडेवारीनुसार, मतदारांची पहिली निवड भाजप, त्याखालोखाल समाजवादी पक्ष, नंतर बहुजन समाज पक्ष व चौथ्या क्रमांकावर काँग्रेस आहे.

## आदित्यनाथांपुढे आंदोलनाचे मोठे आव्हान

उत्तर प्रदेशात आदित्यनाथ यांच्यापुढे सर्वात मोठे आव्हान आहे, ते शेतकरी आंदोलनाचे. केंद्राने केलेले शेतीविषयक तीन कायदे रद्द करावेत यासाठी गेले वर्षभर सुरू असलेले आंदोलन केंद्राने कितीही हातपाय मारून, त्यांना बदनाम करून, दिल्लीभोवती खंदक खोदून बंद पाडण्याचा प्रयत्न करूनही संपुष्टात येण्याचे चिन्ह नाही. निवडणुका जवळ येतील, तसा त्याचा जोर वाढणार. त्याचा पंजाब, उत्तराखंड, उत्तर प्रदेशातील मतदानावर थेट परिणाम होणार, हे निर्विवाद. जोडीला सामान्यांचे खिसे कापणारी घरगुती गॅसच्या दरात वारंवार होणारी वाढ, पेट्रोल व डिझेलचे अव्वाच्या सव्वा वाढलेले दर, यामुळे मध्यमवर्गीय व शेतकरी जेरीस आला आहे. शेतीविषयक कायदे मागे घेण्यास केंद्र तयार नाही. ते मागे घेतल्याशिवाय शेतकरी मागे हटण्यास तयार नाही. ही स्थिती भाजपला चिंतित करणारी आहे. उत्तर प्रदेशात सरकारविरोधी निदर्शनात ज्यांचा सहभाग होता, त्यांच्या खाजगी मालमत्तेवर आदित्यनाथ यांनी टाच आणली. त्यांची छायाचित्रे चौकाचौकातून लावून त्यांची बदनामी करण्यात आली. कोरोनाच्या काळात प्राणवायू मिळत नाही, अशी तक्रार करणाऱ्या डॉक्टर्सवर कारवाई करण्यात आली.

मोदी सरकारतर्फे ब्रिटिशकालीन देशद्रोहाच्या कायद्याखाली २०१४ ते २०१९ दरम्यान ३२६ व्यक्तींवर खटले दाखल करण्यात आले; परंतु प्रत्यक्षात फक्त सहा जणांना दोषी ठरविण्यात आले. उत्तर प्रदेशात १७ व्यक्तींवर असे खटले दाखल करण्यात आले. आसाम, झारखंड, बिहार, जम्मू-काश्मीर, केरळ, कर्नाटक, पश्चिम बंगाल आदी राज्यांत त्यांचे प्रमाण अधिक आहे. 'अनलॉफुल ॲक्टिव्हिटीज प्रिव्हेन्शन ॲक्ट' म्हणजेच बेकायदेशीर कृती प्रतिबंधक कायद्याखाली याच काळात कारवाई करण्यात आलेल्यांचे प्रमाण ७५ टक्क्यांनी वाढले. १,९४८ लोकांना अटक करण्यात आली. संसदेला सादर करण्यात आलेल्या आकडेवारीनुसार, २०१९ मध्ये सर्वाधिक ४९८ गुन्ह्यांची नोंद उत्तर प्रदेशात करण्यात आली. याच वर्षी मणिपूर ३०६, तामिळनाडू २७०, जम्मू-काश्मीर २५५, झारखंड १०५ व आसाममध्ये ८७ गुन्ह्यांची नोंद करण्यात आली. नोंद होऊनही सुनावणी होत नाही. त्यामुळे अटकेतील व्यक्तिंना तुरुंगात खितपत पडावे लागते, अशी जोरदार टीका झाल्याने व सर्वोच्च न्यायालयाने सरकारला जाब विचारल्याने राज्य पोलीस संघटना व नॅशनल इन्व्हेस्टिगेशन एजन्सी यांनी ४८ खास न्यायालयांची नियुक्ती केली व दहशतवादविषयक गुन्ह्यांची गतिमान चौकशी करावी, असे आदेश दिले. याचा परिणामही उत्तर प्रदेश व अन्य राज्यांत होणार आहे. ●●●

**(लेखक दिल्लीस्थित ज्येष्ठ पत्रकार आहेत)**

# हवामान अरिष्ट, महामारी निवारणार्थ गांधीमार्ग...



प्रा. एच. एम. देसरडा

**२१ व्या शतकाच्या तिसऱ्या दशकात अवघे जग, समस्त मानवजात एका विलक्षण विसंगतीचा सामना करत आहे. एकीकडे ज्ञान-विज्ञान-तंत्रज्ञानाच्या अफाट विस्ताराने, नवनवीन शोध व आविष्काराने जग अक्षरश: एक विश्वग्राम (ग्लोबल व्हिलेज) बनले आहे. स्थळ-काळ-वेगाच्या संकल्पना व समिकरणे आरपार बदलली असून निमिषार्धात पृथ्वीतलावर कोठेही संभाषण, संप्रेषण सामान्य व्यवहार झाला आहे. वस्तू व सेवांचे महाकाय उत्पादन, बकासुरी भोगउपभोग, वापरा-फेका वृत्ती-प्रवृत्तीचा सुळसुळाट, अघोरी लालसा, संचयाचा हावहव्यास यामुळे निसर्ग संसाधनांचे अमर्याद दोहन, मानवी श्रमांचे निर्मम शोषण होत असून कार्बन व अन्य विषारी वायूंचे उत्सर्जन होत असल्यामुळे तापमानवाढीचे संकट आ वासून आहे. याचे मूळ व मुख्य कारण जीवाश्म इंधन, अन्य खनिजे, रसायने इत्यादींचा राक्षसी वापर व ही संसाधने बळकावण्यासाठी वृक्षसंहार, जैवविविधतेचा ऱ्हास. त्यासाठी आक्रमणे, युद्धे, वसाहती, अनाठायी विश्वव्यापार आणि त्याला पाळणारी-पोसणारी जागतिक भू-राजनैतिक व्यवस्था, राजकीय अर्थकारण हे आहे.**

४६० कोटी वर्षे आयुर्मानाच्या या पृथ्वीतलावर उत्क्रांतीच्या प्रक्रियेत असंख्य 'युगे' अवतरली, अनेक अचाट घटना घडल्या. तथापि, औद्योगिक क्रांतीनंतरच्या उण्यापुऱ्या तीन शतकांत मानव समाजाची वाटचाल एका आगळ्यावेगळ्या मितीत होत आहे. ऐतिहासिक कालौघात अनेक प्रगल्भ संस्कृती उभ्या राहिल्या, अतिरेकामुळे उद्ध्वस्त झाल्या. मात्र, निसर्गकेंद्री धारणा व धोरणांचा विसर पडून मानवकेंद्री (अर्थात त्यातील बलिष्ट सत्ताधीशकेंद्री) विचारव्यूह बळावल्यामुळे प्रचंड दोहन व शोषण सत्र सुरू झाले, जे आजही बेछूट वेगाने जारी आहे आणि हेच आहे आजच्या हवामान अरिष्टाचे कूळ-मूळ...

## निसर्गकेंद्री जीवनशैलीकडे

हवामान बदलाच्या येऊ घातलेल्या संकटाची जाणीव मोहनदास करमचंद गांधी यांना १९ व्या शतकाच्या अखेरीस लंडनमधील वास्तव्यात झाली. ज्यावेळी सारे जग युरोप व अमेरिकेच्या औद्योगिकरण-शहरीकरणाचे गुणगाण गाण्यात व अंधानुकरण करण्यात मश्गुल होते, त्यावेळी गांधींना या निरर्थक वाढवृद्धीप्रवण, चैनचंगळवादी व्यवस्थेचे व्यैर्थ्य स्पष्ट दिसले. १९०९ साली त्यांचे हे संवादरूप विचार 'हिंद स्वराज' या युगप्रवर्तक लघुग्रंथात शब्दबद्ध झाले. खचितच हे मानवाच्या व वसुंधरेच्या रक्षणार्थ नवी विश्वदृष्टी देणारे मूलभूत चिंतन दिशादिग्दर्शन आहे. हे खरे आहे, की दक्षिण आफ्रिकेच्या २१ वर्षांच्या वास्तव्यात व १९१५ साली भारतात परतल्यानंतर स्वातंत्र्य चळवळीच्या नेतृत्त्व जबाबदारीमुळे गांधीजींना त्यांच्या मूलभूत विश्वव्यापी समस्येच्या पाठपुराव्यासाठी वेळ मिळाला नाही. मात्र, स्वातंत्र्यलढ्याच्या धबडग्यातही त्यांना याचे भान होते. १९४५ साली नेहरूंना लिहिलेल्या पत्रात त्यांनी 'हिंद स्वराज' मध्ये प्रतिपादन केलेल्या स्वातंत्र्याची संकल्पना व विश्वदृष्टीकडे (वर्ल्ड व्ह्यू) लक्ष वेधले. पश्चिमेच्या भोगवादी प्रवृत्तीचा त्यांनी नि:संदिग्ध शब्दात अव्हेर केला. भारताने विकासाच्या गोंडस नावाने, आधुनिकीकरण-औद्योगिकरणाच्या मोहजाळात फसू नये असे बजावले. अर्थात, नेहरूंपासून मोदींपर्यंत सर्व पंतप्रधान त्यांना 'पूजनीय' मानत असले तरी अनुकरण करण्यास धजले/धजत नाहीत, हे वास्तव नाकारण्यात काय हशील आणि नेमके हेच कारण आहे, भारत व जगाच्या अधोगती व अध:पतनाचे...

'पृथ्वी सर्वांच्या गरजा भागवू शकते; परंतु हावहव्यास नाही', हे गांधीवचन सर्वश्रूत आहे. याचा जाणीवपूर्वक अवलंब केल्याखेरीज गत्यंतर नाही. सोबतच वेगाचा बागुलबुवा दाखवणाऱ्यांना गांधींनी सांगितले आहे, की 'वेग व दिशा हे परस्परविरोधी असतील तर तो वेग घातक आहे' सांप्रतकाळी जगाची द्विधा व द्वंद्व हे चित्र असून त्याचे धोके दररोज प्रगट होत आहेत. मानव समाजाच्या भौतिक व नैतिक वाटचालीचा, सांस्कृतिक प्रगतीचा गांधीजींनी सम्यक मागोवा घेत भारतासह आजवरच्या सर्व संस्कृती कमी अधिक प्रमाणात हिंसेवर आधारलेल्या असल्यामुळे नव्या अहिंसा संस्कृतीची स्थापना हे निसर्ग व मानवाच्या भल्यासाठी आवश्यक मानले. निसर्गाविषयीचा पूज्यभाव जोपासल्याखेरीज मानवाचे यथोचित भरणपोषण व योगक्षेम शक्य नाही, हे सत्य त्यांनी बुद्ध-महावीरांपासून थोरो-रस्कीन-टॉलस्टाय यांच्या आचारविचारातून घेतले. सत्य व अहिंसा ही सनातन मूल्ये असून सत्तेला सत्य सांगण्यासाठी निर्भय होण्याचा तंत्रमंत्र त्यांनी जगाला दिला. अहिंसक मार्गाने मूलभूत व्यवस्था परिवर्तनासाठी सत्याग्रहाच्या लोकशक्तीचा प्रभाव त्यांनी जगातील सत्ताधिकाऱ्यांना दाखवला आहे.

## कार्बन उत्सर्जनास आवर :

हवामान अरिष्टावर मात करण्यासाठी आणि त्या व्यापक अरिष्टाचा भाग असलेल्या कोरोना महामारीचे निर्मूलन करण्यासाठी जगभरच्या सत्ताधाऱ्यांना हे बजावले पाहिजे, की विकासाच्या नावाने चालवलेले निरर्थक वाढवृद्धीचे विनाशसत्र तात्काळ थांबवा. संयुक्त राष्ट्राच्या पुढाकाराने १९७२ पासून पर्यावरणाच्या प्रश्नावर जागतिक परिषदा होत आहेत. त्यात जाणीवजागृतीबरोबरच उत्सर्जन कमी करण्यासाठी प्रयत्न केले जात आहेत. कोळसा, पेट्रोल-डिझेल आधारित ऊर्जा व वाहतूक व्यवस्थेमुळे पृथ्वीच्या तापमानात होत असलेल्या भरमसाठ वाढीबाबत जागतिक पर्यावरण परिषदांच्या क्रमात २०१५ साली झालेल्या पॅरिस येथील संमेलनात किमान २ अंश (शक्यतो १.५ अंश) सेल्सियसवर तापमानवाढ रोखण्यासाठी जवळपास २०० देशांनी होकार दिला. त्या पॅरिस करारानंतर आणि विशेषत: २०२० साली प्रत्येक देशाने स्वच्छेने स्वीकारलेले उत्सर्जन कमी करण्यास नेमके काय केले याचा आढावा घेणार, तोच जगाला कोरोना महामारीने घेरले! खरं तर त्या काळात जी टाळेबंदी, प्रवासबंदी झाली, त्यामुळे कार्बन उत्सर्जनात घट होऊन पर्यावरणावर वांछीत सकारात्मक परिणाम प्रकर्षाने जाणवला. मात्र, अल्प काळातच जगाचे उत्पादन व उपभोगचक्र पूर्ववत होत आता अधिक वेगाने उत्सर्जन होत आहे. निरर्थक व विनाशकारी वाढवृद्धीची पागल दौड कोण व केव्हा थांबवणार?

यासंदर्भात आवर्जून लक्षात घेण्यासारखी बाब म्हणजे, कोरोना महासाथदेखील हवामान बदलाचाच भाग असून मानवाने इतर प्राण्यांच्या अधिवासांवर (हॅबीटॅट) केलेले आक्रमण व त्यामुळे झालेले प्राणीजन्य विषाणू संक्रमण (झुनेटिक) याची परिणती आहे. अजगरी यंत्राच्या साह्याने पृथ्वीवर बेभान उत्खनन, वनसंहार, अधिवासांवर आक्रमण, जैवविविधतेचा ऱ्हास यामुळे ओढवलेली संकटमालिका आता दिवसेंदिवस अधिक व्याप्त, प्रलयंकारी, क्षणार्धात होत्याचे नव्हते करणारी ठरत आहे. चक्रीवादळे, महापूर, वणवे, उष्मावाढ, भूस्खलन, समुद्रपातळीत वाढ या घटनांचे भीषण परिणाम दररोज प्रत्ययास येत आहेत. मात्र, याचे मुक्तभोगी आहेत जगभरचे सामान्य लोक. म्हणतात ना, 'करे कोई, भरे कोई...'

## पर्यायी विकासप्रणाली :

रॅचेल कार्सन यांच्या 'सायलंट स्प्रिंग' या १९६२ साली प्रकाशित झालेल्या पुस्तकाने बुद्धापासून थोरो-रस्कीन-गांधी या तत्त्वज्ञांनी निसर्गाशी तादात्म्य राखत जगण्याचा जो संदेश मानवजातीला दिला, त्याची मांडणी २० व्या शतकातील विस्तृत अद्ययावत वैज्ञानिक तर्क व तथ्यांसह करून जगाला येऊ घातलेल्या हवामान अरिष्टाविषयी जागे केले. निसर्गव्यवस्थेतील अनाठायी, अविवेकी हस्तक्षेपाचे भीषण धोके सांगितले. मात्र, निर्ढावलेले सत्ताधीश आजही (प्रलंयकारी उत्पाद, उच्छाद, महामारीनंतर) त्याबाबत बेफिकीर जाणवतात. अद्याप निरर्थक वाढवृद्धी, सत्तास्पर्धा, महाकाय उत्खनन, निसर्गाचा महासंहार याला विकास(?) मानतात. आयपीसीसीच्या ताज्या अहवालाने तमाम विकासविषयक प्रचलित प्रतिमाने, प्रारुपांचा पर्दाफाश केला आहे. या दशकात म्हणजे २०३० सालापर्यंत कोळसा, पेट्रोल, डिझेल व वायू वापरास सोडचिठ्ठी दिली नाही; त्यावर आधारित ऊर्जा, वाहतूक उत्पादन, उपभोगे व अन्य सेवासुविधांना नूतनीकृत (रिनेवेबल) होणारे, अक्षय, विकेंद्रित, पर्यावरणस्नेही, स्थानिक, श्रमप्रधान पर्याय 'आत्ता व येथे' अवलंबले नाहीत, तर तापमानवाढ रोखण्याच्या तमाम वल्गना 'शस्त्रक्रिया यशस्वी झाली; पण रोगी दगावला' अशी शोकांतिका ठरेल. कोरोना महामारीनंतर एक सामाजिक-वैज्ञानिक तथ्य अधोरेखित झाले आहे, की 'जोपर्यंत सर्वत्र सर्व सुरक्षित नाही, तोवर कोठेही कुणी एक सुरक्षित नाही.' सोबतच हेदेखील, की पृथ्वी, माय वसुंधराच आजारी झाली तर मानव तंदुरूस्त, सुदृढ, सुखी समाधानी कसा राहू शकेल? गांधीजींनी आयुष्यभर आचारविचारात यावर भर दिला, पर्यावरणस्नेही खानपान, राहणीमान, उपचारपद्धती, कमीत कमी वस्तू व सेवांचा आणि त्यातही सर्वसामान्य लोक वापरत असलेल्या स्थानिक, सार्वत्रिक संसाधनांचा वापर जाणीवपूर्वक केला. मुख्य म्हणजे श्रमप्रतिष्ठा, स्वालंबन व समता हा त्यांच्या जीवनाचा अविभाज्य भाग होता. तात्पर्य, गांधींचे नीतिशास्त्र व अर्थशास्त्र अविभाज्य होते. दक्षिण आफ्रिका व भारतातील त्यांच्या सर्व आश्रमांमध्ये सामूहिकता, सादगी, जात-वर्ण-वंश-धर्म-लिंगभेदनिरपेक्ष समता, सहजभाव ही महत्त्वाची सामाजिक मूल्ये होती.


**(उर्वरित पान २४ वर)**

### सत्याला सामोरे जाण्याची इमानदारी ठेवा

'जो बदल हवा आहे तो स्वत: व्हा' (बी द चेंज यू विश) ही गांधीकृतीच जगाला सर्व नाशापासून वाचवू शकेल. संयुक्त राष्ट्राने २ ऑक्टोबर हा 'आंतरराष्ट्रीय अहिंसा दिवस' म्हणून पाळण्याचे केलेले आवाहन खऱ्या अर्थी 'वसुंधरा बचाव, मानव बचाव' संकल्प आहे. अहिंसा, शांतता, निशस्त्रीकरण, निसर्गाविषयी पूज्यभाव आणि गरज आणि हाव यातील विवेकपूर्ण भेद हा सच्चा गांधीमार्गच जगाला प्रचलित गर्तेतून बाहेर काढून समतामूलक शाश्वत विकास साध्य करू शकेल, यात तिळमात्र शंका नसावी. शेवटी गांधी संदेश एकच 'करके देखो'! गांधी हा केवळ पूजनीय न बनवता अनुकरणीय करण्याचे हे आव्हान आणि अर्थात संधी आहे. भारताने शून्य कार्बन उत्सर्जनासाठी (नेट झीरो इमिशन) पुढाकार घेऊन जगाला हवामान अरिष्टावर मात करण्यासाठी ठोस कृती करण्याचे धाडस करावे. गांधींना निर्यात वस्तू न बनवता, राजघाटच्या समाधीसह गावागावातील पुतळ्याच्या ठिकाणी मोटारगाड्यांच्या ताफ्यात जाऊन फुले वाहून, 'वैष्णव जन' ऐकून दिखावा करण्याऐवजी अंतर्मुख होऊन सत्ता-संपत्ती-प्रतिष्ठेची झूल, कवच झुगारून सत्याला सामोरे जाण्याची, ते खडे बोल ऐकण्याची इमानदारी ठेवली पाहिजे...

# बॅड बँक : बुडित कर्जे व डळमळत्या अर्थव्यवस्थेवर रामबाण?

**सरकारने बँकांच्या कर्जांचे निराकरण करण्यासाठी नॅशनल ॲसेट रिकन्स्ट्रक्शन कंपनी (मर्यादित) स्थापन केली आहे. प्रामुख्याने ज्या सर्व सरकारी बँका आहेत त्यांची मोठी बुडीत कर्जे त्यांच्या खाते पुस्तकांतून काढून वसुलीसाठी या पुनर्रचना कंपनीकडे वर्ग करायची आहेत. म्हणजे बँकांच्या ताळेबंदांत हा अवगुण दिसणार नाही आणि बँका शहाजोगपणे कर्ज देण्याचे कार्य करू शकतील.**



श्रीनिवास खांदेवाले

मूळची मंदी, त्यावर कोरोना काळातील आर्थिक टाळेबंदी व संपूर्ण जनतेचे लसीकरण मंद गतीने होणे (ज्यामुळे श्रमिकांच्या कार्यक्षमतेवर प्रतिकूल परिणाम होतो) या व इतर कारणांनी अजून उद्योजकांमध्ये नवीन गुंतवणुकीबाबत विश्वासाचे वातावरण निर्माण झालेले नाही. परिणामी आर्थिक विकासाचे अंदाज बांधणाऱ्या संस्थांमध्ये चिंतेचे वातावरण आहे.

ॲसोचॅम (ॲसोसिएटेड चेंबर्स ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्री ऑफ इंडिया) व क्रिसिल ह्या मानांकन व उद्योजक संस्थांनी नुकताच (१३ सप्टेंबर २१ रोजी) अंदाज प्रकाशित केला, की पँडेमिक काळातील बहुतेक सवलती आणि उपाययोजना चालू राहणार नाहीत. किरकोळ व्यापार आणि सूक्ष्म-लघू उद्योजकांच्या आर्थिक अडचणींमुळे व इतरांच्या अडचणींमुळे २०२१-२२ या चालू वित्त वर्षात बँकांची थकित कर्जे वाढून मार्च २०२२ पर्यंत ८.५ ते ९.० टक्के म्हणजे १० लाख कोटींच्या पलिकडे पोचण्याची शक्यता आहे.

## गुंतवणुकीतील जोखीम आणखी दीड वर्षे टाळली जाणार

युनायटेड नेशन्स कॉन्फरन्स ऑन ट्रेड अँड डेव्हलपमेंट (UNCTAD) ने असा अंदाज (दि. १६-०९-२१) व्यक्त केला आहे, की २०२१ या वर्षात भारतीय अर्थव्यवस्थेचा विकास दर ७.२ टक्के राहील आणि २०२२ मध्ये तो घसरून ६.७ असण्याची शक्यता आहे. दि. १७-०९-२१ रोजी रिझर्व्ह बँकेने आपल्या अहवालात असे म्हटले आहे, की खाजगी क्षेत्रात २०२०-२१ मध्ये फार कमी नवे प्रकल्प मंजूर झाले व जे प्रकल्प चालू होते ते मंदगती केले गेले. २०२१-२२ या चालू वर्षात बहुतेक बँका आणि वित्तीय संस्थांकडून नवीन प्रकल्पांसाठी बँकांकडून कर्जे घेण्याऐवजी उद्योगांनी विदेशातून कर्जे काढली किंवा शेअर बाजारातून पैसा उभा केला, पण एकूण उत्साह फारच कमी दिसला. २०१६-१७ ते २०२०-२१ या पाच वर्षांत जे प्रकल्प मंजूर झाले, त्यात मुख्य हिस्सा गुजरात-राजस्थान (प्रत्येकी १७ टक्के), आंध्र प्रदेश (१५ टक्के), उत्तर प्रदेश (१३.७ टक्के) आणि महाराष्ट्र (८.५ टक्के) असा होता. सारांश, सध्याचे गुंतवणुकीतील जोखीम टाळण्याचे वातावरण आणखी एक-दीड वर्ष राहण्याची शक्यता आहे. या औद्योगिक वातावरणाशिवाय जागतिक व्यापार संघटनेच्या (डब्ल्यूटीओ) कृषि-व्यापार कराराच्या अटी विकसित देशांच्या बाजूनेच झुकलेल्या आहेत. त्यामुळे विकसनशील देशांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे, असे ३३ देशांच्या गटाच्या आभासी अनौपचारिक बैठकीला संबोधित करताना केंद्रीय वाणिज्यमंत्री गोयल म्हणाले. नोव्हेंबरमध्ये जागतिक व्यापार संघटनेची मंत्रीस्तरीय बैठक होणार आहे. त्यात विकसनशील देशांच्या कृषिला न्याय मिळावा म्हणून या ३३ देशांच्या गटाने प्रयत्न करावेत, असे आवाहन त्यांनी केले. म्हणजे उद्योग व कृषि दोन्ही क्षेत्रे अडचणीत आहेत.

## भांडवलशाहीचे स्वरुप

१९९१ च्या खाजगीकरण-उदारीकरण-जागतिकीकरणाचे धोरण भारताने स्वीकारल्यानंतर आर्थिक व्यवहारांमधून सरकारने बाहेर पडावे, सगळी उत्पादनव्यवस्था खासगी क्षेत्राकडे सोपवावी, उत्पन्न-संपत्ती-कंपन्या यांच्यावरील कर कमी करावेत, उद्योग चालविण्यात सुलभता निर्माण करावी, ही धोरणांची चौकट आपण मान्य केली व त्याचीच (१९९१ पासूनची उरलेली) कार्यवाही अतिवेगाने करून २०२४ च्या लोकसभा निवडणुकांच्या आधी पूर्ण करण्याचा केंद्र सरकारचा आटोकाट प्रयत्न सुरू आहे.

उत्पादनवाढ (म्हणजेच आर्थिक विकास) ही खाजगी क्षेत्रानेच

घडवून आणावयाची आहे असे मान्य केल्यानंतर, त्या व्यवस्थेचे आजच्या संदर्भातील फायदे-तोटे जाणून घेणे महत्त्वाचे ठरते. सरकारच्या दृष्टीने पाहिल्यास, सरकार मागच्या सार्वजनिक क्षेत्रात उद्योग स्थापन करणे, त्यांचे व्यवस्थापन, मालविक्रीची जबाबदारी घेणे या कटकटी कमी होऊन जातात व सरकारचा पसारा आटोपशीर होतो. तोटे असे आहेत, की विकासाचे दर, रोजगारवृद्धी, विकासाची दिशा, सामाजिक कल्याण यांपैकी कशावरच सरकारचे नियंत्रण राहात नाही. त्याबाबत, जसे आज भारत सरकार करीत आहे, तशी उद्योजक वर्गाला विनवणी करण्याचीच भूमिका स्वीकारावी लागते.

## मोठा पेचप्रसंग

खासगी क्षेत्रात उद्योग-व्यापार स्थापन करणारे प्रवर्तक, प्रचालन करणारे व्यवस्थापक दोन-तीन मानवी वैशिष्ट्यांवर आधारित काम करतात : (१) प्रतिस्पर्ध्यांवर मात करून आपल्या विशिष्ट क्षेत्रात एकाधिकार प्रस्थापित करायचा आहे, नाईलाज असेल तेवढी स्पर्धा चालू द्यायची. (२) जास्तीत जास्त नफा कमाविण्याच्या लालसेपायी तेजीचे बुडबुडे आले, बेरोजगारी झाली, सार्वजनिक कल्याण कमी झाले तर त्याची जबाबदारी सरकारने सांभाळावी, याचे तत्त्वज्ञानच बनविले जाते. (३) तोटा होईल याची भीती असल्यामुळे तेजीचा बुडबुडा फुटून तोटा होईल, अशी कल्पना आली व कुणकुण लागल्याबरोबर सगळेच उत्पादक आपापला माल तोटा होऊ नये किंवा कमीत कमी तोटा व्हावा म्हणून किंमत कमी करण्याची स्पर्धा करतात व त्यामुळे किमती घसरून मंदी निर्माण होते व उत्तरोत्तर खोल होत जाते. त्यामुळे खर्च कमी करण्यासाठी रोजगार छटणी, मजुरी दर कमी करणे, तयार माल स्वस्तात विकून टाकणे, उद्योग विकून टाकणे, कर्जे परत न करणे, नादारी जाहीर करणे, दिवाळखोरी जाहीर करणे हे सर्व मार्ग गरजेप्रमाणे वापरले जातात. तेजी आणि भाववाढीचे तसेच मंदीचे आर्थिक प्रश्न निर्माण होतात व त्यांचे परिणाम, व्यवहारांच्या साखळी पद्धतीने, समाजातील शेवटच्या माणसाला भोगावे लागतात. पहिला आघात उद्योग-सेवा-व्यापार क्षेत्रावर होतो. नंतरचा आघात काही अवधीनंतर व खरेदी-विक्रीच्या प्रमाणात कृषि-ग्रामीण क्षेत्रावर होतो. तेजी-मंदीला नैसर्गिक म्हणत दुर्लक्षित केले जाते. मोसमी ताप येतो आणि जातो, तसे तेजी-मंदीबद्दल नेहमी म्हटले गेले. पण आर्थिक विकासाबरोबर अर्थव्यवस्था मोठ्या झाल्या आणि कृत्रिमरीत्या तेजीचे बुडबुडे निर्माण होण्यामुळे व बुडबुडे फुटून मंदी येऊ लागल्यानंतर उद्योजक-व्यापारी, बँका, सेवा उद्योग-मजूर-उपभोक्ते यांच्यावर विघातक परिणाम झाल्यामुळे आर्थिक व्यवहारांची साखळी तुटते, गती मंदावते व आर्थिक चक्र पुन्हा कसे सुरू करावे, असा सगळ्यांत मोठा पेचप्रसंग निर्माण होतो.

## थकित कर्जे व वसुली

भांडवलशाही विकासाच्या पहिल्या १००-१२५ वर्षांत श्रीमंत उद्योजक आपले स्वत:चे भांडवल गुंतवून उद्योग स्थापन करायचे. त्यामुळे उद्योग बुडला तर फक्त त्याचेच नुकसान व्हायचे. पण २० व्या आणि २१ व्या शतकात सगळा समाज बँकांमध्ये आणि इतर वित्तीय संस्थांमध्ये आपल्या बचती आणि ठेवी ठेवतो आणि (समभाग भांडवलाच्या जोडीला) उद्योजक वर्ग सर्व बँकांकडून कर्जे घेऊन उद्योग चालवितो. काही उद्योग प्रामाणिकपणे व्यवहार करूनही परिस्थितीत नियंत्रणाबाहेर बदल झाल्यामुळे बंद पडू शकतात. पण ते उद्योजक सतर्कपणे आधीच विल्हेवाट लावतात. प्रश्न निर्माण झालेला आहे, तो परतफेडीची ऐपत असून स्वेच्छेने कर्जफेड न करणाऱ्या (आणि त्यांची संख्या हजारोंनी वाढत आहे अशा) उद्योजकांचा. प्रत्येक उद्योगाची नोंदणी स्वतंत्र कायदेशीर उपक्रम किंवा व्यक्ती (ङशसरश्र एपींळीूं) मानली जात असल्यामुळे एका कंपनीची कर्जे त्याच औद्योगिक ग्रुपच्या इतर कंपन्यांकडून वसूल करा, असे कायद्याने म्हणता येत नाही. कंपनीच्या नावात शेवटी लिमिटेड शब्द दर्शवितो, की परतफेडीची जबाबदारी त्या उपक्रमात उपलब्ध असलेल्या मालमत्तेपुरतीच मर्यादित आहे. त्यामुळे अब्जोपतीसुद्धा अनेक स्वतंत्र कंपन्या काढून, परतफेडीच्या जबाबदाऱ्या त्या त्या कंपन्यांपुरत्या मर्यादित ठेऊन, आवश्यकता पडल्यास या कंपन्या बुडू देऊनसुद्धा ते स्वत: श्रीमंतच राहतात. नुकसान मात्र बँकांमध्ये बचती आणि ठेवींच्या रुपात ठेवणाऱ्या खातेदारांचे होते. कारण त्यांचा पैसा उच्च व्याजाच्या दराने कर्जाऊ देऊनच बँका आपला नफा कमावितात. कर्जवसुलीसाठी बँका तगादा लावतात. त्यांना दिलेल्या सरकारी निर्देशांनुसार थकित कर्जे परत येत नाहीत. म्हणून जी तूट येते ती भरून काढण्यासाठी चालू नफ्यातून 'तरतूद' (Provisioning) करतात. थकित कर्जांमुळे बँकांचे भांडवल कमी होत आहे म्हणून सरकारने त्यांच्यामध्ये पैसा ओतून त्यांचे पुनर्भांडवलीकरणही (Recapitalisation) केले आहे, ही एक विडंबनाच आहे! वसुलीचे इतर मार्ग नाकाम झाल्यानंतर जी मूळ कर्जे आहेत ती नादारी आणि दिवाळखोरी लवादाकडे निराकरणा (Resolution) साठी पाठवतात. तिथे झालेला निर्णय कर्जदार आणि कर्ज देणाऱ्या 'धनको' संस्था यांना समाधानकारक वाटला नाही तर अपिलीय लवादाकडे जाता येते. नादारी आणि दिवाळखोरी संहितेच्या अंमलबजावणीचे यश निराशाजनकच राहिले आहे. आता सर्व बँकांची थकित कर्जे एकत्र करून त्यांची पुनर्रचना (विल्हेवाट) करण्यासाठी आणखी एक राष्ट्रीय कंपनी (National Asset Reconstruction Company) काढण्याची घोषणा सरकारने केली आहे. वास्तविक पाहता, या बँकेचे शास्त्रीय नाव इतके चांगले असताना तिला गलिच्छ काम करावे लागते म्हणून जगभर (भारतासह) या कंपन्यांना 'बॅड बँक' असेच म्हटले जाते, म्हणून आपणही तोच लोकप्रिय वाक्प्रचार वापरु. त्याआधी आपण या मुद्याबाबतची दोनतीन तथ्ये नमूद करू.

आतापर्यंत थकित कर्जे वसूल करण्याच्या प्रक्रियेत (संसदेत माहिती सादर केल्यानुसार) धनको बँकांची मान्य अशी जी कर्जे होती, त्यांचा ३४ टक्के हिस्साच वसूल करता आला, ६६ टक्के हिश्यावर धनको बँकांना ऋणकोंच्या अडेलट्टूपणामुळे पाणी सोडावे लागले. कर्जात बुडालेल्या १३ व्हिडिओकॉन कंपन्यांकडे सर्व बँकांचे एकूण रु. ६४,८३९ कोटींचे कर्ज आहे. त्या सर्व

कंपन्यांवर मिळून ट्विन स्टार टेक्नॉलॉजीज् या कंपनीने रु. २,६९२ कोटी (म्हणजे फक्त ४.१५ टक्के) ची बोली लावली. शेवटी इतर बँकांच्या सहकार्याने ९४.९८ टक्के कर्जे दिलेल्या स्टेट बँकेने अपिलीय लवादापुढे पुन्हा बोली लावण्यासाठी अर्ज केला आहे. पण शंभर रुपयांची मालमत्ता पाच रुपयांत मिळणे हेच भारतीय भांडवलशाहीच्या यशाचे गमक बनले आहे, असे दिसते.

कंपन्यांचे विवाद सोडविण्यासाठी स्थापन झालेले नॅशनल कंपनी लॉ ट्रिब्युनल आणि त्याचेच अपिलीय ट्रिब्युनल यामध्ये न्यायाधीशांच्या रिक्त जागा सरकार भरतच नव्हते. तेव्हा (एका याचिकेच्या संदर्भात) सर्वोच्च न्यायालयाने सरकारला सांगितले, की तुम्ही दोन दिवसांत नेमणुका करा नाही तर आम्ही करतो. त्यावर सरकारने 'त्वरित' नेमणुका केल्या !

## अनुकूल-प्रतिकूल

बॅड बँकेचे अनेकांनी समर्थन केले आहे. त्याची कारणे अशी : सरकार-कर्जव्यवस्था (निदान आपल्या कार्यकाळात) कोसळायला नको म्हणून, बँक कर्मचारी-इतका चांगला पगार देणारा, सुरक्षित रोजगार नष्ट व्हायला नको, छोटे उद्योजक, कारागीर, मजूर वर्ग-विश्वासाच्या बँका बंद व्हावयास नको, आदिवासी, शेतमजूर, शेतकरी, ग्रामीण कर्मचारी, नागरिक-आम्हाला सरकारी बँकाच तर उपलब्ध आहेत, त्या बंद होऊन कसे चालेल, इत्यादी. विशेषत: १९९१ पासून शासनाचे सरकारी बँकांकडे व त्यातून निर्माण होणाऱ्या सामाजिक कल्याणाकडे दुर्लक्ष होत आहे. सध्याचे सरकार तर सरकारी बँकांना मोठ्या उद्योजकांनी मनमानी लुटावे अशी धोरणे आखत असल्याचा ठपका ठेऊन बँक कर्मचारी संघटना पूर्ण ताकदीने विरोध करीत आहेत. त्यांचे घोषवाक्य सगळ्या जनतेने लिहून खिशात, सदास्मरण म्हणून ठेवण्यासारखे आहे. 'जनतेचा पैसा जनकल्याणासाठी, कॉर्पोरेट्सनी लुटण्यासाठी नव्हे'. सध्याचे सरकार आल्यापासून बुडित कर्जे लपविण्यासाठी २०१५-१६ पासून ते २०१९-२० या काळात रु. ६.३२ लाखांची कर्जे निरस्त (write-off) केली. नंतरच्या काळात त्या ऋणकोंकडून त्यापैकी फक्त १० टक्के कर्जे वसूल झाली. आता तरतूद केलेल्या (घासून पुसून स्वच्छ केलेल्या) मालमत्ता बँका सवलतीच्या दराने बॅड बँकेला देणार आणि बॅड बँकेने आपली सगळी तज्ञता वापरून शेवटी व्हिडिओकॉनसारखी ५ टक्केच वसुली होणार असेल तर एवढ्या वसुली कंपन्या, तज्ज्ञ एवढे अवडंबर कशाला हवे? हा निराशावाद नाही आहे. ही सरकारी धोरणाची नादारी व दिवाळखोरी आहे. बँकांची व्यवस्थापक मंडळी, संचालक (त्यात तथाकथित स्वतंत्र संचालक) मंडळ एवढे अनुभवी, तज्ज्ञ, जाणकार असताना, रिझर्व्ह बँकेचे सतत पर्यवेक्षण असताना, उद्योजकांच्या एवढ्या मोठ्या कर्जांवर सह्या झाल्याच कशा? पूर्वी ग्रामीण भागांत लोक अशिक्षित असताना, स्वाक्षरी करू शकत नसताना, मालमत्तेच्या व्यवहारांमध्ये त्यांच्या सहीच्या जागी लिहिलेले असे की 'नशापाणी न करता डाव्या हाताचा अंगठा केला असे'. एवढा सोपा नियमही कर्ज मंजूर करणाऱ्यांनी पाळलेला दिसत नाही. पण तो लोकांच्या बँकांप्रती असलेल्या विश्वासावर घाव आहे, हेही ओळखले जाऊ नये काय? बँकवाले आमच्या १०० रुपयांचे शेवटी ५-१० रुपयेच करतात, तो तोटा सहन करण्याऐवजी मला माझा पैसा माझ्या घरीच ठेऊ द्या, असे प्रत्येक खातेदाराने म्हटले तर काय होईल? 'न रहे बांस न बजे बांसुरी' अशी अवस्था होण्याची भीती आहे, ती टाळली पाहिजे. **(उर्वरित पान २४वर)**

## बॅड बँक

फेब्रुवारी २०२१ मध्ये २०२१-२२ चा अर्थसंकल्प सादर करताना अर्थमंत्र्यांनी संसदेला सांगितले होते त्याप्रमाणे आता (सप्टेंबर - २१) सरकारने बँकांच्या कर्जांचे निराकरण करण्यासाठी नॅशनल ॲसेट रिकन्स्ट्रक्शन कंपनी (मर्यादित) स्थापन केली आहे. मंत्री महोदयांनी माहिती दिल्यानुसार, प्रामुख्याने ज्या सर्व सरकारी बँका आहेत त्यांची मोठी बुडीत कर्जे त्यांच्या खाते पुस्तकांतून काढून वसुलीसाठी या पुनर्रचना कंपनीकडे वर्ग करायची आहेत. म्हणजे बँकांच्या ताळेबंदात हा अवगुण दिसणार नाही आणि बँका शहाजोगपणे कर्ज देण्याचे कार्य करू शकतील. पण या बँकेकडे अशीच कर्जे वर्ग करायची आहेत, की ज्यांच्यासाठी बँकांनी चालू नफ्याचा एक भाग उपयोगात आणून वसूली पूर्ण (कागदोपत्री) केलेली आहे. म्हणजे वर्ग केलेल्या मालमत्ता विकत घेणाऱ्यांवर जुन्या व्यवहारांचा बोजा राहणार नाही. या बँकेचे ५१ टक्के भांडवल सरकारी बँकांचे असणार आहे. या बँकेला केंद्र सरकारकडून रु. ३०,६०० कोटींचा आधार जाहीर केला आहे. तो रोख न देता बॅड बँकेला खरेदीविक्रीत तोटा आल्यास 'घटनापेक्ष देयता/उत्तरदायित्व' (Contingent Liability) या रुपाने वापरता येईल. बाजार तत्त्वावर प्रत्यक्षात कारवाई पूर्ण करण्यासाठी India Debt Resolution Company Limited (भारतीय कर्ज निराकरण कंपनी मर्यादित) अशी कार्यकारी कंपनी स्थापित केली गेली आहे. तिच्यामध्ये मालमत्तांचे मूल्य ठरविणारे, बाजार परिस्थितीप्रमाणे खरेदी-विक्री किमती ठरविणारे, तांत्रिक भाषेत विक्रीचा तपशील ठरविणारे, ग्राहक शोधणारे वगैरे तज्ज्ञ राहतील. बॅड बँक मालमत्तांचे मूल्य ठरवून सवलतीच्या दराने मत्ता विकत घेईल. ठरलेल्या किमतींच्या १५ टक्के रोख रक्कम व ८५ टक्के रकमेची हमीपत्रे देईल. केंद्र सरकारची हमी असलेल्या सरकारी बँका या वर्षात पहिल्या टप्प्यात रु. ९०,००० कोटींची कर्जे बॅड बँकेकडे हस्तांतरित करतील. पाच वर्षांच्या काळात रु. २ लाख कोटींच्या कर्जांचे निराकरण या बँकेने करावयाचे आहे. ते काम प्रत्यक्षात पूर्ण झाले आणि नवी बुडित कर्जे निर्माण झाली नाही, तर बॅड बँक समाप्त करता येईल आणि सरकारी बँका सुदृढ व पारदर्शी वित्तीय व्यवस्था निर्माण करतील. पण लेखाच्या सुरुवातीलाच आपण नजीकच्या भविष्यातील आर्थिक विकासाचे अंदाज दिले आहेत.

# सामाजिक अत्याचार रोखण्यासाठी...



डॉ. गौतम कांबळे

**जातीय विषमता ही हजारो वर्षांपासूनचा दोन समाजातील सांस्कृतिक संघर्ष आहे. त्याचे स्वरूप अनेकदा सामाजिक अत्याचारात दिसून येते. घटनाकारांनी संविधानाच्या माध्यमातून सामाजिक सौहार्द प्रस्थापित करण्याचे प्रयत्न केले. मात्र बहुसंख्य समाजाची मानसिकता संविधानविरोधी करण्याचे सातत्याने प्रयत्न सुरू असल्याने यात अपेक्षित यश येत नाही. बौद्ध समाजाने निर्धारपूर्वक संघटितपणे विनियोजित प्रतिकारशक्ती उभी केली तर अत्याचाराला काही प्रमाणात का होईना, अटकाव होऊ शकतो.**

तुलनेने मराठवाड्यात अधिक भूमिहीनता, विशेष करून दलित समाजात. जमिनीमध्ये अहोरात्र कष्ट उपसणारा हा समाज. मात्र त्याच्या नावावर सुईच्या टोकावर मावेलइतकीही जमीन नाही, अशी अन्यायी अवस्था. सेंट्रल प्रोव्हिन्समधील झाडीपट्टीतील भागात पस्तीस-चाळीस वर्षांपूर्वी 'जबरन ज्योत'च्या चळवळीत कसायला जमीन मिळण्याच्या आशेने येऊन आंध्रच्या सीमेलगतचा मराठवाड्यातील धर्मांतरित बौद्ध व मातंग समाज चंद्रपूरजवळील जिवती तालुक्यातील वनीखुर्द गावात कसाबसा वसला. सरकारने त्याला घरे दिली. या नव्या गावात मातंग समाजाची ६५ व बौद्ध समाजाची २५ घरे. ओबीसी समाजाचीही काही घरे. १९८३ मध्ये गंगाराम गबाले यांनी बाबासाहेबांची जयंती साजरी करण्यास सुरुवात केली. मातंग व बौद्ध समाज मिळून जयंती करायचे. गावात मुक्तीचे वातावरण संचारायचे. रात्रंदिवसाच्या काबाडकष्टाचे ते एक प्रकारे परिमार्जनच होते. काही वर्षांनी अण्णा भाऊ साठे यांची जयंती साजरी करण्याचा प्रस्ताव आला, तेव्हा दोन्ही समाजांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. 'जग बदल घालूनी घाव, सांगून गेले मला भीमराव' या अण्णा भाऊंनी दिलेल्या संदेशाचा प्रभाव बौद्ध समाजावर होताच. त्यामुळे बिनातक्रार या दोन्ही जयंत्या होत होत्या. यानंतर काही लोकांनी सप्ताह (देवाचे कीर्तन) करण्याचे ठरविले. त्यालाही बौद्ध समाजाने मातंग समाजमनाचा विचार करून कुठलीही हरकत घेतली नाही, उलट सक्रीय सहभाग घेतला. गावांमध्ये अल्पसंख्य समाजाला धर्मनिरपेक्षतेचा संविधानात्मक तसेच बौद्ध जीवनशैलीत्मक अर्थ सर्वधर्मसमभाव असाच घ्यावा लागतो, ही वस्तुस्थिती आहे. गावगाडा असाच चालतो म्हणतात.

## मातंग समाजात असूयेची बीजे

काही वर्षांनी मातंग समाजाला असे वाटले, की आंबेडकर जयंती, धम्मचक्र प्रवर्तनदिन व बुद्ध जयंती अशा अनेक कार्यक्रमांप्रसंगी आम्हाला वारंवार वर्गणी द्यावी लागते. त्या तुलनेत बौद्ध समाज केवळ एक-दोनदाच वर्गणी देतो. मग त्यांनी निर्णय घेतला, की बौद्ध व मातंग समाज आपापल्या वेगवेगळ्या जयंत्या साजऱ्या करतील. बौद्ध समाज त्यालाही राजी झाला. जयंत्या वेगवेगळ्या होऊ लागल्या. बौद्ध समाजात जागरूकता अधिक असल्याने ते जयंतीच्या कार्यक्रमांसाठी दुप्पट-तिप्पट वर्गणी काढू लागले. त्यामुळे बौद्ध समाजाचे कार्यक्रम मातंग समाजाच्या तुलनेत अधिक भव्य, भारदस्त, प्रबोधनात्मक व फलदायी होऊ लागले. दोन्ही समाजांच्या जयंत्यांसाठी दोन्ही समाजांचे काही लोक आर्थिक पाठबळ व सहभागही देत. मात्र मातंग समाजात असूयेची बीजे पडत गेली.

काही वर्षांपूर्वी गावात गोखले व बरोडे नावाचे कार्यकर्ते आले. गोखले मातंग समाजाच्या घरी जाऊ लागला. "तुम्ही धर्मांतरित बौद्धांपेक्षा वेगळे आहात, त्यांचा जयभीम तुमचा होऊ शकत नाही. हजारो वर्षांपासून नसानसात व हाडात भिनलेला धर्म त्यांनी सोडला. त्यांच्या दुरवस्थेस कोणताही माणूस किंवा धर्म कारणीभूत नसून त्यांचे पूर्वजन्मीचे पापकर्म आहेत. आताही ते पुण्यकर्म न करता पापकर्मच (धर्म बुडवून) करीत आहेत. त्यांचा जयभीम घेऊन त्यांच्या पापकर्मात तुम्ही सहभागी होऊ नका," असा उपदेश त्यांनी मातंग समाजाला केला. मातंग समाजाच्या काही घरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे फोटो उलटे लटकविण्याचाही त्यांनी प्रयत्न केला. तेव्हा त्यावेळच्या बहुसंख्य मातंग गृहस्थांनी त्यांना प्रखर विरोध केला, भांडणही केले. काही दिवसांनी हेच लोक (गोखले व बरोडे) बौद्ध समाजाकडे आले, त्यांनाही उपदेश केला. बौद्धांनी त्यांना प्रतिसाद देत त्यांचा कार्यक्रम आयोजिला. तिथे मातंग समाजाचे काही लोक आले. त्यांनी या उपदेशकांची खरी ओळख बौद्धांना करून देत या उपदेशकांना घरचा रस्ता दाखवला.

मात्र काही दिवसांनी मातंग समाजातील काही तरूण या उपदेशकांच्या गळाला लागले. त्यांनी गोखल्यांना आमंत्रित केले.



गोखले-बरोडेंची भडकावू भाषणे होऊ लागली. 'मांगाच्या रक्ताचे असाल तर समोर या' अशी आव्हानात्मक भाषा त्यांची होती. त्याचा परिणाम हळूहळू होत गेला. दोन समाजांतील संवादाचे माध्यम असलेला 'जयभीम' मातंग समाजाकडून नाकारला गेला, बाबासाहेबांच्या प्रतिमा बाजूला झाल्या. संयुक्तपणे जयंती साजरी करण्याची जबाबदारीही संपुष्टात आली. दोन समाजांमधील दीर्घकाळापासून चालत आलेला संवाद, जिव्हाळा, प्रेम सगळे आटत गेले अन् आढ्यता आली. नंतर तेढ व त्यामागे तिरस्कार.

## तणाव निर्माण होऊ लागले

गावात समाजमंदिर बांधकाम मजूर आले. मात्र सार्वजनिक जागा बुद्धविहाराशेजारीच उपलब्ध होती. तिथे बांधकाम करण्याचा गावनिर्णय झाला. त्यालाही बौद्ध समाजाने संमती दिली. मात्र या संमतीचा दुरूपयोग होऊ लागला. बुद्धविहार व मंदिराच्या स्वरूप व कार्यप्रणालीतच मुळात जमीन-अस्मानचे अंतर आहे. ते अंतर नंतरच्या बहुसंख्य तरूण पिढीने न जोपासल्याने दोन समाजात तेढ निर्माण होणे स्वाभाविक होते व झालेही तसेच. विहारातील रोजच्या वंदनेचा आवाज मंदिराला बोचू लागला, पुढे तो असह्य झाला. परिणामी रोजचे वाद अधिक तणाव निर्माण करू लागले.

बहुजन समाज पक्षाच्या अभिलाश भगतसारख्या कार्यकर्त्याने या दोन समाजाला एकत्र आणण्याचा बराच प्रयत्न केला. ग्रामपंचायत निवडणुकीत बौद्धांनी २०-२५ वर्षे मातंग समाजाच्या लोकांना लोकप्रतिनिधी म्हणून निवडून आणण्यात एकजुटीने हातभार लावला. मात्र यावेळी बौद्ध व्यक्तीस प्रतिनिधी म्हणून निवडून आणण्याचा प्रस्ताव मांडला, तेव्हा मातंग समाजाने त्यांना साथ दिली नाही. पुढे त्यांच्यात धुसफुस सुरूच राहिली. पंचरंगी ध्वजाचे लाकूड आमच्या शेतातील आहे, असे म्हणून मातंग समाजातील एका व्यक्तीने झेंडाच उचलून नेला. पाच वर्षांपूर्वी लहुजी साळवे यांची जयंती दोन्ही समाज एकत्रितरित्या साजरी करायचे. त्या कार्यक्रमात नरसिंग मोरे नावाच्या वक्त्याने 'महार आपले दुश्मन आहेत' असे जाहीर वक्तव्य केले. यातून तणावच वाढणार होता. या तणावाची मजल बाबासाहेबांच्या जयंतीला मातंग समाजातील लोकांनी भांडण करण्यापर्यंतसुद्धा गेली. समता सैनिक दल व पोलिसांच्या बंदोबस्तात आंबेडकर जयंती अनेकदा साजरी करावी लागली. बौद्ध समाजात कांबळे परिवार सर्वाधिक शिक्षित आहे, शहराशी संबंध ठेऊन आहे. त्यांना बाहेरील चार गोष्टी समजतात, म्हणून ते मातंग समाजाचे टार्गेट होत असतात.

## 'खैरलांजी' घडविण्याचा होता डाव

दोन समाजातील या तणावाला खैरलांजीसारखा शेतातील-रस्त्यावरील वाद हासुद्धा एक कंगोरा आहेच. कांबळे यांच्या शेताच्या सभोवती गावातील इतर शेतकऱ्यांच्या रस्त्यांची वहिवाट आहे. त्यामुळे कांबळे यांना जनावरांचा खूप त्रास व्हायचा. शेजारी ओबीसी समाजातील शेतकऱ्यांची शेती आहे. यातील गिरमाजी नावाचे शेतकरी पूर्ण रस्ता हडपण्याच्या प्रयत्नात होते. त्यांना मातंग व ओबीसी समाजाची साथ होती. पण कांबळे यांचा शेतीचा पट्टा असल्यामुळे ते लोक तसे करू शकले नाहीत. मात्र मनातील अपयशाची खदखद वाढतच गेली. हे प्रकरणसुद्धा बरेच काळ चालले. बौद्ध समाजात मतभेदातून दोन गट निर्माण होण्यामागे प्रेमप्रकरणाचाही वास आहे. प्रमोद कांबळे यांचा नातलग व हुक्के परिवारातील मुलीचे हे प्रेमप्रकरण. एका रात्री ते दोघे पळून गेले. त्यांना शोधण्यासाठी हुक्के कुटुंबियांनी प्रमोद कांबळेंची मदत मागितली. प्रमोद कांबळेंनी पुढाकार घेऊन त्या प्रेमी युगुलांना शोधले व पोलिसांच्या हवाली केले. मात्र तोपर्यंत मातंग समाजातील काहींनी, यामागे प्रमोद कांबळेच आहे, असे हुक्के कुटुंबियांना सांगितल्याने चित्र पालटले. प्रमोद कांबळे व त्यांच्या कुटुंबियांबद्दल हुक्के कुटुंबियांमध्ये रोष निर्माण झाला. परिणामतः बौद्ध समाजाची एकजूट अधिक क्षीण झाली.

गावातील बौद्ध महिलांनी वर्गणीतून लाऊडस्पीकर घेतला होता. सकाळ-संध्याकाळ वंदना व बुद्धगीतांचा आवाज घुमू लागला. याचा इतर समाजाला त्रास होऊ लागला, तेव्हा वेळ व आवाज कमी करण्याचे प्रयोग झाले. शेवटी १० ते १५ मिनिटांवरच ते आले. नंतर तर वंदना माईकशिवायच होऊ लागली. मात्र यामुळे समस्या सुटली नाही. माईकसेटचे वायर, पताका तोडण्याच्या तक्रारी पोलिसांपर्यंत गेल्या. मात्र पोलिसांनी याची दखलही घेतली नाही. त्यामुळे दोन समाजातील वातावरण अधिक तणावपूर्ण होत गेले.

## त्या दिवशी काय घडले?

२१ ऑगस्ट २०२१ च्या दोन दिवस अगोदर मोहर्रमचा डोला गावात आला. तो पूर्ण गावभर फिरविण्यात आला. त्यात जादूटोणा करणाऱ्यांची नावे सांगितली होती. विशेष म्हणजे, डोला गावात आणण्यासाठी बौद्ध समाजाकडून वर्गणी घेतली होती. गावातील दोन बौद्ध घरात आजारी व्यक्ती होत्या. त्यांच्यावर व इतर मागासवर्गीय व

मातंग समाजातील व्यक्तींवर उर्वरित बौद्ध समाजातील काही व्यक्ती करणी करतात, असा प्रचार केला गेला. त्यामुळे दोन बौद्ध घरे, मातंग समाज व ओबीसी समाज यांचा जमाव ओबीसी समाजाच्या चौकात जमा होऊ लागला. बौद्ध समाजालाही तिथे विचारविनिमयासाठी बोलावण्यात आले. गेलो नाही तर परिस्थिती अधिक चिघळून मोठे संकट यायचे, या भीतीने बौद्ध समाजाचे लोक तिथे उपस्थित झाले. तिथे मातंग समाजातील दोन बायांच्या अंगात आले व त्यांनी बौद्ध समाजाच्या वस्तीच्या दिशेने मातीची ढेकळं फेकून मारली आणि अकस्मात बौद्ध समाजातील मिळेल त्या महिलांना लाठ्या-काठ्यांनी बेदम मारहाण सुरू झाली. ही मारहाण सतत दोन तास सुरूच होती. त्यात दोन व्यक्तींची डोकी फुटली, एकाची फासळी तुटली, दोघांचे हात मोडले. ज्यांनी हा रक्तपात थांबवण्याचा प्रयत्न केला त्यांचे दोरखंडांनी हातपाय बांधून त्यांनाही नृशंसपणे मारण्यात आले. बौद्ध समाजातील कोणत्याही व्यक्तीला गावाबाहेर जाण्याची परवानगी नव्हती. रस्त्यावर ते लोक नजरा ठेऊन होते. गावात नेटवर्क नसल्याने संपर्क पूर्णपणे तुटला होता. जीवावर उदार होऊन दत्ता कांबळे यांनी जंगलातील पायवाटेने जाऊन पोलिसांना या घटनेची माहिती दिली. ठाण्यापासून गाव केवळ अडीच किलोमीटरवर असूनही पोलिस उशिरा आले, तेही गावाबाहेरच थांबले. गावच्या सरपंचाने पोलिसांना थांबवून ठेवले होते. बौद्ध वस्तीतून लोकांना हुडकून काढण्याचे प्रयत्न झाले. जो कुणी त्या पीडित व्यक्तींना मदत करेल त्यालाही बेदम मारण्यात आले. एका मुलाने पीडित माऊलीला पाणी दिले म्हणून त्यालाही मारण्यात आले. गावात पोलिस आणले असा संशय घेऊन या व्यक्तीला खुद्द सरपंचाने बाहेर काढून आरोपींच्या हवाली केले. त्याला निर्दयपणे मारहाण करण्यात आली. बऱ्याच वेळाने पोलिस गावात आले, आरोपी पोलिसांचेही ऐकत नव्हते. पीडितांना तिथेच जाळायचे, मारून टाकायचे असे जमाव म्हणत होता. त्यासाठी काहींच्या हातातील काठ्या सरसावत होत्या. जमावाचा मनसुबा तर खैरलांजीची पुनरावृत्तीच करण्याचा होता, असे दिसले. दिवसाची वेळ असल्याने व पोलिसांचा उशिरा का होईना हस्तक्षेप झाल्याने ते होऊ शकले नाही. पण हा ट्रेलर असून पिक्चर भविष्याच्या गर्भात आहे की काय, अशी भीती बौद्ध समाजात आतापर्यंतही कायम आहे. या समाजाला आणखी किती काळ भयग्रस्त वातावरणात जगावे लागणार, याचे उत्तर सरकार, पोलिस यंत्रणा, राजकीय पक्ष कार्यकर्ते, सामाजिक संघटना यापैकी कुणाकडेही नाही.

## सांस्कृतिक संघर्षातून सामाजिक अत्याचार

वस्तूतः आजपर्यंत देशातील बहुतेक गाव-खेड्यामध्ये असा सामाजिक अत्याचार कधी ना कधी झालेला आहे, होत आहे व भविष्यातही होणार आहे. देशातील पावणेसहा लाख खेडी जातीय विषमतेची गटारेच आहेत. हा खरे तर, हजारो वर्षांपासूनचा दोन समाजातील सांस्कृतिक संघर्ष आहे. त्याचे स्वरूप अनेकदा सामाजिक अत्याचारात दिसून येते. घटनाकारांनी संविधानाच्या माध्यमातून सामाजिक सौहार्द प्रस्थापित करण्याचे प्रयत्न केले. मात्र बहुसंख्य समाजाची मानसिकता संविधानविरोधी करण्याचे सातत्याने प्रयत्न सुरू असल्याने यात अपेक्षित यश येत नाही. अशा प्रतिकूल स्थितीत वैराची रेषा कमी करता येणे शक्य नसेल, तर आपली रेषा जिद्दीने-चिकाटीने वाढवत राहणे हा एकच प्रभावी मार्ग समोर येतो. त्यासाठी सर्वांगीण प्रगतीचा मार्ग दाखवणाऱ्या आचरणात्मक बौद्ध धम्माचे प्रारूप समाजामध्ये विकसित केले पाहिजे. संघटितपणे काम करून बौद्ध समाजाने विनियोजित अशी प्रतिकारशक्ती उभी करणे आता नितांत गरजेचे आहे. आपल्या सामाजिक संघटनांनी राजकीय अवस्थेचे रडगाणे थांबवून याकडे लक्ष दिले पाहिजे. समाजात बुद्धाची सकारात्मक अहिंसा रुजविण्याबरोबरच सामाजिक चारित्र्य निर्माण केले पाहिजे. ते धर्मांतरित बौद्ध समाजाचे कर्तव्य आहे. ते पार पाडण्यासाठी बुद्धिनिष्ठ व चिंतनशील, सुशिक्षित नेतृत्वाने पुढे यावे. समाजानेही भेदाभेद, अहंकार व स्वप्रतिष्ठा बाजूला ठेऊन त्यांना उत्स्फूर्त प्रतिसाद द्यावा. सामाजिक अत्याचार यामुळे थांबू शकतात. ●●●

**(लेखक सामाजिक व आर्थिक समता संघाचे कार्यकर्ते आहेत)**

## घटना जातीयवादातून घडलेली नाही?

ही घटना घडल्यानंतर राजकीय पुढारी व पोलिस यंत्रणेने शांतता प्रस्थापित करण्याच्या निमित्ताने हे प्रकरण दाबण्याचा प्रयत्न केलेला दिसतो. एकतर ही घटना दोन दिवस प्रकाशात आलीच नाही. राजकीय पक्षांचे पुढारी, कार्यकर्ते गावात आले. आरोपींसह इतरांना भेटले. मात्र पीडितांना न भेटताच निघून गेले. समाजमाध्यमे ही स्त्रियांतील वादाचे कारण होती, जो अंधश्रद्धा, जादूटोण्याच्या आरोपातून उद्भवला. यात जातीवाद-तेढ वगैरे मुळीच नव्हती, असे सांगतात. पोलिससुद्धा गुन्हेगारांना सोडून निरपराधांना वेठीस धरतात, अटकही करतात. सरपंच लगेच आरोपींच्या जमानतीसाठी झटतात. हे वास्तव काय दर्शवते? समाजाला ही घटना जातीवाद वाटत नाही. करणी, जादूटोणा करणारे शांताबाई कांबळे, पऱ्यागबाई हुक्के, साहेबराव हुक्के, एकनाथ हुक्के, धम्मशीला हुक्के, पंजुबाई कांबळे व शिवराज कांबळे हे सगळे बौद्ध समाजातील आहेत? मातंग समाजाच्याच स्त्रियांना करणी का होते? काही वर्षांपूर्वी सुग्रीव शिंदे यांनी चोंडीराम तेलंगे यांच्या घरातून जादूटोण्याची सामग्री बाहेर काढली. मग त्यांना कोणी काही जाब का विचारत नाही? जेव्हा शांताबाई कांबळे घराघरातील स्त्रियांचे बाळंतपण करीत होत्या, तेव्हा त्यांच्यावर जादूटोणा केल्याचे आरोप का झाले नाहीत? करणी करणारी माणसे बौद्धेतर समाजातील असती तर त्यांनाही अशीच जीवघेणी मारहाण झाली असती का? पीडितांना मारहाणीच्या वेळी बाबासाहेबांना अपमानित करणारी, त्यांना आयाबहिणीवर शिव्या देणारी भाषा का वापरली जाते? बौद्ध समाजाकडून वर्गणीच्या रुपात पैसे घेताना करणी झाली नाही का? असे प्रश्न प्रख्यात सामाजिक कार्यकर्त्या व महिला संघाच्या प्रमुख प्रा.डॉ. विमल थोरात आपल्या सत्यशोधक समितीसह पीडित समाजाला भेटल्या तेव्हा १९-२० वर्षांच्या कोवळ्या युवकाने त्यांना विचारले, तेव्हा आसमंत निःशब्द झाला.

# धर्मांतरविरोधी कोल्हेकुई निष्प्रभ ठरवत धम्मक्रांती



डॉ. रोहिदास जाधव

**डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या धर्मांतराच्या घोषणेनंतर समाजातील व्यक्ती, संस्था आणि संघटनांनी अगदी थयथयाट केला. विविधवृत्त आणि निर्भीडसारखी मोजकी वृत्तपत्रं सोडली तर बहुतांश वृत्तपत्रांनीही बाबासाहेबांना लक्ष्य बनवलं होतं. आपलं हितअहित कशात आहे याची समज नसलेल्या ज्ञातिबांधवांनीदेखील बाबासाहेबांच्या धर्मांतराच्या घोषणेविरोधात सनातन्यांच्या सुरात सूर मिसळला. धर्मांतराच्या घोषणेवर आक्रमक प्रतिक्रिया देत विरोधाची धार तीव्र करण्याचे बरेच प्रयत्न झाले; पण या कोल्हेकुईकडे दुर्लक्ष करीत आपल्या निर्णयावर ठाम राहत बाबासाहेबांनी धर्मांतर केले. त्यांनी केलेल्या धम्मक्रांतीने वंचितांचं विश्व प्रकाशमान झालं.**



डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी १३ ऑक्टोबर १९३५ रोजी येवले (जि. नाशिक) येथे ऐतिहासिक धर्मांतराची घोषणा केली आणि जागतिक पातळीवर प्रतिक्रियांचा अक्षरश: पाऊस पडला. उलटसुलट चर्चांना उधाण आले. या चर्चेत वृत्तपत्रे, व्यक्ती, संस्था, संघटना सहभागी झाल्या. या सर्वांनी अविचाराचा जो उच्छाद मांडला, त्याला सीमा राहिल्या नव्हत्या. या चर्चेला सुरुवात झाली ती १८ ऑक्टोबर १९३५ रोजी प्रसिद्ध झालेल्या 'केसरी' वृत्तपत्रातील अग्रलेखाने! 'धर्मांतराने काय मिळणार?' असा अग्रलेख केसरीने लिहिला आणि तेथूनच चर्चेला तोंड फुटले. केसरीने लिहिले, ''हिंदू धर्मातील वरिष्ठ जातीच्या पुढाऱ्यांनी आजवर पुष्कळ प्रयत्न केले व सध्या ही चळवळ जोरात चालू असून तिचा इष्ट परिणाम दिसू लागला आहे; परंतु असा प्रयत्न करणाऱ्या पुढाऱ्यांबद्दल फुकटच्या सहानुभूतीचा एक शब्दही न बोलता, जणू काय हिंदू धर्मातील सर्वच स्पृश्य पुढारी आपले शत्रू आहेत अशा आविर्भावाने त्यांच्याविरुद्ध त्रागा करून, 'हा मी चाललो परधर्मात' अशी धमकी देणे ही अदूरदर्शीपणाची कमाल होय. असल्या धमकीने अनिष्ट प्रक्रिया सुरू होऊन अस्पृश्यता निवारणाचे कार्य अधिक दुष्कर होईल.'' केसरीने बाबासाहेबांना अदूरदर्शी ठरवले, त्यांच्या धर्मांतराची टर उडविली आणि एक प्रकारे धमकीही दिली.

## आघाडीच्या वृत्तपत्रांचा थयथयाट

पुण्याच्या 'सकाळ'ने 'आंबेडकरांचा आततायीपणा' या शीर्षकाखाली लिहिलेल्या अग्रलेखात म्हटले, ''डॉ. सोळंकी, मा. राजभोज वगैरेंसारख्या आंबेडकरांच्या सहकाऱ्यांनाही त्यांचे भाषण पसंत नाही. जर सवर्णीय हिंदूंना हिंदू समाज संघटित होऊन जोमदार बनावा असे वाटत असेल, हजारो वर्षांच्या सनातन धर्मास नवीन पालवी फुटून तो वृक्ष फोफवावा असे वाटत असेल, तर अस्पृश्यता नष्ट झालीच पाहिजे हे ज्याप्रमाणे स्पृश्य हिंदूंचे कर्तव्य आहे, त्याचप्रमाणे डॉ. आंबेडकरांसारख्यांनी कितीही उपदेश केला तरी सर्वच अस्पृश्य डॉ. आंबेडकर बनणार नाहीत, हे पाहणेही हरिजन पुढाऱ्यांचे कर्तव्य आहे.'' ही 'सकाळ'ची

भूमिका बाबासाहेबांना न्याय देणारी नव्हती. 'नवाकाळ'ने म्हटले, ''हरिजनांचा सर्वप्रकारे उद्धार व्हावा आणि त्यांच्यावरील अस्पृश्यतेचा कलंक स्वच्छ धुतला जाऊन त्यांना समानतेचा दर्जा प्राप्त व्हावा म्हणून म. गांधी व त्यांचे अनुयायी हिंदुस्थानभर जिवापाड श्रम करीत असता डॉ. आंबेडकरांनी धर्मांतराची धमकी द्यावी याचे सर्वांस सखेद आश्चर्य वाटले. उच्च शिक्षणामुळे डॉ. आंबेडकरांच्या गळ्यात हरिजनांच्या पुढारीपणाची माळ पडली, तरीसुद्धा महात्माजींप्रमाणे हरिजनांकरता डॉ. आंबेडकरांनी काहीच श्रम चालवले नाहीत, हे उघड आहे.'' नवाकाळने केलेली बाबासाहेब आणि म. गांधींमधील तुलना अनाठायी होती.


## सनातनी मंडळींनी ओकली गरळ

वृत्तपत्रांनी जशी बाबासाहेबांच्या विरोधात भूमिका घेतली, तशीच काही सनातनी मंडळीही गरळ ओकताना दिसली. १५ नोव्हेंबर १९३५ रोजी 'केसरी'त सिद्धेश्वर बळवंत अभ्यंकर यांचे पत्र प्रकाशित झाले. त्यात ते म्हणाले, ''हिंदू समाजाच्या दृष्टीने आम्ही एवढेच म्हणू की, ज्या आंबेडकरांना आपल्या धर्माची चाड नाही की समाजाची आस्था नाही, ज्यांनी मनुस्मृतीसारख्या जगन्मान्य अशा अत्युतम ग्रंथाची केवळ त्यात अस्पृश्यतेचे प्रतिपादन आहे म्हणून होळी केली, ज्यांनी सायमन कमिशनपुढे 'अस्पृश्य हे हिंदू नव्हेत' असे बेदरकारपणे सांगितले, राष्ट्रीय सभेने कायदेभंग पुकारुन स्वातंत्र्याचे रणशिंग फुंकले असताना ज्यांनी हिंदूंच्या पारतंत्र्याचे द्योतक असणाऱ्या इंग्रजांच्या कोरेगाव येथील जयस्तंभावर पुष्पहार घातले, असे एवंगुणविशिष्ट आंबेडकर जरी बाटून परधर्मात गेले तरी हिंदू समाजाचे वा धर्माचे यत्किंचितही वाकडे होणार नाही.'' अभ्यंकरांच्या या प्रतिक्रियेमुळे अनेक व्यक्तींनी आपली प्रतिक्रिया देण्याचे धाडस दाखविले. अभ्यंकरांनंतर नाशिकच्या ब्राह्मणांनी, 'आता काळाराम मंदिर सत्याग्रह मागे घेणार' असा आनंद व्यक्त केला. २९ नोव्हेंबर १९३५ ला ना.ग. जोशी यांची धर्मांतराच्या घोषणेवरील एक उपहासगर्भ कविता 'केसरी'ने छापून आणली. ती मुळातून वाचण्यासारखी आहे. याच तारखेच्या अंकात, 'डॉ. आंबेडकर व हिंदू महासभा' या नावाचा लेख वामन नारायण कुबेर यांनी छापून आणला. त्यातील भूमिका कट्टर हिंदुत्ववाद्याची होती. या काळात प्रसिद्ध होणाऱ्या पत्रांमधून, लेखांमधून बाबासाहेबांचा जाणीवपूर्वक 'अंबेडकर' असा उल्लेख येताना दिसतो. अ.ह. गद्रे हे हिंदू सुधारक होते. त्यांनी बाबासाहेबांच्या धर्मांतराच्या घोषणेवर आधारित अनेक व्यंगचित्रे रेखाटली. डॉ. मुंजे यांनी 'डॉ. आंबेडकरांना हिंदू महासभेचे अध्यक्ष करा,' अशी उपहासाने मागणी केली. पंडित सातवळेकर नावाचे एक हिंदू पंडित होते. 'पुरुषार्थ' नावाचे मासिक ते चालवायचे. या पंडिताने कुत्सितपणे म्हटले, 'आंबेडकर हे महार असल्यामुळे त्यांच्या समाजात त्यांचे मोठेपण आहे. ब्राह्मणात त्यांच्यासारखे बुद्धिमान बॅरिस्टर खूप आहेत. त्यांनी महार राहण्यातच त्यांचे मोठेपण आहे. म्हणून त्यांनी धर्मांतर करू नये.' सातवळेकर यांच्या या लेखाला मात्र बाबासाहेबांनी सडेतोड उत्तर दिले. कोणत्याही विषयात प्रवीण असलेल्या, कोणत्याही पंडित ब्राह्मणाशी वाद-विवाद करायला

## 'विविधवृत्त' व 'निर्भीड'ची संयत भूमिका

'ज्ञानप्रकाश'ने हिंदू धर्मात राहूनच डॉ. आंबेडकरांनी अस्पृश्यतेचा प्रश्न सोडवावा, असा सल्ला दिला होता. मसूरहून 'विश्वोद्धार' नावाचे पत्र प्रकाशित व्हायचे. त्याने लिहिले होते, डॉ. आंबेडकरांनी खुशाल हिंदू धर्म सोडावा. अशीच भूमिका मुंबईच्या 'प्रवाशी'ने मांडली होती. जवळपास सर्वच वृत्तपत्रांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या धर्मांतराच्या घोषणेच्या विरोधात आणि तितकीच आक्रस्ताळी भूमिका घेतली. अपवादाने विविधवृत्त आणि निर्भीडने संयत भूमिका घेतली. त्यांनी लिहिले, डॉ. आंबेडकरांवर शिव्याशापांचा वर्षाव करून, त्यांना धमक्या देऊन त्यांच्या धर्मांतराच्या मार्गातील अडचणींचा पाढा वाचून, अस्पृश्यांना हिंदू धर्माची महती सांगून हिंदू समाजाला आपले मरण टाळता येणार नाही. डॉ. आंबेडकरांच्या विरुद्ध काही भाडोत्री किंवा भोळसट हरिजन हाताशी धरून त्यांच्याकरवी आंबेडकरांचा निषेध करून, मूठभर लोकांच्या किंवा मुळीच न भरलेल्या सभांचे खरे-खोटे अहवाल वर्तमानपत्रात प्रसिद्ध करवून आंबेडकरांना हाणून पाडण्याचे प्रयत्न तर परिणामी आत्मघातीपणाचे ठरल्याखेरीज राहणार नाहीत, हे निश्चित समजावे. अशी आत्मचिंतनपर भूमिका घेणारी वृत्तपत्रे अपवादानेच होती. 'केसरी' हे वृत्तपत्र इतर वृत्तपत्रांचे पुढारीपण करणारे या काळातील मुख्य पत्र होते. 'केसरी बोले आणि दल हाले' अशीच सर्वांची अवस्था होती. त्यामुळे साहजिकच 'केसरी'तून प्रकट झालेल्या विचारांचे अनुकरण इतर वृत्तपत्र करत.

बाबासाहेब तयार झाले आणि म्हणाले, मी धर्मांतर करण्याने जर माझा मोठेपणा नाहीसा होत असेल आणि धर्मांतरात जर माझ्या बांधवांचे हित असेल तर खुशाल माझा मोठेपणा बुडू दे, मला ते चालेल, असे त्यांनी सातवळेकरांना सुनावले. बनारसचे राज राजेश्वर शास्त्री बरळले की, अस्पृश्य वर्ग हा रक्तपिती भरलेल्या मुलासारखा वर्ग आहे. त्याचा संसर्ग हिंदू धर्मातील इतर वर्गाला लागू नये. असे अनेक गृहस्थ होते ज्यांनी अतिशय तिखट प्रतिक्रिया दिल्या होत्या. काहीजण दिखाऊ प्रतिक्रिया देत होते, पण त्या मनातून काही उद्धाराच्या नव्हत्या. उदाहरणार्थ सहभोजनाचे प्रात्यक्षिक दाखविण्याची वेळ जेव्हा आली, त्यावेळी श्री.म. माटे यांनी काढता पाय घेतला होता. शंकराचार्य डॉ. कुर्तकोटीसुद्धा असेच होते. त्यांनी पुण्यातल्या हिंदू महासभेच्या अधिवेशनात अस्पृश्यता निवारणाच्या ठरावावर भाषण केले, पण त्यातील सहभोजने व आंतरजातीय विवाहाचा उल्लेख टाळला. कारण पंडित मालवीय अध्यक्ष होते आणि त्यांनी सहभोजने व आंतरजातीय विवाह हे महासभेच्या कार्यक्षेत्रातील विषय नाहीत, असे सांगितले होते. हे जरी खरे असले तरी कुर्तकोटी भाषणात म्हणाले होते, दुसऱ्यांना वाईट म्हणण्याऐवजी आपण पवित्र राहण्याची सनातन्यांनी खबरदारी घ्यावी. गंगेत गटाराचे पाणी



सोडण्यात येते म्हणून ती बिघडत नाही, तर ती त्या गटारातील पाण्यालाच पवित्र करते. डॉ. कुर्तकोटी यांचा 'गटार' असा उल्लेख अस्पृश्यांना तर 'गंगा' हा शब्दप्रयोग हिंदू धर्माला अनुसरून होता हे ध्यानात घ्यावे लागेल. त्यामुळे सहानुभूती दाखवणारे अनेक जण जरी असले तरी त्यांचा अंतर्गत कावा काही वेगळाच होता.

## तरीही बाबासाहेब अविचल होते

या प्रवृत्तीला अनुसरूनच १५ फेब्रुवारी १९३६ च्या 'जनता' च्या अंकात डॉ. आंबेडकरांनी 'उडदामाजी काळे-गोरे' नावाचा अग्रलेख लिहिला. अनेक प्रकारच्या प्रतिक्रिया येऊनही बाबासाहेब अविचल होते, केलेल्या घोषणेवर ठाम होते. त्यांच्या कोणत्याच कार्यावर विपरित परिणाम झाला नव्हता. हे पाहून 'केसरी' कंपूने काही अस्पृश्य पुढाऱ्यांना हाताशी धरले. त्यांच्या माध्यमातून विरोध तीव्र करण्याचे ठरविले. यात के.के. सकट नावाचे मातंग पुढारी, पां.ना. राजभोज, एम.सी. राजा इत्यादींचा उपयोग केला गेला. गुजराथमधील हिंदू पुढारी जयसुखलाल मेहता, मथुरादास विसनजी, सर पुरुषोत्तम ठाकूर यांनी एक सभा घेतली. त्या सभेचे अध्यक्षपद 'मूळदास विश्म' नावाच्या एका अस्पृश्य गृहस्थाकडे दिले. या अध्यक्षांनी, आम्हाला हिंदूंनी अमानुष रितीने वागवले हे खरे, तरी पण आम्ही हिंदू धर्मात राहू, असे उद्गार काढले. पी. बाळू, काजरोळकर, देवरुखकर या अस्पृश्य पुढाऱ्यांनीही धर्मांतराला विरोध केला. बाळकृष्ण देवरुखकर म्हणाले, आंबेडकरांनी धर्मांतर केले तर स्पृश्य-अस्पृश्य अशा दोन्ही समाजाचे नुकसान होईल. हरिजनांनी धर्मांतर करून फायदा नाही. नारायण काजरोळकर म्हणाले, धर्म सोडणे ही एक प्रकारची आत्महत्याच आहे. धर्म हा व्यापाराचा विषय नव्हे. अलीकडे हरिजनांची स्थिती सुधारण्याची सर्वत्र खटपट सुरू आहे. अशा वेळी डॉक्टर साहेबांनी काढलेल्या उद्गाराचा निषेधच केला पाहिजे. चर्मकार समाजाचे दुसरे नेते पी. बाळू म्हणाले, डॉक्टर साहेबांच्या भाषणाला काही लोकांनी विनाकारण महत्त्व दिले असून बहुसंख्य हरिजन समाज आपला हिंदू धर्म सोडण्यास सहसा तयार होणार नाही, असा मला विश्वास वाटतो. याचबरोबर राजभोज, गवई, ठवरे यांनीही धर्मांतराच्या विरोधात पत्रके काढली. 'विविधवृत्त'ने याची जाणीवपूर्वक दखल घेतली आणि बाबासाहेबांच्या धर्मांतराच्या कार्याला एक प्रकारे पुढे नेण्याचा प्रयत्न केला. २७ ऑक्टोबर १९३५ रोजी 'विविधवृत्त'ने या सगळ्या पुढाऱ्यांच्या प्रतिक्रियांची दखल घेऊन लिहिले, आंबेडकर यांच्याविरुद्ध आपले टीकास्त्र उपसणारे हे पुढारी काय योग्यतेचे आहेत हे अजमावून घ्यायचे असल्यास एक लहानसा प्रयोग करून पाहण्याजोगा आहे. रा.ब. श्रीनिवासन, नागपूरचे ठवरे, गवई आणि मुंबईचे बाळू यांनी आपल्या अनुयायांची परिषद बोलवावी आणि भाषणे करून पहावीत. त्यांना बंडू नाना आणि पांडू तात्या यांनी भरवलेल्या साहित्य संमेलनाचा अनुभव आल्याशिवाय राहणार नाही, अशी माझी खात्री आहे. 'विविधवृत्ता'च्या प्रतिक्रियेने या पुढाऱ्यांची झोप उडवली. त्यांना जमिनीवर आणले आणि पुढे काहींनी बाबासाहेबांच्या धर्मांतराच्या घोषणेच्या सुरात सूर मिसळला.

अशातच पुण्यातील न. चिं. केळकर यांची प्रतिक्रिया आली. ते म्हणाले, डॉ. आंबेडकरांनी धर्मांतर केल्यास अस्पृश्य त्यांना विश्वासघातकी म्हणतील. केळकरांची ही भूमिका मत्सरातून आलेली दिसते. 'भाला'कार भोपटकर यांनी तर, 'बाबासाहेबांसारखे बहकलेले काही अस्पृश्य, हिंदू धर्मातून जितके लवकर जातील तितके जास्त चांगले होय' असे चीड आणणारे विधान केले होते. शंकराचार्यांचे शिष्य स्वामी जेरीशास्त्री यांनी अस्पृश्यता हे धर्माचे एक अनुल्लंघनीय अंग आहे आणि अस्पृश्यांना शिवल्यानंतर स्नान करण्याचा 'श्रीं'नी उपदेश केल्याचे' ही त्यांनी सांगितले. महादेवशास्त्री दिवेकर यांनी 'धर्मांतर म्हणजे देशद्रोह व समाजद्रोह... परधार्जिणी फितुरीवृत्ती!' अशा शब्दांत धर्मांतराच्या घोषणेची संभावना केली. या सर्व पातळ्यांवर विविध स्वरूपाच्या प्रतिक्रिया उमटत असताना बाबासाहेब आपल्या घोषणेप्रती ठाम होते, निश्चल होते, अढळ होते. त्यांच्या घोषणेने सारा भारत नव्हे जगाच्या कानाकोपऱ्यातून तीव्र स्वरूपाच्या प्रतिक्रिया उमटत होत्या. महात्मा गांधींनाही बाबासाहेबांची धर्मांतराची घोषणा अविश्वसनीय वाटली आणि समजा केली असेल तर त्यांनी ती दुर्दैवी ठरवली. मद्रास येथून डॉ. राजेंद्र प्रसाद यांनी धर्मांतराविषयी नाराजी व्यक्त केली. (टाइम्स ऑफ इंडिया १७ ऑक्टोबर १९३५). अशा अनेक मान्यवर पुढाऱ्यांनी, व्यक्ती, संस्थांनी डॉ. आंबेडकरांनी हिंदू धर्मात राहण्यातच त्यांचा अधिक विकास असल्याचे प्रतिपादन केले. पण डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी धर्मांतराची ठाम घोषणा केली आणि प्रतिक्रियांचा अक्षरशः पाऊस कोसळला. हा प्रतिक्रियांचा पाऊस १४ ऑक्टोबर १९५६ पर्यंत असाच बरसत राहिला....

●●●

**(लेखक आंबेडकरी चळवळीतील कार्यकर्ते आहेत)**



बी. जी. वाघ

# ईहवादी धर्म घेत असतात माणसाचा शोध

धर्म एक चक्रव्यूह

**धर्म हा मुळात मानवी अस्तित्वाचा शोध आहे. हे जग, जीवन यांचा निर्माता कोण, हा मूलभूत प्रश्न आहे. ते ईश्वरी कृत्य आहे असे मानणारे धर्म म्हणजे चिद्वादी. यहुदी, ख्रिश्चन, मुस्लिम, पारशी, हिंदू आदी सर्व धर्म ईश्वरप्रणित आहेत. ईश्वरप्राप्ती हे या धर्मांचे मुख्य ध्येय आहे. जगायचे ते केवळ मुक्तीसाठी, मोक्षासाठी किंवा स्वर्गप्राप्तीसाठी. या क्षुद्र लौकिक जगापलीकडे काहीतरी अलौकिक आहे, ही धारणा जगण्याला उमेद देते. त्यामुळे माणसाला आपल्या दु:खांचा विसर पडतो. दु:ख निवारणासाठी ईश्वराला शरण जाणे हा एकमेव उपाय आहे. त्याचा अवलंब करायचा असेल तर देवांकडे घेऊन जाणाऱ्या एका मध्यस्थ वर्गाला शरण जावे लागते. तो पुरोहितवर्ग होय. इहवादी धर्मात हा वर्ग अस्तित्वातच नसतो. इहवादी धर्म ईश्वराचा नव्हे, तर माणसाचा शोध घेत असतात. माणसाचा धर्म हा रानटी अवस्थेतून माणसाबरोबरच उत्क्रांत झाला आहे.**

हिंदू धर्म फार प्राचीन समजला जातो; परंतु असा धर्म बुद्धकाळात अस्तित्वातच नव्हता. त्या वेळी होत्या त्या विचारधारा, धार्मिक परंपरा किंवा काही पंथ. त्या वेळी बऱ्याचशा हिंदू देवता अस्तित्वात नव्हत्या किंवा ज्या देवता होत्या, त्या आज अस्तित्वात नाहीत. सर्वच धर्मातील प्राचीन देवता आज अस्तित्वात नाहीत. याचे मुख्य कारण मानवी प्रज्ञेचा, प्रतिभेचा झालेला विकास व बदललेली जीवनदृष्टी. धर्म मुळात भयमूलक आहेत. मृत्यू व मृत्यूनंतरचे जग यावर धर्मांची उभारणी झालेली आहे. माणसाला मृत्यूचे भय नसते तर धर्म आणि देवांची निर्मितीच झाली नसती. आपले देव आणि धर्म शेवटी निसर्गपूजेतूनच निर्माण झाले आहेत. पुढे त्यातून देव, दैववाद, नियतीवाद या कल्पना पुढे आल्या. हॉब्जने असे म्हटले आहे, की 'अदृश्य शक्तीची वाटणारी भीती व तिला मिळणारी समाजमान्यता म्हणजे धर्म होय आणि तिला न मिळणारी मान्यता म्हणजे अंधश्रद्धा होय.' इहवादाचा अर्थच मुळी- जगावर समरसून प्रेम करा, जगा आणि जगू द्या. डोळ्यांना दिसणारे, रोज अनुभवायला येणारे नित्य नूतन जग हेच सत्य आहे. मृत्यू आणि मृत्यूनंतरचे जग यांचा विचार करणे सोडून द्या, कारण तसे जग असल्याचा कोणताही पुरावा नाही- असा आहे. प्रोटॅगोरसने (ख्रिस्तपूर्व ४८१) आपल्या 'On the Gods' या पुस्तकात म्हटले आहे की, ईश्वराविषयी आदर बाळगूनही म्हणावेसे वाटते की, तो अस्तित्वात आहे की नाही ते सांगता येत नाही.

## धर्मनिरपेक्षा, तत्त्वज्ञानापेक्षा माणसे विचाराने श्रेष्ठ

मनुष्य हाच सगळ्या गोष्टींचे मोजमाप आहे. आपले धर्म,



तत्त्वज्ञान किंवा विज्ञान जर मानवाच्या उन्नतीसाठी नसतील तर त्यांचा काय उपयोग? आपण जाणतो ते तरी कशासाठी? आपला सारा शोध आनंदासाठी, आत्मानुभूतीसाठी आहे. मुक्तीसाठी, महानतेसाठी आहे. हे जग जड आहे की चैतन्यशील, हा वाद थेट चार्वाक, बुद्धापासून आहे. ॲरिस्टॉटल हा त्याचा पुढे मुख्य प्रवक्ता झाला. त्याने 'ईश्वर म्हणजे शुद्ध विचार' असे म्हटले आहे. जी माणसे अतिमानवी शक्तीचा दावा करतात, ती भोंदू आणि दांभिक असतात. जन्माला आलेली कुठलीही व्यक्ती अमर होऊ शकत नाही. अमर असते ती माणसाची आकांक्षा, त्याची स्वप्ने, ध्येये, विचार. ॲरिस्टॉटलने म्हटले आहे, की 'माणसे नव्हे तर त्यांचे विचार अमर्त्य असतात.' इहवाद हा विचार मुळात पश्चिमेचाच आहे. कारण त्यांची (ग्रीक, रोमन) जीवनदृष्टी भौतिक व तर्कशुद्ध आहे. म्हणूनच एपिक्यूरसने (इसवीसनपूर्व ३४१ ते २७०) म्हटले आहे, की 'सामान्य माणसाचा विवेक, त्याची विचारशक्ती ही

कुठल्याही धर्म आणि तत्त्वज्ञानापेक्षा श्रेष्ठ आहे.' माणसाच्या भीतीचे मूळ 'धर्म' आणि 'मृत्यू' आहे, असेही त्याने म्हटले आहे. एपिक्यूरसने धर्मातील अंधश्रद्धा, दैववाद, नियतीवाद याला प्रचंड विरोध केला. धर्माला त्याचा विरोध हा धर्मातील क्रूरतेच्या कारणावरून होता. ऑलिम्पिक देवदेवतांना नरबळी देण्याची प्रथा होती. भारतात ब्रिटिश अमलापर्यंत नरबळी चालू होते. भारतात काही धार्मिक कर्मकांडांत माणसाचे मांस खाण्याची पद्धत होती. ती ब्रिटिशांनी बंद केली. 'मॉब लिंचिंग' किंवा नरबळीसारख्या घटनांतून आपण आजही धर्माच्या नावाने क्रूरता अनुभवतो.

## जैन धर्म व बौद्ध धर्म

जैन धर्माने आत्म्याचे अस्तित्व मात्र मानले आहे. दुष्कृत्यांमुळे माणसाला वारंवार जन्म घ्यावे लागतात. तथापि, सर्वोच्च आणि पूर्ण असा आत्मा जन्म-मृत्यूच्या फेऱ्यातून मुक्त होतो. त्याला 'अर्हत' म्हणतात. बौद्ध धर्मातही सर्वोच्च अस्तित्व अर्हत हेच आहे. अर्हत म्हणजे पूर्ण ज्ञानी. सम्यक दर्शन (सम्यक श्रद्धा), सम्यक ज्ञान, सम्यक चारित्र्य यांना 'जैनांची त्रिरत्ने' म्हणतात. बौद्ध धर्मात बुद्ध, धम्म, संघ ही त्रिरत्ने आहेत. सम्यक श्रद्धा म्हणजे महावीरांच्या सर्वश्रेष्ठतेवर व प्रमादरहित अवस्थेवर विश्वास. वर्धमान महावीर सर्वज्ञ आहेत आणि त्यांनी सांगितलेले तत्त्वज्ञान सत्य आहे, अशी श्रद्धा ठेवणे म्हणजे 'सम्यक दर्शन' होय. महावीरांचे तत्त्वज्ञान समजून घेणे म्हणजे सम्यक ज्ञान. सम्यक ज्ञानात अनेक विचारांचा समावेश होतो. महावीरांनी सांगितलेल्या धर्माप्रमाणे आचरण करणे म्हणजे सम्यक चारित्र्य. जैनांमध्ये संघ पद्धत आहे, पंचशील आहे. ते म्हणजे : अहिंसा, सत्य, अस्तेय, अपरिग्रह, ब्रह्मचर्य; परंतु बुद्धाने मध्यममार्ग स्वीकारला आहे. बुद्धाने धर्माला नावेची उपमा दिली आहे. तो म्हणतो, 'ती तुम्हाला किनाऱ्यापर्यंत पोहोचवील. पुढचा प्रवास तुम्हालाच करायचा आहे.' बुद्ध मुक्तिदाता नाही, तर मार्गदाता आहे. बुद्धाची सत्याची कल्पना सापेक्ष आहे, कर्मठता नाही. बुद्ध योग्य-अयोग्यतेचा निर्णय घेताना 'मानवाचे कल्याण' हीच कसोटी वापरत. त्यामुळे बौद्ध धर्माला 'विश्वधर्म' म्हणून सहज मान्यता मिळाली. जैनांच्या समजुतीप्रमाणे प्रत्येक प्राण्याच्या ठायी पाप हे जन्मसिद्धच आहे. माणसाचा जन्म मिळणे याचा अर्थ, मागच्या जन्मीचे पाप भोगणे असा आहे. अशा या पापी देहापासून शुद्ध व पवित्र आत्म्याची सुटका करणे हे माणसाचे कर्तव्य आहे. त्यासाठी शरीराला क्लेश देणे आवश्यक आहे. त्यासाठी उपवास करावेत, हवापाणी वर्ज्य करावेत, आत्महत्या करावी अशा एकापेक्षा एक वरचढ पायऱ्या सांगितल्या आहेत. सल्लेखना पवित्र आहे. त्यामुळे जैन धर्म बौद्धांप्रमाणे विद्रोही असला, तरी आचरणाने अत्यंत कर्मठ आहे. बौद्ध धर्म मध्यममार्गी आहे.

## विचारधारांचा, मतमतांतरांचा मेळ

बुद्ध कुठल्याही गृहीत कल्पना, प्रस्थापित धर्म, धर्मग्रंथ, परंपरा, बहुसंख्याकवाद म्हणजे बहुसंख्य सांगतील तेच सत्य असे मानत नाही. बुद्धाने आपल्या पहिल्या प्रवचनात म्हटले आहे, की 'भिक्खूंनो, दोन अतिरेकी जीवनपद्धतींचा त्याग करा. पहिली पद्धत म्हणजे अखंड सुखोपभोग, विषयवासनांचा अतिरेकी पाठलाग जो अंती दु:खालाच कारणीभूत होतो. दुसरी पद्धत म्हणजे सर्व सुखांचा त्याग, अतिरिक्त इंद्रियदमन, स्वत:चा केलेला शारीरिक व मानसिक छळ, यामुळेही ज्ञानप्राप्ती होत नाही. म्हणून अंती ते सारे दु:खदायकच आहे. त्यामुळे मध्यममार्ग स्वीकारा. तो सत्याप्रति आपल्याला जागृत करील, ज्ञान मिळवून देईल. अंती आपण निब्बाण प्राप्त करून घ्याल.' बुद्ध याला 'सुवर्णमध्य' म्हणतो. सर्व अतिरेकांचा त्याग... हे जग दु:खी आहे याचे कारण माणसातील अतिरेकी वृत्ती, प्रवृत्ती, विचार. निसर्गाला हा अतिरेक मान्य नसतो. म्हणून अशी राज्ये, राज्यकर्ते नष्ट होतात.

## धर्मग्रंथांची चिकित्सा होणे आवश्यक

जीवनाचा मूळ हेतू आनंद मिळवणे आहे. त्यासाठी सर्व प्रकारच्या धार्मिक दहशतीपासून मुक्त असणे आवश्यक असते. देशात जेव्हा राजकीय सत्ता व धर्मसत्ता एकत्र येतात, तेव्हा माणसांच्या कत्तलीही धार्मिक अभिनिवेशाने होतात व त्यांचा राजकीय फायदा सत्ताधाऱ्यांना होत असतो. धर्माचे इहवादी असणे त्यासाठीच आवश्यक असते. आपल्या आयुष्याचे नियंत्रण तथाकथित धर्मसत्तेकडे असणे हेच मुळात चूक आहे. धर्मसत्तेचे बळ धर्मग्रंथांत असते. त्यासाठी धर्मग्रंथांची चिकित्सा होणे आवश्यक असते. ते तेव्हाच शक्य होईल, जेव्हा राजसत्ता धर्मापासून मुक्त असेल. जडवादातील पहिला चैतन्यवादी प्लॉटिनस (२०५ ते २७० ए. डी.) हा होता. त्याने काही इंद्रियातीत अनुभव घेतले होते. लाइबनिझने सर्व चराचर सजीव असे म्हटले. प्राचीन काळापासून सर्व मानवी संस्कृती बहुदेववादी होत्या. म्हणजेच त्या निसर्गपूजक होत्या. कांट, शोपेन, हॉवर, हेगेल हे चैतन्याच्या बहुविधतेविषयी लिहीत राहिले. त्यांच्यावर बौद्ध धर्माचा पगडा होता. बुद्ध मुळात जडवादी की चैतन्यवादी, याविषयीही वाद झाले आहेत. कारण बुद्धाचे रूपांतर देवात झाले. ते त्याने कधीही मान्य केले नसते. बुद्धाने ईश्वर, आत्मा, पुनर्जन्म नाकारल्यामुळे तो पूर्णत: जडवादी होता, हे लक्षात येते. निब्बाण ही कल्पनादेखील मृत्यूनंतरच्या अस्तित्वाची नाही. बुद्धाने धर्म आणि तत्त्वज्ञानाला अध्यात्माच्या जंगलातून सोडवून माणसांच्या सोयीसाठी उत्तम निगा राखलेल्या बागेत नेले. मुळात बौद्ध आणि जैन या विचारधारा श्रमण संस्कृतीतून विकसित झालेल्या आहेत. त्या फार प्राचीन परंपरा (ऋग्वेदपूर्व) आहेत. महावीर हे चोविसावे तीर्थंकर होते. काही बौद्ध परंपरांत बुद्धाआधीही अनेक बुद्ध होऊन गेल्याचे म्हटले आहे. महावीरांनी ईश्वर, वेद, यज्ञ आणि वर्णाश्रमधर्म या साऱ्यांनाच नाकारले आहे. 'माणूस जन्माने नव्हे तर कर्माने श्रेष्ठ असतो', असे त्यांनी म्हटले आहे. निसर्गदेवतांच्या पूजांना त्यांनी विरोध केला आहे. कोणाही साधूने अथवा साध्वीने देवदेवतांविषयी बोलू नये, असाही त्यांचा दंडक होता. देवांकडून सहाय्य मिळविण्यासाठी याचना करणेही त्यांनी निषिद्ध ठरवले.

पुढे याच तत्त्वांवर लाओत्से या चिनी दार्शनिकाने (ख्रिस्तपूर्व ६०४-५३१) आपले 'ताओ' हे जगप्रसिद्ध तत्त्वज्ञान उभे केले आहे. 'ताओ'वरही बुद्धाचाच प्रभाव आहे. या मध्यममार्गी भूमिकेमुळेच बौद्ध धर्म लोकप्रिय झाला. जगभर पसरला. भारतात त्याचा प्रसार रोखण्याचा ब्राह्मण्यवादी वैदिकांनी खूप प्रयत्न केला; परंतु बुद्धाचे व्यक्तिमत्त्वच इतके असाधारण होते, की त्यांना बुद्धाला शरण जावे लागले. वैदिकांना त्यामुळे स्वत:मध्ये पुष्कळ बदल करून घ्यावे लागले. विशेषत: त्यांना मांसाहार सोडावा लागला. यज्ञ पद्धतीमुळे त्यांना अनेक आर्थिक, सामाजिक व राजकीय लाभ मिळत होते. ते त्यांना गमवावे लागले. त्यामुळे वैदिकांनी बुद्धाला कधीही क्षमा केली नाही. सम्राट अशोकाच्या काळात तर बौद्ध धर्म हा राष्ट्रधर्म झाला. अशोकाने इतर राज्यांना निव्वळ राजकीयदृष्ट्याच मांडलिक केले नाही, तर सांस्कृतिक व बौद्धिकदृष्ट्याही मांडलिक केले. बौद्ध तत्त्वज्ञानामुळेच विज्ञान आणि इतर क्षेत्रांतही नवे शोध लागले. नव्या कला बहरल्या. भौतिक व नैतिक विकासाने शिखर गाठले. भारत व्यापार आणि उद्योगाचे एक जागतिक केंद्र बनला. हा इहवादी तत्त्वज्ञानाचा आणि जीवनदृष्टीचा परिणाम होता.

बुद्धाने स्वत: काही लिहून ठेवले नव्हते. त्याच्या शिकवणुकीचे एकत्रीकरण व अद्ययावतीकरण अजातशत्रूच्या प्रथम संगीतिकेत झाले. त्यावेळी बुद्धाचा शिष्य आनंद व महाकश्यप हजर होते. दुसरी महापरिषद बुद्धाच्या मृत्यूनंतर दोनशे वर्षांनी (इसवी सनपूर्व ३८३) वैशाली येथे झाली. थेरावाद व महायानासारखे दोन उपपंथ निर्माण झाले. विनयपिटकातील दहा वादग्रस्त मुद्यांवर चर्चा होऊन विनयपिटक दुरुस्त करण्यात आले. तिसरी संगीतिका वा महापरिषद सम्राट अशोकाच्या काळात झाली. तिचे अध्यक्ष मोगलीपुत्र तिस्सा होते. या वेळी बौद्ध संघातील वैचारिक व नैतिक भ्रष्टाचारावर चर्चा झाली. अशा भ्रष्ट भिक्खूंना संघातून बाहेर घालवण्यात आले. हे भिक्खू वैदिकच होते, ज्यांना संघात फूट पाडून गोंधळ निर्माण करायचा होता. 'अभिधम्मपिटक' याच परिषदेत रचण्यात आले. चौथी संगीतिका सम्राट कनिष्काने काश्मीर येथे भरवली. त्या वेळी प्रथमच संस्कृतमध्ये चर्चा करण्यात आली. अभिधम्मपिटकाचे संस्कृतमध्ये भाषांतर करण्यात आले. वसुमित्र, अश्वघोषसारखे महापंडित या परिषदेत हजर होते. महायान व हीनयान असे दोन पंथ याच परिषदेत निर्माण झाले. त्यांचा प्रभाव आजही टिकून आहे. या चारही धम्म परिषदांतूनही बहुविध विचारधारांचा, मतमतांतराचा मेळ घालण्यात आला. बुद्धाच्या शिकवणुकीला अंतिम रूप देण्यात आले. सुरुवातीला महासंघिका विरुद्ध स्थवीरवाद होता. स्थवीरवादातून पुढे थेरावाद विकसित झाला. तो दक्षिण आशियात आजही मोठ्या प्रमाणात आचरणात आहे. महासंघिकातून महायान पंथ निर्माण होऊन तो पूर्व आशियात पसरला. महायान पंथाचे मुख्य अध्वर्यू नागार्जुन होते. त्यातून प्रज्ञापारमिता सुत्त, लोटस सुत्त (सद्धर्म पुंडरिका) या काही नव्या सूत्रांची रचना झाली. साधारणत: ख्रिस्तपूर्व पहिल्या शतकात यांची निर्मिती झाली आहे. नागार्जुनाचे मध्यमाका स्कूल हिंदू धर्माच्या (वैदिकांच्या) पुनरुज्जीवनास कारणीभूत ठरले, असे म्हटले जाते. त्याचा प्रभाव आद्य शंकराचार्यांवरही आहे. चौथ्या शतकात महायानामुळे विज्ञानवाद ही नवीन विचारधारा (School) पुढे आली. असंग व वसुबंधू तिचे प्रवर्तक होते. हीनयान पंथातूनही अनेक तात्त्विक भूमिका पुढे आल्या. त्यातून अनेक नवीन ग्रंथ निर्माण झाले. वसुबंधूने अभिधम्मकोशाची निर्मिती केली. हीनयान आणि महायान या दोन्ही पंथांत वसुबंधूचे कार्य असाधारण आहे. बुद्धघोषाने पाचव्या शतकात 'विसुद्धीमागा'ची रचना श्रीलंकेत केली. बुद्धघोष हाच थेरावादाचा आद्य कुलगुरू आहे.

## मध्य आशियात बौद्ध धर्माचा प्रसार

मध्य आशियात बौद्ध धर्माचा प्रसार पहिल्या शतकातच झाला. पाचव्या शतकात तो संपूर्ण चीनमध्ये पसरला. कुमारजीवांनी तेराशे बौद्ध धर्मग्रंथांचे चिनी भाषेत भाषांतर केले आहे. चीनमधून बौद्ध धर्म तिसऱ्या शतकात व्हिएतनाममध्ये पसरला. तेथून तो कंबोडिया, बर्मा, थायलंडमध्ये पोहोचला. सहाव्या शतकात तो कोरियातून जपानमध्ये पसरला. सातव्या शतकात कोरियाने बौद्ध धर्माला राजमान्यता दिली. याच शतकात त्याचा तिबेटमध्ये प्रवेश झाला. तिबेटमध्ये नवव्या शतकात बौद्ध धर्मीयांचा छळ सुरू झाला; परंतु त्यामुळे बौद्ध धर्म अधिकच मजबूत झाला. बौद्ध वाङ्मयाची चीनमध्ये मोठ्या प्रमाणात भाषांतरे झाली. लोटस सूत्रातून चीनमध्ये तिऑन ताई (Tion Tai) व हुआवू बेन हे दोन पंथ निर्माण झाले. झेन संप्रदायाचे मूळ लोटस सूत्रातच आहे. ताओ, बुद्ध आणि कन्फ्युशियस यांनी आधुनिक चीनला घडवले आहे. इंडोनेशियातील बोरोबुदूर हे जागतिक धर्मस्थळ बौद्ध धर्माच्या सामर्थ्याची साक्ष देते. पुढे मुस्लिम धर्मामुळे बौद्ध धर्माची वाढ खुंटली. भारतात मात्र बौद्ध धर्माचीच मुळे खोलवर रुजलेली होती. नालंदा, विक्रमशीला, ओदान्तपुरी ही बौद्ध विद्यापीठे जागतिक मान्यता असलेली ज्ञानकेंद्रे होती. जगातील विद्वान तेथे भेट देत शिकवत आणि शिकतदेखील. ही विद्यापीठे धर्म, तत्त्वज्ञान, विज्ञान, आरोग्य अशा सर्वच विषयांचे शिक्षण देत असत. भावविवेका, कंदकीर्ती, दिग्नाक, धम्मकीर्ती असे महान आचार्य तेथे होते.

बौद्ध धर्माच्या वाढीतल्या तिसऱ्या टप्प्यात वज्रयानाचा किंवा तांत्रिक बुद्धीझमचा समावेश होतो. त्याचा संबंध महायानाशी आहे. बौद्ध धर्माचे हे अध:पतित रूप आहे. हे पंथ गूढ शक्तींची साधना करीत व त्यात स्त्रीला साधनेसाठी वापरत. जपानमध्ये अशाच प्रकारे पंथ वाढले. साधारणत: सातव्या शतकापासून भारतात बौद्ध धर्माचा ऱ्हास सुरू झाला. मुस्लिम आक्रमणे हे त्याचे एक कारण होते. वैदिकांनी बौद्ध धर्मात प्रवेश करून त्याचे हिंदुत्वीकरण करण्याचा आटोकाट प्रयत्न केला. त्याची फळे आता दिसू लागली होती. 'क्रांती-प्रतिक्रांती' या ग्रंथात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी या विषयाचा सखोल आढावा घेतला आहे. बौद्ध धर्मातच तंत्रविद्या, पूजापाठ, भविष्य अशा अंधश्रद्धा पसरल्या. बुद्ध हा विष्णूचा अवतार असल्याच्या प्रचाराला लोक भुलले. त्यामुळे जनतेपुढे बौद्ध धर्म हा पर्याय राहिला नाही. बौद्ध भिक्खूंची मोठ्या प्रमाणात कत्तल झाली. त्यांचे वाङ्मय नष्ट करण्यात आले. बौद्धविहारांचा ताबा घेऊन त्यांचे मंदिरात रूपांतर

करण्यात आले. राजसत्तेच्या अभावी बौद्ध त्यांचा प्रतिकार करू शकले नाहीत. याचा अर्थ राजकीय, धार्मिक व सांस्कृतिक सत्तांतर झाले होते. इस्लामी आक्रमकांनी बौद्ध विद्यापीठे नष्ट केली. त्यामागेदेखील हे सांस्कृतिक सत्तांतरच होते. परंतु इस्लामवरही बौद्ध धर्माचा प्रभाव सुफीझमच्या रूपाने दिसून येतो. चीनमध्ये मात्र कन्फ्युशिझम, ताओइझम आणि बुद्धीझम परस्परांत मिसळून गेले.

### बुद्धाच्या समतावादी विचारधारेची प्रेरणा

भारतात बौद्ध धर्म अस्तित्वात राहिला नाही. त्यामुळे बौद्ध धर्माचे नाही; परंतु देशाचे अपरिमित नुकसान झाले. बौद्ध धर्म समता, स्वातंत्र्य, बंधुता या तत्त्वांचा पुरस्कर्ता होता. बुद्धाने असे काहीही सांगितले नाही जे विज्ञानाच्या विरोधी आहे. भारतात त्यानंतर अज्ञान आणि अंधश्रद्धेलाच महत्त्व आले. वर्णव्यवस्था बळकट करण्यासाठी शूद्र-अतिशूद्रांचे शिक्षण नाकारण्यात आले. त्यामुळे ते विवेकहीन होऊन कूपमंडूक वृत्तीचे झाले. विज्ञान मागे पडून वर्णाश्रमधर्माचे स्तोम माजवण्यात आले. अर्थात, बौद्ध धर्माचा प्रभाव येथील प्रागतिक विचारधारांवर सुरुवातीपासून आहे. हिंदू धर्मात जे जे काही सुंदर आहे, ते बौद्ध धर्मातूनच आले आहे. वैदिकांना ते नष्ट करता आलेले नाही. भक्तिपंथ, सुफीझम, वारकरी संप्रदाय, कबीर, गुरू नानक, रोहिदास, संत मीराबाई, बसवेश्वर, तुकाराम आदी समतावादी विचारधारांची प्रेरणा बुद्धच राहिले आहेत. जगभर मात्र बौद्ध धर्माचा प्रभाव टिकून आहे. बौद्ध राष्ट्रांच्या चारित्र्यावर व संस्कृतीवर बुद्धाचा सखोल प्रभाव आहे. थेरावादाचा प्रभाव श्रीलंका, थायलंड, लाओस, कंबोडिया, म्यानमार येथे विशेष जाणवतो. महायान पंथाचा प्रभाव चीन, तैवान, कोरिया, व्हिएतनाम, जपान आदी देशांत जास्त आहे. ●●●

**(लेखक निवृत्त सनदी अधिकारी आहेत)**

## (पान ११ वरून) हवामान अरिष्ट, महामारी निवारणार्थ गांधीमार्ग...

**पूजा नको, अनुकरण हवे :** आजमितीला साऱ्या मानवजातीला भेडसावणाऱ्या हवामान अरिष्ट व महामारीच्या भीषणतेपासून जगाला वाचवण्यासाठी तसेच सामाजिक-आर्थिक विषमता, वंश-वर्ण-धर्म-लिंग आधारित विसंवाद, हिंसा आणि पर्यावरणीय-परिस्थितीकी विध्वंस या समस्यांवर मात करण्यासाठी आज गांधीप्रणित विकासप्रणाली व जीवनशैली अवलंब करण्याची नितांत गरज आहे. अर्थात, गांधी म्हणजे मोहन नावाची एक व्यक्ती नसून मानवजातीच्या समूचित सद्सद्विवेकाचा तो आविष्कार आहे. म्हणूनच जगामध्ये असा एकही देश अथवा शहर नसेल, जेथे गांधींचे मूर्त स्मारक, पुतळा, प्रतिमा आणि गांधीविचार, तत्त्वज्ञानाचे अध्ययन, अध्यापन आणि कृती होत नाही. ●●●

**(लेखक विख्यात अर्थतज्ज्ञ, महाराष्ट्र राज्य नियोजन मंडळाचे माजी सदस्य असून सध्या महात्मा गांधी मिशन विद्यापीठ, औरंगाबाद येथे सुप्रतिष्ठ प्राध्यापक आहेत)**

## (पान १४ वरून) बॅड बँक : बुडित कर्जे व डळमळत्या

सध्या बँकांकडून बचत खात्यावर व्याजाचा दर ४ टक्के ते ७ टक्के मिळतो. त्यातून महागाईचा ५.५ टक्के दर उणे केला तर ४-६ टक्के व्याज दर मिळणाऱ्यांना नुकसान होते किंवा उणे १-१.५ टक्के परतावा मिळतो. तो परतावा खातेदारांना दगदगीच्या तुलनेत (पेट्रोलचा खर्च वजा जाता) परवडतो का, याचा विचार बँकांच्या व्यवस्थापक मंडळांनी करावा.

स्टेट बँक ऑफ इंडियाच्या एका शोधनिबंधात (इंडियन एक्सप्रेस् दि. २२-९-२१) असे म्हटले आहे, की बँक व्याजातून उणे परतावा काही काळापासून चालू आहे. पण मुदतठेवींच्या व्याजावर बरेच ज्येष्ठ नागरिक जगतात. त्यांच्या मुदतठेवींच्या व्याजावर १० टक्के कर (ढऊड = ढŗ ऊशर्वीलींशव रीं डीेीलश) जागीच कापला जातो. त्यानंतर महागाई दर वजा केला असता त्यांना उणे उत्पन्न हाती पडते. म्हणून स्टेट बँकेच्या अर्थशास्त्रज्ञांनी तो व्याजावरील कर काढून टाकण्याचा सरकारने विचार करावा, असे आवाहन केले आहे. बँकांमधून व्याज-उत्पन्न उणे मिळत आहे म्हणून बरेचसे लोक (विशेषत: उच्च पगाराचे तरुण) शेअर बाजाराकडे वळत आहेत असेही निदर्शनास आले आहे.

समारोप

सरकारच्या विशिष्ट धोरणांमुळे भारतातील बँकव्यवस्था बरीच खिळखिळी झाली आहे. बँका चालेनाशा झाल्या तर आर्थिक महाशक्तीचे स्वप्न पाहणाऱ्या जगातील क्रमांक २ ची लोकसंख्या असलेल्या देशात पतव्यवस्था कोलमडून पडू शकते. हे सरकारला कळत नाही का? परंतु फाजिल आत्मविश्वास वास्तवाकडे दुर्लक्ष करायला प्रवृत्त करू शकतो, हे आपण अनुभवत आहोत. यावर सामान्य माणूस काय करू शकतो? वरील विश्लेषण पटले असेल तर मतदार म्हणून ग्रामपंचायत, जिल्हा परिषदा, विधानसभा, लोकसभा सगळ्या निवडणुकांमध्ये तो सरकारी गटबंधनाला म्हणू शकतो, की आधी बँक खासगीकरणाचे धोरण मागे घ्या, सगळी कर्जे पूर्णपणे वसूल करा आणि नंतरच मत मागायला या !

आताची स्थिती म्हणजे (नेपाळी भाषेतली सुंदर घोषणा आहे) 'अती भयो', इंग्रजीत म्हणतात 'एर्पीसह ळी शर्पीसह' आणि मराठीत म्हणतात 'हे फार झाले'. ●●●

**(लेखक ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ आहेत)**



# दुसऱ्या पिढीतील दोन दलित लेखक





**दत्ता भगत आणि उत्तमराव कांबळे हे वर्ण, जात, पंथ, धर्म आणि विचारसरणी याच्या पलिकडे जाऊन माणूस म्हणून इतरांशी संबंध ठेवणारे लेखक आहेत. त्यांच्या संपर्कात आलेल्या कोणत्याही व्यक्तीच्या जातीची विचारपूस ते करीत नाहीत. फक्त एवढे पाहतात, की हा आंबेडकरी विचारांचा आहे की नाही.**

**– डॉ. सूर्यनारायण रणसुभे**

परिचयापासून ते आजपर्यंत ज्यांच्याशी माझे जिव्हाळ्याचे संबंध होते व आहेत ते दोन लेखक म्हणजे दत्ता भगत आणि उत्तम कांबळे. याशिवाय स्मृतिशेष राजनाथ चव्हाणदेखील याच यादीत येतात. पण ते आज हयात नाहीत. यापैकी सर्वात जुना परिचय हा दत्ता भगतांशी. १९७१-७२ च्या दरम्यान ते पीपल्स कॉलेजमध्ये राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी होते व मी लातूरच्या दयानंद कला महाविद्यालयाच्या रा.से.यो. चा कार्यक्रमाधिकारी. एका संयुक्त शिबिरात बहुतेक औराद-शहाजानी येथे त्यांची व माझी भेट झाली. नंतर ही भेट मैत्रीत आणि नंतरच्या काळात गाढ विश्वासात बदलत गेली. माझ्या संपर्कात जेवढे काही मराठी-हिंदीचे लेखक आलेले आहेत, त्यात सर्वाधिक सात्विक स्वभावाचे व शुद्ध शाकाहारी असलेले हे एकमेव अपवादात्मक व्यक्तिमत्व.

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे पहिले कुलगुरू डॉ. जे.एम. वाघमारे यांनी मानव्य शाखेचा अधिष्ठाता म्हणून मी काम पहावे असा आग्रह धरला. त्यांना माझी विनंती होती, की हे पद सरांनी दत्ता भगत यांना द्यावे. तर भगत सरांचा आग्रह होता, की अधिष्ठाता मीच व्हावे. शेवटी मी ही जबाबदारी स्वीकारली. त्यानंतर महिन्यातून दोन-तीन वेळा नांदेडच्या खेपा सुरू झाल्या. प्रा. भगत सर हे विद्यापीठाच्या मराठी अभ्यास समितीचे प्रमुख म्हणून काम करीत होते. त्यामुळे त्यांचा माझा सतत संपर्क येत गेला. त्यांच्या नाट्यशास्त्राचा अभ्यास, आंबेडकरी विचारांबद्दलची त्यांची बांधिलकी व अत्यंत नम्र असा स्वभाव त्यामुळे कोणीही त्यांच्याकडे आकृष्ट व्हायचा. कोठेही आक्रमकता न आणता ते आपला मुद्दा पटवून देत असत.

## विवेक हाच भगत सरांचा मोठा विश्वास

प्रा. भगत सर हे प्रा. नरहर कुरूंदकरांच्या पठडीत तयार झालेले. त्यामुळे 'विवेक' हाच त्यांचा सर्वात मोठा विश्वास. कुरुंदकरांच्या प्रिय शिष्यांपैकी ते एक. त्यामुळेच माणूस हाच केंद्रस्थानी ठेऊन ते जगत राहिले व आजही जगतात. अतिवादी दलितांच्या भाषेत ते ब्राह्मणलेले आहेत, तर सनातनी ब्राह्मणांच्या कंपूत ते आजही दलितच आहेत. निखळ माणुसकीची भाषा करणारे व त्याप्रमाणे जगणारे जे असतात, त्यांची त्यांच्या काळात अशीच टिंगलटवाळी होत असते. यातून कबीरही सुटले नाहीत आणि तुकारामही. आपल्या या विवेकवादी वृत्तीमुळेच भगत सर अतिवादाच्या कंपूत जात नाहीत. मुळात ते दलित किंवा ललित या दोन्हीकडच्या एकाही कंपूत जात नाहीत. आपल्याला जे पटते व कळते त्या कामात स्वतः ला झोकून देणे ही त्यांची वृत्ती. वाटा-पळवाटा या त्यांच्या नाटकास मराठी रसिकांनी उचलून धरले. हे नाटक रंगभूमीवर खूपच गाजले. आजही अधूनमधून दूरदर्शनवर हे नाटक दाखवले जाते. इतकी मोठी



प्रसिद्धी मिळाल्यानंतरदेखील त्यांनी लेखनाचा आपला संयम कायम ठेवला. जोपर्यंत नाटक हे खूप आतून येत नाही, तोपर्यंत लिहायचे नाही हा त्यांचा बाणा. प्रसिद्धीच्या झोतात असताना अनेक नाटके लिहून त्यांनी बरीच माया जमवली असती. पण बेतलेले असे नाटक लिहायचेच नाही हे त्यांनी ठरवलेले. अगदी कमी नाटके लिहूनदेखील त्यांना अ.भा.मराठी नाट्य परिषदेचा अध्यक्ष होण्याचा मान मिळाला.

## भगत सरांचे मोठेपण

बहुतेक उल्हासनगर येथील महाविद्यालयाच्या एका चर्चासत्राचे आयोजन करण्यात आलेले होते. दिल्लीहून हिंदीच्या लेखिका व सामाजिक कार्यकर्त्या रमणिका गुप्ता आलेल्या होत्या. मीही होतो. रात्रीच्या जेवणाच्या वेळी मी आणि दत्ता भगत हे समोरासमोर बसलेलो. त्यावेळी भगत सर खूप आत्मियतेने आणि तेवढ्याच अधिकाराने मला म्हणाले, 'सर, मी तुमच्या आत्मीय मित्रांपैकी आहे, असे मी समजतो. मग माझ्याकडून काय असे चुकले, की तुम्हाला माझ्या एकाही नाटकाचा अनुवाद करावासा वाटला नाही.' त्यांच्या या वाक्याने मी खूपच गडबडलो. अपराधीपणा जाणवला. कारण दरम्यान मी रामनाथ चव्हाणांच्या दोन नाटकांचा अनुवाद केला होता व ते प्रकाशितही झालेले होते. बहुतेक मी त्यावेळी एवढेच म्हणालो, की अजून वेळ गेलेली नाही. त्यानंतर मी त्यांच्या एका नाटकाचा अनुवाद केला. तो रमणिका गुप्तांनी आपल्या त्रैमासिकात प्रकाशित केला. भगत सरांच्या इतर नाटकांचा ज्यांनी अनुवाद केलेला आहे, अशी दोन व मी अनुवाद केलेले एक, अशा तीन नाटकांचा एक संग्रह प्रकाशित करण्याचा निर्णय मी घेतला व तो प्रकाशित झालाही. भगत सरांचे मोठेपण हे, की त्यांनी हा संग्रह मलाच समर्पित केलेला आहे. माझे अँजिओप्लास्टीचे ऑपरेशन झाल्यानंतर ते मला भेटण्यासाठी लातूरला आले होते. त्यांच्या निवृत्तीनंतर त्यांच्यावर एक गौरवग्रंथ संपादित करण्याचा निर्णय त्यांचे एक शिष्य डॉ. प्रल्हाद लुलेकर यांनी घेतला. 'भगत सरांच्या वैयक्तिक जीवनावर फक्त तीनच जण लिहिणार आहेत, त्यापैकी तुम्ही एक आहात आणि या तिघांची निवड भगत सरांनीच केलेली आहे,' असे लुलेकर मला फोनवर म्हणत होते. मला हा बहुमान त्यांनी दिला, हे त्यांचे मोठेपण.

## उत्तम कांबळेंशी वेगळ्या प्रकारचे ऋणानुबंध

उत्तम कांबळे आणि माझ्या कुटुंबाचा ऋणानुबंध हा खूपच वेगळ्या प्रकारचा आहे. माझा लहान भाऊ विलास हा राज्यशास्त्रात एम.ए. झाल्यानंतर त्याचे गुरुवर्य डॉ. मोईन शाकिर यांनी कोल्हापूरच्या न्यू कॉलेजमध्ये त्याची नेमणूक केली. याच काळात उत्तम कांबळे हे पत्रकारितेत करिअर करण्यासाठी म्हणून कोल्हापुरात धडपडत होते. दोघेही एकटे जीव. तर योगायोगाने दोघे शेजारी-शेजारी भाड्याने राहत. शेजारी म्हणून परिचय झाला. नंतर मैत्री. माझी आई त्याकाळी आपल्या या सर्वात लहान मुलाकडे चार-आठ दिवस राहण्यासाठी म्हणून जात असे. ती कर्नाटकच्या विजापूरची. कन्नड बोलणारी. उत्तम कांबळे हे सीमा भागातील कन्नड बोलणारे. त्यामुळे आई व उत्तम यांच्यात संवाद सुरू झाला. हळूहळू आई उत्तमकडे जास्त वेळ बसू




लागली. आपले सुखदुःख सांगू लागली. आईची माया उत्तमजींवर वाढत चालली. यादरम्यान मी एकदा कोल्हापूरला गेलो असताना आईनेच मला उत्तमजींचा परिचय करून दिला. म्हणाली, हे पाहा, हा माझा सहावा मुलगा आहे. (आम्ही पाच भाऊ) त्यामुळे तू याला आपला भाऊ समज. आईची एवढी माया उत्तमजींवर कशी बसली असावी याचा ज्यावेळी मी विचार करू लागलो त्यावेळी माझ्या लक्षात आले, की यासाठी उत्तमजींचा स्वभाव कारणीभूत आहे. केवळ माझी आईच नव्हे तर, सर्व जाती-धर्मांच्या अनेक स्त्रिया उत्तमजींना आपला मुलगा मानत. तरुणी भाऊ मानत. त्यांच्या लेखनातून अशा अनेक स्त्रियांचे दर्शन घडते.

माझी मुलगी कनुप्रिया ही एका एनजीओमध्ये समन्वयक म्हणून काम पाहते. योगायोगाने तिची नेमणूक नाशिकला झाली. तिला गॅसची गरज होती. त्याकाळी सहजासहजी गॅस मिळायचे नाहीत. मी फोनवरून उत्तमरावांना ही अडचण सांगितली आणि त्यांनी १२ तासांच्या आत तिच्याकडे गॅस पाठवलादेखील. नंतर माझी मुलगी पहिली नोकरी सोडून एका दुसऱ्या एनजीओमध्ये सूरत येथे गेली. तेथे गेल्यानंतर बहुतेक एका वर्षाने ती भयंकर आजारी पडली. तिच्या आतड्याचे ऑपरेशन करायचे होते. तिची प्रकृती खूपच नाजूक झाली. तिच्या जीवन-मरणाचा प्रश्न होता. आम्ही लातूर येथे, ती एकटीच सूरतला. माझा मुलगा ताबडतोब सूरतला पोहोचला. मोठे ऑपरेशन, मोठा खर्च. यादरम्यान रोज त्यांचा फोन यायचा. ऑपरेशन झाल्याच्या दुसऱ्या दिवशी त्यांचा फोन आला व ते एवढेच म्हणाले, की तुमच्या मुलीच्या बँकेचा खातेक्रमांक एमएमएसने ताबडतोब पाठवून द्या. मी विचारत होतो कशासाठी, तर ते म्हणाले, की मला हवा आहे. पाठवून द्या म्हणजे पाठवून द्या, नकार द्यायचा नाही. आवाजात जरब होती. नाईलाजाने मी नंबर पाठवून दिला आणि १२ तासांत तिच्या खात्यावर जवळपास तीस हजार जमा झाले व आणखीन वीस हजार पुढील दोन दिवसांत जमा होतील, असे ते म्हणाले. मग मात्र मी खूपच अस्वस्थ झालो. त्यांना दुसऱ्या दिवशी मी विनवणी करीत राहिलो, की उत्तमराव या मदतीची मला काहीच गरज नाही. सुदैवाने मुलीचे हे सर्व करण्याइतपत आम्ही समर्थ आहोत. एवढी मोठी रक्कम तुम्ही देताय हा तुमचा मोठेपणा. पण ही मदत मला नकोय. इतर गरजूंना द्या. ते म्हणाले, मी काही एकट्याने हे

करीत नाही. आमचा एक गट आहे. त्या गटात मी तुमच्या मुलीचा खातेक्रमांक पाठवला व अपील केले, की सरांच्या मुलीसाठी-माझ्या बहिणीसाठी मदत हवी. तर मंडळी देत गेली, देत राहतील. मग मात्र मी चिडलो. मी म्हटले, तुमचे एक ठीक आहे. पण इतरांचे कशाला? तुम्ही आता ताबडतोब इतरांना कळवा, की मदत पाठवू नका व ज्यांनी पाठवलेली आहे, त्यांची नावे कळवा. माझा राग त्यांच्या लक्षात आला असावा. दुसऱ्या दिवशी त्यांनी दोन नावे कळवली. मी म्हणालो, आता राहिलेले दहा हजार कोणाचे. तर ते म्हणाले, ते माझे आहेत. मी ते घेणार नाही. हे अगदी बजावून सांगतो. जर पाठवलीत तर आपले संबंध संपणार. माझ्याही भावना आहेत. मी शांत झालो. तर हे असे उत्तमराव. केवळ मलाच नाही तर महाराष्ट्रातील अनेकांना संकटसमयी त्यांनी आपल्या परीने मदत केलेली आहे, आजही करीत असतात. जात-धर्माच्या पलीकडे जाऊन, निखळ माणुसकीच्या भूमिकेतून. बुद्धाच्या तत्त्वज्ञानाचे ते गाढे अभ्यासक असून, ते तत्त्वज्ञान आपल्या आचरणात आणणाऱ्यांपैकी एक आहेत. त्यांनी कधीही जात पाहून संबंध ठेवलेले नाहीत आणि त्यामुळेच साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदाच्या निवडणुकीत त्यांना सर्वात जास्त मते मिळाली. ती केवळ त्यांच्या या निखळ माणुसकीच्या भूमिकेमुळे.

## 'सकाळ'मधील लेखाने मिळाला विद्यार्थ्यांचा गोतावळा

२०१५ मध्ये मी कधी तरी 'डेथ फोबिया' नावाच्या मानसिक व्याधीचा शिकार झालो. या व्याधीतील पेशंटला अचानक तीव्रपणे वाटते, की आता काही तासांत तो मरणार आहे. ही मानसिक अवस्था काही तासांची असते. हा भ्रम एवढा तीव्र असतो, की मेंदूवर त्याचा विलक्षण असा ताण येतो आणि त्यामुळे रक्तप्रवाह खंडित होतो. त्या अवस्थेत तीनच शक्यता असतात- स्मृतिभ्रंश, पक्षाघात किंवा तीव्र असा हृदयविकाराचा झटका. असे नंतर मला माझ्यावर उपचार करणाऱ्या मनोचिकित्सकाने सांगितले. पण ही नंतरची गोष्ट. हा भ्रम मला गाढ झोपेनंतर ज्यावेळी अचानक जागा झालो त्यावेळी झाला, मध्यरात्री. त्या भयावह अशा दोन तासांत मी मृत्यूला सामोरा जात होतो. पण न डगमगता भराभर भविष्याचे निर्णय घेत होतो. घरी एकटाच होतो. शेवटी पहाटे दोन ते अडीचच्या दरम्यान मी माझ्या एका तरुण मित्राला-जो माझा माजी विद्यार्थी होता-त्याला बोलावून घेतले. शेवटच्या भेटीसाठी. त्यामुळे माझ्या भावनांचा निचरा झाला. मी त्यातून बाहेर पडलो. या अवस्थेतून बाहेर पडल्यानंतर दुसऱ्या-तिसऱ्या दिवशी उत्तमराव नेहमीप्रमाणे माझ्या भेटीसाठी आले. या घटनेची त्यांना अजिबात जाणीव नव्हती. त्यांचा एक नियम आहे, की लातूर परिसरात ते ज्यावेळी व्याख्यानासाठी येतात त्यावेळी माझी व डॉ. जनार्दनराव वाघमारे यांची भेट घेतल्याशिवाय पुढे जात नाहीत. ते आले त्या वेळी मी माझ्या या ताज्या अनुभवाविषयी बोललो. त्यावेळची माझी मन:स्थिती, त्याही स्थितीत मी घेतलेले निर्णय, वगैरे-वगैरे मी विस्ताराने त्यांना सांगत होतो. खूप उत्सुकतेने त्यांनीही सर्व ऐकून घेतले. नाशिकला परतल्यावर त्यांनी मला फोन करून सांगितले, की ''सर, पुढच्या रविवारच्या सकाळच्या पुरवणीत मी माझ्या 'फिरस्ता' या स्तंभात तुमच्या या अनुभवावर लिहीत आहे.

## माणूस केंद्रस्थानी ठेऊन विचार करणारी मंडळी

ही मंडळी व यांच्या पिढीतील अनेक डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या भाषेत 'डी-कास्ट' जातविहीन झालेली, केवळ माणूस हाच केंद्रस्थानी ठेऊन विचार करणारी. यांच्या जातीची किंवा माझ्या जातीची चर्चा करणारे मुळातच स्वत: भयंकर जातीवादी असतात. ते जरी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांबद्दल भरभरून बोलत असले तरी वैयक्तिक जीवनात व आचरणात ते बाकी काही का असेनात डॉ. बाबासाहेबांचे खरे अनुयायी नसतात. मी जन्मत: दलित नाही व सवर्णही नाही. निखळ माणुसकीला स्वीकारून जगणारा आहे. त्यामुळे माझ्या संपर्कात आलेल्या अनेकांची जात आजही माहीत नाही व माहीत करून घेण्याचा मी प्रयत्नही करीत नाही. त्यांनी जर स्वत:हून सांगितले तरच. जातीच्या पलीकडे जाऊन जगण्याचे संस्कार मला माझ्या आई-वडिलांकडून मिळालेले आहेत. माझ्या अशिक्षित आईने तिच्या किंवा आमच्या संपर्कात येणाऱ्यांची जात कधीच विचारली नाही. माझ्या पत्नीनेही याबाबतीत कधीच उत्सुकता दाखवलेली नाही. हा भाग वेगळा आहे, की माझी जात माहीत झाल्यानंतर मला जातीवादी मंडळींचा त्रासही झाला. गुणवत्ता असूनही केवळ जातीमुळे माझी उपेक्षा झाली. केवळ जातीमुळेच नाही तर माझ्या विचारसरणीमुळे. मी मार्क्स, गांधी व आंबेडकर या त्रयींच्या विचारसरणीवर विश्वास ठेवणारा आहे. मी गांधींना मानतो म्हणून काही अतिवादी आंबेडकरवाद्यांचा माझ्यावर राग असतो. मी मार्क्सला काही मर्यादेपर्यंत स्वीकारतो म्हणून काही मला आपला मानत नाहीत व मी आंबेडकरी विचारांना अनुसरून जगतो म्हणून काहींचा राग आहे. या तिन्ही महामानवांचे विचार एक दुसऱ्याच्या विचारांना पूरक आहेत, अशी माझी श्रद्धा आहे.

ठरल्याप्रमाणे पुढच्या रविवारच्या 'सकाळ'मध्ये त्यांचा लेख आला, 'मृत्यूला पाहिलेला माणूस'. नंतर त्यांनी मला माहिती दिली, की या लेखावर त्यांच्याकडे ३० ते ४० फोन आले. अनेक मेल आले. हा लेख वाचून माझ्या काही जुन्या विद्यार्थी-विद्यार्थिनींचे फोन आले. २५-३० वर्षांपूर्वीची एक विद्यार्थिनी जी त्यावेळी सासू झालेली होती, ती तर फोनवरच रडत होती. नंतर ती आपल्या नवऱ्याला घेऊन मला भेटायलाही आली. मला सर्वात आश्चर्य वाटले, ते पुण्यात स्थायिक झालेल्या आणि त्यावेळी आजी झालेल्या ४५ वर्षांपूर्वीच्या माझ्या एका माजी विद्यार्थिनीचा फोन हा लेख वाचून आला. तेव्हा ती एवढी अस्वस्थ झाली, की अनेक खटपटी करून तिने माझा फोन नंबर मिळवला आणि संपर्क साधला. ४०-४५ वर्षांपूर्वीच्या माझ्या प्रिय विद्यार्थ्यांशी माझा पुन्हा संपर्क झाला तो केवळ आणि केवळ उत्तमरावांच्या या लेखामुळे. ●●●

**(लेखक हिंदी साहित्यिक आणि अनुवादक आहेत)**

# चैतन्य हरवलेली नेतृत्वहीन काँग्रेस

**पंजाबात भांगडा बिघडलाच आहे, असे सध्याचे चित्र आहे. काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नवज्योतसिंग सिद्धू यांच्या तालावर काँग्रेस नेतृत्वाला जे काही करावे लागले, त्याचे परिणाम केवळ पंजाबपुरतेच मर्यादित राहिलेले नाहीत, तर त्याचे पडसाद देशभर आणि विशेषतः काँग्रेसअंतर्गत आणि राजकीय वर्तुळात उमटू लागले आहेत. अनेक राजकीय पंडित, भाष्यकार आणि जाणकार काँग्रेसच्या भवितव्याबाबत चिंता व्यक्त करत आहेत. पक्षाची अशीच वाटचाल कायम राहिली तर, त्याचे अस्तित्व वेगाने धोक्यात येईल. त्याचे राष्ट्रीय स्वरुपही संपून जाईल आणि काही जाणकार सांगतात तसे, ओसाडगावची पाटीलकी पक्षनेतृत्व करत असलेल्या विद्यमानांकडे राहील, अशी स्थिती येऊ शकते.**

भास्कर नाशिककर

२०१४ च्या निवडणुकीनंतर काँग्रेसने केंद्रातील सत्ता गमावली. लोकसभेतील विरोधी पक्षनेतेपदही पुरेशा संख्याबळाअभावी मिळू शकले नाही. २०१९ च्या सार्वत्रिक निवडणुकीतही पक्ष फारसा करिष्मा दाखवू शकला नाही. गेल्या काही वर्षांत पक्षाची वाटचाल अधोगतीकडेच सुरू आहे, असे म्हटल्यास वावगे होणार नाही. पंजाब, राजस्थान, छत्तीसगड आणि मध्य प्रदेश या राज्यांत पक्षाने सरकार स्थापन केले. मात्र पक्षांतर्गत कलह, मतभेद, नव्या-जुन्या पिढीतील संघर्षात पक्षाला मध्य प्रदेशातील सत्ता गमवावी लागली. राजस्थानात काही महिन्यांपूर्वी सत्तासंघर्ष पेटला होता. तिथेही नवी पिढी विरुद्ध जुनी पिढी असाच वाद होता. मनधरणी, शक्तीप्रदर्शन, शिष्टाई आणि चर्चा यांचा परिणाम म्हणून आणि काहीशा राजकीय अपरिहार्यतेमुळे पक्षाची सत्ता टिकून राहिली असली, तरी संघर्ष संपलेला नाही. छत्तीसगड आणि पंजाबात काँग्रेसने मुख्यमंत्री बदलावा, असा धोशा त्या-त्या राज्यातील नेतृत्वाने लावला होता. छत्तीसगडातील असंतोष तात्पुरता शमलेला आहे. भूपेश बघेल त्यावर मात करण्यात यशस्वी झाले. तथापि, पंजाबात कॅप्टन अमरिंदरसिंग यांच्या मुख्यमंत्रीपदाला नवज्योतसिंग सिद्धू यांच्या आक्रमकतेने सुरूंग लागला आणि आपले इप्सित साध्य करण्यात ते यशस्वी झाले.

भाजप व्हाया काँग्रेस असा सिद्धू यांचा १९ वर्षांच्या राजकीय कारकीर्दीचा प्रवास. काँग्रेसमध्ये आल्यानंतरही त्यांना उपमुख्यमंत्रीपदाची तरी अपेक्षा होती. पण त्यांना ते मिळाले नाही. अगदी अलीकडे त्यांनी मुख्यमंत्री कॅप्टन अमरिंदरसिंग यांच्याविरूद्ध मोहीम उघडली. त्यांच्यातील बंडखोरी शमवण्यासाठी पक्षाचे प्रदेशाध्यक्षपद त्यांना बहाल केले. तरीही कॅप्टनविरोधाची धार बोथट होण्याऐवजी अधिक टोकदार झाली. त्यांच्या हट्टापुढे काँग्रेसचे नेतृत्व नमले आणि कॅप्टन अमरिंदरसिंग यांच्यासारख्या बुजुर्ग नेत्याला अपमानास्पदरित्या जावे लागले. मुख्यमंत्रीपदी पक्षाने पहिल्यांदाच चरणजितसिंग चन्नी यांच्या रुपाने दलित चेहरा दिला. तथापि, मंत्रिमंडळातील नवे चेहरे, राज्याचे पोलिस महासंचालक, ॲडव्होकेट जनरल नेमताना आपलीच मर्जी चालावी, यासाठी त्यांनी दुराग्रही भूमिका घेतली होती. यासाठी दिलेला प्रदेशाध्यपदाचा राजीनामा नंतर त्यांनी मागे घेतला.

## जी-२३ आणि लोकशाही

गेल्या काही वर्षांपासून काँग्रेसचे नेतृत्व अधिकाधिक प्रभावहीन, चैतन्यहीन झालेले आहे. त्यावर पक्षातील अनुभवी २३ नेत्यांनी (ज्यांना जी-२३ म्हणतात) मूलभूत प्रश्न उपस्थित करून पक्षाच्या एकूण भवितव्याबाबत गेल्या दोन वर्षांपासून प्रश्न विचारणे चालवले आहे. पंजाबातील जो भांगडा बिघडला, त्याने पक्षाची विविध पातळ्यांवरील दिवाळखोरी स्पष्टपणे समोर आली. त्यावर जी-२३ मधील ज्येष्ठ नेते, विधिज्ञ कपिल सिब्बल यांनी बोट ठेऊन पुन्हा एकदा पक्षांतर्गत बाबींकडे लक्ष वेधले. त्यांच्या मागण्यांकडे लक्ष देणे, त्यांची तड लावणे किंवा समाधानकारक उत्तर देण्याऐवजी त्यांच्या निवासस्थानावर अश्लाघ्य पद्धतीने हल्ला केला गेला. यामुळे पक्षात अलबेल नाही, हेच स्पष्ट झालेले आहे.

## इतिहास काय सांगतो?

स्वातंत्र्यलढ्यात आघाडीवर राहिलेल्या काँग्रेसचे विसर्जन करावे, अशी सूचना स्वातंत्र्यानंतर केली गेली होती. तथापि, काँग्रेसची पाळेमुळे जनमाणसांत इतकी घट्ट रुजलेली होती, की त्याकडे दुर्लक्ष केले गेले. पंडित जवाहरलाल नेहरूंसह अनेक उत्तुंग व्यक्तिमत्त्वे पक्षात होती. अगदी पन्नासच्या दशकातही पंडित नेहरू पंतप्रधान असताना अखिल भारतीय काँग्रेसचे तत्कालीन अध्यक्ष आचार्य जे.बी. कृपलानी, ज्येष्ठ नेते पुरूषोत्तमदास टंडन यांच्यात संघटनात्मक बाबींवर मतभेद व्हायचे. पक्षसंघटन आणि सत्तेतील नेत्यांमध्ये

विचारांचे आदानप्रदान व्हायचे. त्यावरून होणाऱ्या मतभेदाने खडाजंगी व्हायची. त्यामुळे पक्षनेतृत्वाला आव्हान देण्याचे प्रकारही घडायचे. पक्षाच्या भावनगरच्या अधिवेशनात (१९७१) तत्कालीन अध्यक्ष नीलम संजीव रेड्डी यांनी सत्तेवर दहा वर्षे राहिल्यानंतर नेत्यांनी पक्षसंघटना मजबुतीकडेही लक्ष द्यावे, त्यासाठी सत्तेपासून दूर राहावे, अशी सूचना केली होती. तथापि, पक्ष संघटनेत काम करण्यापेक्षा सरकारात पद घेणे, मंत्रीपदी राहणे यातून मानमरातबासह वाट्याला येणारे बाकी लाभ अधिक प्रभावी ठरले. स्वाभाविकच पक्ष संघटनात्मक बाबी उपेक्षितच राहिल्या. काँग्रेसला देशात पर्यायी प्रबळ विरोधक नव्हता. त्यामुळे पक्षाची वाटचाल सुखेनैव होती. इंदिरा गांधी यांच्या काळात सुरुवातीला के. कामराज, एस. निजलिंगप्पा, स.का. पाटील, देवराज अर्स, यशवंतराव चव्हाण, मोरारजी देसाई अशा दिग्गजांची फळी होती. त्यांच्यावर मात करून इंदिरा गांधी यांनी पक्षावर केवळ पकडच निर्माण केली नाही, तर आपले वेगळे वर्चस्व निर्माण केले. त्यांच्याशी ज्यांचे पटले नाही ते पक्षाबाहेर गेले, जे पक्षात राहिले त्यांच्यावर संघटनात्मकसह इतर बाबींनी मात करून पक्षातील लोकशाही मोडीत काढली. एका अर्थाने, काँग्रेस म्हणजेच नेहरू-गांधी घराणे असे वातावरण निर्माण करण्यात त्या यशस्वी झाल्या. आजही पक्ष त्या छायेत आहे, पण त्याची किंमत त्याला आता चुकवावी लागत आहे. इंदिरा गांधींनी लागू केलेल्या आणीबाणीचे परिणाम नेहरू-गांधी घराण्याच्या हाती काँग्रेस एकवटण्यात झाले. संजय गांधींचे कमालीचे वर्चस्व काँग्रेसमध्ये निर्माण झाले.

## हायकमांड कल्चर वाढीस

१८८५ मध्ये अस्तित्वात आलेल्या काँग्रेसला दिग्गज, लोकशाहीचे पुरस्कर्ते लाभल्यामुळे तिला आपोआप शिस्त प्राप्त झाली होती. संघटनात्मक बांधणी दिल्लीपासून गल्लीपर्यंत पसरत गेली आणि त्याला एकूणच संस्थात्मक रूप आले. काँग्रेस नाही असे गाव शोधूनही सापडणार नाही, अशी स्थिती होती. तथापि, संजय गांधी या नियमबाह्य सत्ताकेंद्राने हे सगळे मोडीत काढले. आपल्याभोवती खुशमस्कऱ्यांची टोळी जमवली. त्यातून दरबारी राजकारण वाढीला लागले. ज्यांना एखाद्या महापालिकेतही निवडून येता येणार नाही, अशी मंडळी दरबारी सल्लागार झाले. त्याने काँग्रेसमधील संस्थात्मक रचना मोडकळीस येऊ लागली. आणीबाणीने ही घसरण वेगाने झाली. संजय यांच्या अपघाती निधनानंतरही (जून १९८०) ही स्थिती फारशी बदलली नाही. आणीबाणीने सत्तांतर झाले, काँग्रेसची आणखी शकले झाली. त्यातून एकचालकानुवर्ती काँग्रेस आकाराला आली. काँग्रेस, इंदिरा काँग्रेस झाली.

कोणताही पक्ष किंवा व्यवस्था व्यक्तीकेंद्री व्हायला लागली, की त्यात साचलेपण येते. तिच्यातील विचाराची प्रक्रिया कुंठीत होते. एकाच व्यक्तीच्या मताने, विचाराने कारभार चालू लागतो. नेमकी काहीशी अशीच स्थिती काँग्रेसची झाली. पक्षात नेतृत्व होते आणि त्याभोवती पक्ष फिरत होता. त्यामुळे इंदिरा म्हणजे काँग्रेस आणि काँग्रेस म्हणजे इंदिरा असे वातावरण होते. साहजिकच त्यामुळे हायकमांड कल्चर आणि त्याभोवतीचे सल्लागार, दरबारी मंडळी आणि त्यांचे वर्चस्व असे सगळेच वाढीला लागले. तेच प्रभावी झाले. इंदिरा गांधी त्यांच्या सुरक्षारक्षकांच्या गोळीला बळी पडल्यानंतर त्यांचे पुत्र राजीव गांधी सत्तेवर आले. सहानुभूतीच्या लाटेने काँग्रेसला मोठे बहुमत मिळाले. तथापि, राजीव यांनाही वादग्रस्त बोफोर्स प्रकरणामुळे काँग्रेसच्या पराभवाची चव चाखावी लागली. राजीव गांधी यांचाही आत्मघातकी स्फोटात मृत्यू झाला आणि काँग्रेसमध्ये नेतृत्वाची पोकळी निर्माण झाली.

राजीव गांधी यांच्या निधनापर्यंत नेहरू-गांधी घराण्याचे वर्चस्व काँग्रेसवर होते, त्याचे गारूडही भारतीय जनमानसावर होते. पक्षात त्याला मान होता. राजीव गांधींच्या पत्नी सोनिया आणि अपत्यांबाबत सहानुभूती होती. पक्षाकडे नेतृत्व देणाऱ्यांची मोठी फळीही होती.

## नवी दिशा, नवा विचार

पी.व्ही. नरसिंहराव, सीताराम केसरी, ए.के. अँटनी, शरद पवार, ममता बॅनर्जी, कमलापती त्रिपाठी, प्रणव मुखर्जी अशी नावे घेण्यासारखी कितीतरी मंडळी होती. त्यामुळेच पुन्हा एकदा पक्षात लोकशाहीचा बिगुल वाजू लागला. पक्षसंघटनेचा कारभार, पक्षांतर्गत निवडणुका आणि त्याद्वारे काँग्रेस कार्यकारी मंडळावर (सीडब्ल्यूसी) पक्षसंघटना आणि लोकशाही प्रक्रियेतून स्थान मिळू लागले. नरसिंहराव पंतप्रधान झाले तेव्हा केसरी यांचा पक्षावर प्रभाव होता. काँग्रेसला नवी दिशा, विचार मिळत होता. तथापि, पक्षात नेहरू-गांधी घराणे सक्रीय नव्हते. नरसिंहराव यांच्या पाच वर्षांच्या (१९९१-१९९६) कारकीर्दीनंतर आघाडीचे राजकारण अधिक गतिमान झाले. भारताच्या राजकारणात आलेल्या स्थित्यंतराने काँग्रेस सत्तेपासून काहीशी दूर फेकली गेली. भारतीय जनता पक्षाच्या नेतृत्वाखालील राष्ट्रीय लोकशाही आघाडीने काँग्रेसच्या नेतृत्वाखालील संयुक्त पुरोगामी आघाडीवर मात केलेली होती. डिसेंबर १९९७ मध्ये कोलकता अधिवेशनात सोनिया गांधी काँग्रेस प्रवेशकर्त्या झाल्या. त्या पहिल्यांदा १४ मार्च १९९८ रोजी काँग्रेसच्या अध्यक्षा झाल्या. केसरी यांना अध्यक्षपदावरून दूर केल्यानंतर काँग्रेसमध्ये सोनियापर्व सुरू झाले. काँग्रेसच्या अध्यक्षपदी सर्वाधिक काळ, २३ वर्षे राहण्याचा विक्रम सोनियांनी केला.

देशामध्ये १९९९ मधील सार्वत्रिक निवडणुकीने एनडीएचे सरकार सत्तेवर आले आणि आघाडीच्या राजकारणाला स्थैर्य प्राप्त झाले. पहिल्यांदा अटलबिहारी वाजपेयी यांच्या नेतृत्वाखालील बिगरकाँग्रेसी सरकार पाच वर्षांचा कार्यकाळ पूर्ण करू शकले. २००४ च्या निवडणुकीत काँग्रेसच्या नेतृत्वाखालील यूपीएचे सरकार सत्तेवर आले. सोनियांनी पंतप्रधानपदी यावे यासाठी समर्थकांनी केलेली मोर्चेबांधणी सोनियांना सर्व स्तरातून नागरिकत्वाच्या मुद्यावरून झालेल्या विरोधाने व्यर्थ ठरली. मात्र यानिमित्ताने सरकारबाहेरचे सत्ताकेंद्र निर्माण झाले. काँग्रेस संसदीय पक्षाच्या सोनिया गांधी अध्यक्षा आणि डॉ. मनमोहनसिंग पंतप्रधान झाले. यूपीएची सत्ता दहा वर्षे राहिली. त्याचे दुसरे पर्व गैरव्यवहाराच्या आरोपांनी काळवंडले गेले. डॉ. मनमोहनसिंग यांच्यामागून सोनिया कारभार चालवतात, अशी टीका झाली. काही अंशी ती खरीही होती.

## गांधीत्रयी आणि एकखांबी तंबू

नेहरू-गांधी घराण्याचे वारसदार म्हणून राहुल गांधी यांचा पक्षात वावर वाढू लागला. त्यांच्यावर अनेक जबाबदाऱ्या सोपवल्या गेल्या. वडिलांप्रमाणे राजकारणात आलेले राहुल गांधी हे तरूण तुर्क. ते

पक्षात चैतन्य आणतील, असा आशावाद व्यक्त केला गेला. दरबारी राजकारण्यांनी त्यांना तसे प्रोजेक्टही केले. ज्योतिरादित्य शिंदे, सचिन पायलट, मिलिंद देवरा, जितीन प्रसाद हे त्या-त्या घराण्यातील तरूण पिढीचे प्रतिनिधीही स्वाभाविकपणे राहुल गांधींभोवती जमा झाले. पक्षात त्यांचा वरचष्मा निर्माण झाला. काँग्रेसमधील राजकारण्यांची तरूण पिढी पक्षाला नवचैतन्य देईल, असे वाटले होते. राहुल यांच्याकडे पद नसताना पक्षातील काही निर्णयात त्यांचा सहभाग दिसू लागला. डॉ. मनमोहनसिंग पंतप्रधान असताना सरकारचे धोरण एक आणि राहुल यांची किंवा त्यांच्या समर्थक गटाची भूमिका वेगळी असे होऊ लागले. त्यामुळे पक्ष श्रेष्ठ की सरकार, असाही संघर्ष निर्माण झाला. त्यावेळी प्रसंगानुसार मार्ग काढले गेले. पण राहुल गांधी सरकारच्या कारभारावर स्पष्ट भाष्य करून आपण काहीतरी वेगळे आहोत, असे दाखवत गेले. तथापि, निवडणुकीच्या आखाड्यात राहुल हवा तसा प्रभाव पाडू शकले नाहीत, हे २०१४ च्या सार्वत्रिक निवडणुकीने स्पष्ट झाले.

## राहुल गांधी यांच्या नेतृत्वमर्यादा

२०१४ नंतरही उत्तर प्रदेश, बिहार, महाराष्ट्रासह अनेक राज्यांत निवडणुका झाल्या. पण राहुल यांचा करिष्मा चालला नाही. प्रकृतीच्या कारणामुळे सोनिया काहीशा दूर गेल्याने, राहुल यांना पक्षात सरचिटणीस आणि नंतर अध्यक्षपद दिले गेले. तथापि, त्यांची कामगिरी प्रभावशाली ठरू शकली नाही. ते जनतेत मिसळले तरी दरबारी राजकारण्यांचे कोंडाळे ते भेदू शकले नाहीत. उत्तर प्रदेश, बिहारात पक्षाचे होते नव्हते तेही स्थान संपले. उत्तर प्रदेशात किंवा बिहारात त्यांनी केलेली आघाडी यश मिळवू शकली नाही. अगदी अलीकडे आसामात पक्ष पुन्हा सत्तेवर येऊ शकला नाही. पश्चिम बंगालमध्ये अस्तित्वही दाखवू शकला नाही. तामिळनाडूत द्रमुकशी आघाडी केल्याने पक्षाचे अस्तित्व टिकून राहिले, पण तो द्रमुकचा करिष्मा होता. केरळ विधानसभेच्या निवडणुकीत राहुल केरळातील वायनाडमधून लोकसभेवर गेल्याने, विरोधी काँग्रेसच्या नेतृत्वाखालील संयुक्त पुरोगामी आघाडी डाव्या आघाडीला धूळ चारून सत्तेवर येईल, ही अटकळही फोल ठरली. एकूणच राहुल नावाचे नाणे काँग्रेससाठी चलनी ठरू शकले नाही. नाही म्हणायला २०१७ च्या गुजरात विधानसभेच्या निवडणुकीत काँग्रेसने मारलेली मुसंडी पक्षात चैतन्य आणि राहुलना बढती देऊन गेली, पण तेही यश पुन्हा यावेळी मिळेल की नाही, अशी शंका आहे. पक्षाने मध्यप्रदेश, छत्तीसगड, राजस्थानात स्वबळावर सत्ता मिळवली, पण पक्षांतर्गत बंडाळी, सुंदोपसुंदी, राज्यातील नेतृत्वाच्या सत्तेत सहभागाच्या आशाआकांक्षा आणि त्याची पूर्तता करणे किंवा त्याना पक्षशिस्तीचे धडे देऊन शांत ठेवण्यात सोनिया, राहुल आणि प्रियंका गांधी अपयशी ठरले. मध्य प्रदेशातील सत्ता ज्योतिरादित्यांचे समाधान करू न शकल्याने पक्षाने गमावली. त्याआधी कर्नाटकात धर्मनिरपेक्ष जनता दलाशी आघाडीने मिळवलेली सत्ता गमवावी लागली. राजस्थानात तरूण नेते सचिन पायलट यांचे बंड शमवले आहे. छत्तीसगडात बघेल यांना अभय मिळाले आहे. तथापि, सगळेच अलबेल नाही. पंजाबात तर भांगडा पुरता बिघडलाच. या सगळ्यांचे खापर राहुल आणि गांधी कुटुंबियांवरच जाते आहे.

काँग्रेसच्या पुनरूज्जीवनासाठी गांधी कुटुंबाने पक्ष नेतृत्वाचा त्याग करावा, अशी सूचना पक्षातून, पक्षाबाहेरून, विरोधी गोटातून आणि विश्लेषकांतून होते आहे. तथापि, त्याला गांधीत्रयी दाद देत नाही. पक्षातील २३ ज्येष्ठ नेत्यांनी तो मुद्दा सातत्याने संधी मिळेल तसा लावून धरला. पक्षांतर्गत निवडणूक आणि लोकशाही स्थापनेची मागणी केली, पंजाबातील घटनेचे दायित्व गांधींनी स्वीकारावे असेही सांगून पाहिले. काँग्रेस कार्यकारी मंडळाची (सीडब्ल्यूसी) बैठक घ्यावी, अशीही मागणी केली, पण पुढे काहीच होत नाही. त्यामुळे काँग्रेस नेतृत्वहीन, दिशाहीन झालेली आहे, असा अर्थ राजकीय वर्तुळातून काढला जातोय. त्यावर मात करण्यासाठी काँग्रेसने गंभीरपणे पावले उचलण्याची गरज आहे. नाही तर पक्ष २०२४ मधील सार्वत्रिक निवडणूक भारतीय जनता पक्षाच्या खिशात सहज टाकू शकेल. भाजपला टक्कर देण्यासाठी देशव्यापी अस्तित्वात असलेला पक्ष म्हणून आजही काँग्रेसकडेच पाहिले जात आहे. ती प्रतिमा जपण्यासाठी काँग्रेसने पुनरूज्जीवनासाठी कंबर कसली पाहिजे.

## लोकशाहीसाठी काँग्रेसचे अस्तित्व हवेच

कोणत्याही लोकशाही व्यवस्थेत सत्ताधारी आणि विरोधी पक्ष दोन्हीही बळकट असणे लोकशाहीच्या परिपक्वतेसाठी, तिच्या अस्तित्वासाठी अत्यावश्यक असते. या अर्थाने काँग्रेसचे अस्तित्व ही देशाच्या लोकशाहीची गरज आहे. प्रश्न केवळ काँग्रेसच्या अस्तित्वाचा नाही, तर लोकशाहीच्या संवर्धनाचा आहे. म्हणूनच या सगळ्या राजकीय घडामोडींकडे सजगतेने आणि सतर्कतेने पाहणे आवश्यक आहे.

## काँग्रेसने काय केले पाहिजे ?

सध्या काँग्रेसचा चेहरा हरवला असून केंद्रीय नेतृत्व अस्तित्वहीन झाले आहे. राज्य नेतृत्वातही मनभेद आणि मतभेद वाढले आहेत. काँग्रेसमध्ये कधीही केंद्रीय नेतृत्वाला आव्हान मिळाले नव्हते, पंजाबच्या निमित्ताने ते घडले. यातून कमकुवत केंद्रीय नेतृत्व असे चित्र निर्माण होऊ लागले आहे. पक्षात एकजिनसीपणा, एक नेतृत्व या धारणा क्षीण होत असल्याने पक्षबांधणीला आव्हान मिळत आहे. पक्षांतर्गत लोकशाही, विचारांचे आदानप्रदान, भूमिका मांडण्याची मोकळीकता, अवकाश कमी होत आहे. पक्षांतर्गत निवडणुका न घेतल्याने पक्षात संघटनात्मक विस्कळीतपणा आलेला आहे. या बाबी पक्षाचं अस्तित्व धोक्यात आणणाऱ्या आहेत. यातून पक्षाला गतवैभव मिळवून देण्यासाठी काळाची गरज म्हणून समर्थ आणि काळाची पावलं ओळखणारं नेतृत्व दिलं पाहिजे. पक्षात तरूणांचा घटलेला ओघ कन्हैय्याकुमार, जिग्नेश मेवानी यांच्या रूपाने पुन्हा सुरू झाल्याचे दाखवून देण्यासाठी तरूणांना आकर्षित केले पाहिजे. यासाठी केंद्रीय आणि राज्य नेतृत्वाने व्यापक संपर्क अभियान राबविले पाहिजे. पक्षाला अनुभवी, बदलत्या काळाची पावले ओळखणारे सल्लागार, व्यूहरचनाकार यांच्यापासून ते निधीच्या कमतरतेवर मात करण्यासाठी पक्षातील गुणी, नैपुण्यसंपन्नांची फळी निर्माण करण्यासाठी पावले उचलली पाहिजेत. २०२२ मध्ये उत्तर प्रदेश, उत्तराखंड, गुजरात, पंजाब या राज्यांतील निवडणुका लक्षात घेऊन त्यात पूर्ण ताकदीनिशी, एकदिलाने उतरून पक्षाच्या अस्तित्वाची चुणूक दाखवून दिली पाहिजे.



# बहुआयामी व्यक्तिमत्व योगिराज वाघमारे

पंडित कांबळे

व्यक्तिविशेष

**शासकीय सेवेत आपल्या कार्याचा ठसा उमटवत असतानाच सामाजिक आणि सांस्कृतिक क्षेत्रात योगदान देत समाजाशी नाळ कायम ठेवलेले योगिराज वाघमारे हे साहित्याच्या क्षेत्रातील एक मोठे नाव आहे. सेवानिवृत्तीनंतरचे आयुष्य ते साहित्य निमिर्तीबरोबरच अनेकविध सामाजिक उपक्रमांमध्ये व्यतीत करीत आहेत.**

१ ऑक्टोबर १९४३ रोजी येरमाळा (ता. कळंब, जि. उस्मानाबाद) येथे जन्मलेल्या योगिराज देवराव वाघमारे यांचे १० वीपर्यंतचे शिक्षण येरमाळा येथे आणि पदवी व पदव्युत्तर पदवीचे शिक्षण औरंगाबाद येथे झाले. १९६९ साली अंबाजोगाई येथील शासकीय अध्यापक महाविद्यालयातून बीएड पूर्ण केल्यानंतर ते माध्यमिक शिक्षक म्हणून नोकरीस लागले. त्यानंतर शिरसाव येथील जि.प. प्रशालेचे ते मुख्याध्यापक बनले. नंतर कळंबच्या जि.प. कन्या प्रशालेचीही जबाबदारी त्यांनी सांभाळली. केवळ शिक्षक पदावरच समाधान न मानता आणखी पुढे उडी घेण्याचं धाडस त्यांनी केलं. मुख्याध्यापक पदाची जबाबदारी सांभाळत असतानाच महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षेची तयारी त्यांनी सुरू केली. यात त्यांना १९८३ साली यश आले. त्यांची पहिली नियुक्ती उस्मानाबाद जिल्हा परिषदेमध्ये उपशिक्षणाधिकारीपदी झाली. त्यानंतर सोलापूर जिल्हा परिषदेतही त्यांनी याच पदावर कर्तव्य बजावले. पुढे सोलापुरातच प्रौढ शिक्षण संस्थेचे प्रकल्प अधिकारी म्हणून त्यांनी काम केले. या पदाला योग्य तो न्याय देणाऱ्या त्यांच्या कामाचं वरिष्ठांकडून कौतुक झालं. पुढे ते तुळजापूरच्या जि.प. प्रशालेचे मुख्याध्यापक (वर्ग-२) झाले. त्यानंतर पदोन्नती मिळून ते परभणी येथे जिल्हा शिक्षण-प्रशिक्षण संस्थेच्या प्राचार्यपदी नेमले गेले. तेथून शिक्षणाधिकारी-प्रौढ शिक्षण बीड; प्राध्यापक-महाराष्ट्र राज्य आंग्लभाषा प्रशिक्षण संस्था औरंगाबाद; प्राथमिक शिक्षणाधिकारी-उस्मानाबाद जिल्हा परिषद; प्रौढ शिक्षणाधिकारी अहमदनगर अशी विविध पदे त्यांनी भूषवली. सोलापुरातून जिल्हा शिक्षण-प्रशिक्षण संस्थेच्या प्राचार्य पदावरून ते १ ऑक्टोबर २००१ रोजी सेवानिवृत्त झाले.

शासकीय सेवेत आपल्या कर्तव्याची चुणूक दाखवत असतानाच योगिराज वाघमारे यांनी साहित्यिक क्षेत्रासाठी मोठं योगदान दिलं आहे. त्यांनी बालसाहित्यासह कादंबरी आणि कथालेखनही विपुल प्रमाणात केलं आहे. बौद्ध संस्कृतीशी नातं सांगणाऱ्या श्रामणेर, पिंपळपान, रमाई या ग्रंथसंपदेसह तुकाराम आणि त्यांचे मित्र, हमीद आणि इतर गोष्टी, घुसमट अशी बालसाहित्यसंपदा त्यांच्या नावावर आहे.

योगिराज वाघमारे हे उत्कृष्ट कथालेखक म्हणूनही मराठी साहित्यात नावाजलेले आहेत. उद्रेक, बेगड, गुडदाणी, होरपळ, बहिष्कार, नियत, निर्णय हे त्यांचे ७ कथासंग्रह प्रसिद्ध आहेत. अतिशय मार्मिक आशयाच्या त्यांच्या कथा मनाची पकड घेणाऱ्या आहेत. त्यांच्या कथांमधून वस्तुनिष्ठ घटनांचे आकलन दिसून येते. समाजात घडणाऱ्या घटना, विकृती, समस्या यावर त्यांची कथा संयत विद्रोह करते. वाघमारे यांचा कादंबरी क्षेत्रातही वावर आहे. सभापती, शिक्षणनामा, धुराळा, पडझड, भीमयुग, आधार, आक्रंदण, शाळेचे दिवस, गहिवर, झळया, रातांधळे आणि दत्तू मास्तर अशा १२ कादंबऱ्या त्यांनी लिहिल्या आहेत. त्यांनी आपल्या कादंबऱ्यांमधून राजकीय आणि सामाजिक विषय हाताळले आहेत. राजकीय कार्यकर्ते, त्यांचे राजकीय आणि सामाजिक जीवन, जगताना आलेले अनुभव, जाणवलेले दाहक जीवन याचे सूक्ष्म निरीक्षण करून त्यांनी कादंबऱ्यांमधून व्यक्त केले आहे. त्यांच्या काही कादंबऱ्या स्वःकथन मांडणाऱ्या आहेत. यामध्ये 'मिलिंदचे दिवस' या मिलिंद महाविद्यालयातील आठवणींवर आधारित स्वः कथनाचा समावेश आहे. अन्य स्वःकथनांमध्ये त्यांनी आपल्या आयुष्यातील काही घटनांचीही नोंद घेतली आहे. त्यांच्या अनेक कथा विविध विद्यापीठांच्या आणि शालेय अभ्यासक्रमात समाविष्ट

आहेत. त्यांच्या कथांवर लघुपट निघाले असून सह्याद्री दूरदर्शन वाहिनीवरून त्यांचे प्रसारण झालेले आहे. त्यांच्या आक्रंदण व पडघड या कादंबऱ्यांचा हिंदी अनुवाद प्रसिद्ध झाला असून त्यांच्या अनेक कथांचे इंग्रजी, बंगाली, तेलुगू भाषांमध्येही अनुवाद झालेले आहेत. काही कादंबऱ्या विद्यापीठीय अभ्यासक्रमात समाविष्ट झालेल्या आहेत. प्रा.डॉ. मारूती शिंदे यांनी त्यांच्या निवडक कथांचा हिंदी अनुवाद करून 'योगिराज वाघमारे की कालजयी कहानियाँ' या शीर्षकाचा ग्रंथ प्रकाशित केलेला आहे.

वाघमारे यांनी इतर अनेक समाजघटकांप्रमाणे नवसाक्षर प्रौढांसाठीही लिखाण केले. त्यांनी लिहिलेल्या 'आभाळमाया' कथासंग्रहाचे खूप कौतुक झाले. बाराव व पाच एकांकिका हा एकांकिकासंग्रह नुकताच प्रकाशित झाला आहे. दरम्यान, वस्ती एक भेट आणि सप्रेम जयभीम या कादंबऱ्या, चौरंग, लक्षवेध हे कथासंग्रह तर एक होती चिमणी हा बालकथासंग्रह प्रसिद्धीच्या मार्गावर आहे.

अनेक पुस्तकांना लिहिल्या प्रस्तावना : योगिराज वाघमारे यांनी अनेक ग्रंथांसाठी प्रस्तावना लिहिल्या आहेत. त्यातील ३४ प्रस्तावना एकत्रित करून पंडित कांबळे आणि जयराज खुणे यांनी 'साहित्यिक प्रवृत्तीः मूल्ये आणि जाणिवा' हा ग्रंथ साकारला आहे.

अनेक ग्रंथांचं संपादन : योगिराज वाघमारे यांनी स्वलिखित ग्रंथांबरोबरच अनेक पुस्तकांचं संपादनही केलं आहे. यामध्ये धम्मक्रांती, सोलापुरी कथा आणि संस्कार पुष्पमाला (भाग १ ते ३) या पुस्तकांचा समावेश आहे. संस्कार पुष्पमाला-भाग एकमध्ये वेगवेगळ्या लेखकांच्या कथांचं संकलन असून भाग दुसरा जिल्हा परिषद शिक्षकांच्या 'आई' या विषयावरील कवितांचं संपादन आहे. पुष्पमालेचा तिसरा भाग हा बडबड गीतांचा आहे. उस्मानाबाद, बीड, लातूर आणि सोलापूर जिल्ह्यांमधील रिपब्लिकन चळवळीतील कार्यकर्त्यांच्या योगदानावर आधारित 'बाबासाहेबांचे शिलेदार' या ग्रंथाचं संपादनही योगिराज वाघमारे यांनी केलं आहे. लढा आयुष्याशी हे गंगुबाई ऐदाळे यांच्या चरित्राचे शब्दांकनही त्यांनी केलं आहे.

वाघमारे यांच्या साहित्यावर ग्रंथनिर्मिती : वाघमारे यांचा वाचकवर्ग प्रामुख्याने ग्रामीण भागात आहे. त्यामुळे त्यांच्या साहित्यावरही ग्रंथनिर्मिती झालेली आहे. डॉ. बाळासाहेब शेळके यांनी 'योगिराज वाघमारे यांच्या निवडक कथा' हे पुस्तक संपादित केले आहे. शिवाय 'सम्यक लेखक योगिराज वाघमारे' तसेच 'योगिराज वाघमारे : सहवास व आठवणी' ही दोन पुस्तकं प्रा.डॉ. सारिपुत्र तुपेरे यांनी संपादित केली आहेत. तर शोध अस्मितेचा या ग्रंथाचं संपादन प्रा.डॉ. सतेज दणाणे यांनी केलं आहे.

निवृत्तीनंतरही सक्रिय : शासकीय सेवेत असताना योगिराज वाघमारे यांनी ज्याप्रमाणे साहित्यिक आणि सांस्कृतिक क्षेत्रात योगदान दिलं, त्याचप्रमाणे सेवानिवृत्तीनंतरही ते सामाजिक क्षेत्रात कार्यरत आहेत. उपवर मुला-मुलींना अनुरूप स्थळं मिळावीत म्हणून ते वधू-वर सूचक मंडळाचं काम करीत आहेत. विशेष म्हणजे, बेरोजगारीचं आयुष्य जगणाऱ्या तरूणांना नोकरीविषयक मार्गदर्शनाद्वारे दिलासा देण्याचं काम ते करीत आहेत. उस्मानाबाद जिल्ह्यात साहित्यिक चळवळ रुजवण्याचं श्रेय योगिराज वाघमारे यांनाच जाते.

●●●

## साहित्यावर पीएचडी

योगिराज वाघमारे यांचं साहित्य प्रामुख्याने ग्रामीण जीवन अधोरेखित करणारे असून त्यावर आतापर्यंत पाच प्राध्यापकांनी डॉक्टरेट (पीएचडी) मिळवलेली आहे, तर दोघांनी एमफील केली आहे. त्यांच्या अनेक कथा महाराष्ट्राबाहेरीलही राज्यांमध्ये शिकवल्या जात आहेत, हे विशेष होय.





# उत्तुंग व्यक्तिमत्त्वाचा लालित्यपूर्ण आलेख: भावलेली माणसं

**(ग्रंथ परिचय)**



प्रा. डॉ. शंकर विभुते

**मनुष्य हा समाजशील प्राणी आहे. तो समाजाशिवाय एकटा राहू शकत नाही. समाजात राहत असताना वेगवेगळी माणसे त्याच्या आयुष्यात येतात, ती सर्वच त्याला आनंद देणारी असतात, असे नाही. पण त्या संघर्षातही जीवन जगण्याची एक महत्त्वाकांक्षा आणि ऊर्मी दडलेली असते. कुठल्याच प्रकारचा संघर्ष किंवा स्पर्धा नसेल तर ते जगणेही बऱ्याचदा निरस होऊन जातं. एका मोठ्या लेखकाला कुणीतरी फार सुरेख प्रश्न विचारला होता. 'सर्वसाधारणपणे आपल्या पत्नीपेक्षा आपली मैत्रीण किंवा आपल्या पतीपेक्षा आपला मित्र आपली समस्या व्यवस्थित समजून घेतो असे का वाटते' याचे उत्तर त्यांनी फार मार्मिकपणाने दिले होते. ते म्हणाले, 'त्याचं कारण म्हणजे मैत्रीण किंवा मित्र त्या समस्येशी संबंधित नसतात. फक्त समजून घेणे एवढेच काम असते.' याचा अर्थ संबंध आला की संघर्ष येतो. अशी संबंध आलेली माणसं आपल्या जीवनाचा एक अविभाज्य भाग बनतात. त्या सर्वच व्यक्तींचा किंवा त्यांच्या स्वभावाचा आलेख प्रत्येकालाच शब्दरूप करता येतो असे नाही. पण एखादा मोठा कलावंत किंवा लेखक त्याच्या आयुष्यात आलेली माणसं विशेषतः त्याला 'भावलेली माणसं' ती त्याच्या प्रतिभेतून लालित्यमय पद्धतीने वाचकांसमोर उभे करतात. मराठीतील सुप्रसिद्ध साहित्यिक डॉ. वासुदेव मुलाटे यांनी लिहिलेले व नुकतेच प्रकाशित झालेले 'भावलेली माणसं' हा ग्रंथ या पद्धतीने व्यक्त झालेला आहे. अर्थात, ही माणसं कुटुंबातील, नात्यातील किंवा दररोज भेटणारी नाहीत, तर ती त्यांच्या कर्तृत्वाने खूप उंची गाठलेली आहेत. अशा काही मोजक्या व्यक्तींचा आलेख प्रस्तुत ग्रंथ वाचकांच्या समोर उभे करतो.**

डॉ. वासुदेव मुलाटे मराठी साहित्यविश्वाला नवीन नाहीत. कविता, कथा, कादंबरी, व्यक्तिचित्रे, ललित गद्य, एकांकिका व समीक्षा अशा विविध लेखन प्रकारातून विपुल लेखन करून वाचकांच्या मनात त्यांनी घर केले आहे. विशेषतः 'विषवृक्षाच्या मुळ्या' ही कादंबरी तर आजही पुन्हा पुन्हा वाचाविशी वाटते. नुकतंच त्यांचं 'झाकोळलेल्या वाटा' हे आत्मकथनही खूप लोकप्रिय ठरलं होतं. ते वयाची पंच्याहत्तरी ओलांडत असतानाही आपल्या लेखनात सातत्य ठेवतात हे नवोदित लेखकांनी त्यांच्यापासून प्रेरणा घेण्यासारखं आहे. त्यांनी मांडलेली ही व्यक्तिचित्रे त्यांच्या खाजगी आयुष्यात त्यांना केलेली मदत किंवा त्यांच्या खाजगी आयुष्यातील प्रसंग या बाबींना अधोरेखित करीत नाहीत, तर ही व्यक्ती कशी उंच होती याची ओळख त्यांनी मांडलेल्या अचूक शब्दलेखातून वाचकांच्या लक्षात येते. एखाद्या व्यक्तिची उंची मोजण्यासाठी अनेक परिमाणे असतात. त्यातील एक महत्त्वाचं परिमाण म्हणजे त्या व्यक्तिविषयी आजूबाजूला वावरणारी माणसं काय लिहितात? काय निरीक्षण नोंदवतात व त्यांचं काय वेगळेपण टिपतात, यातही बऱ्याचदा दडलेलं असतं.

पुण्याच्या स्वरूप प्रकाशनने प्रकाशित केलेला हा ग्रंथ दोनशे पृष्टांचा असून यामध्ये त्यांना भावलेल्या तेरा व्यक्तिरेखांचा आलेख मांडलेला आहे. यामध्ये डॉ. जनार्दन वाघमारे, डॉ. गंगाधर पानतावणे, डॉ.द.भि. कुलकर्णी, साहित्यिक मनोहर तल्हार, पंडित नाथराव नेरळकर, लोकनेते केशवराव धोंडगे... अशा वेगवेगळ्या क्षेत्रातील व्यक्तिंचा परिचय वाचकांसमोर ठेवलेला आहे. या सर्व व्यक्तिरेखा त्या-त्या क्षेत्रात खूप नावाजलेल्या आहेत. अशा व्यक्तिरेखांचा परिचय देताना, त्यांचा जन्म, त्यांचे बालपण अशी चरित्रवजा माहिती लेखक देत नाहीत, तर त्यांच्या कार्यकर्तृत्वाचा, जीवनविषयक दृष्टिकोनाचा, त्यांनी केलेल्या कार्याचा एक आगळावेगळा भाग या निमित्ताने लेखक आपल्यासमोर ठेवतात. विशेष म्हणजे, या ग्रंथाचे वेगळेपण असे, की त्यांनी हा ग्रंथ त्यांच्या विद्यार्थीमित्रांना अर्पण केलेला आहे. डॉ. शंकर विभुते, डॉ. शैलेश त्रिभुवन, डॉ. शिवाजी हुसे, डॉ. रामकिशन दहीफळे आणि प्रा. श्रावण गिरी या विद्यार्थीमित्रांना अर्पण केलेला हा ग्रंथ नक्कीच त्यांच्या मनाचा मोठेपणा दर्शवितो.

या ग्रंथाविषयी मांडलेली भूमिका अतिशय महत्वपूर्ण आहे. ते आपल्या मनोगतात म्हणतात, ''ही आहेत मला ज्यांच्याविषयी नेहमीच पूज्यभाव, आदर आणि स्नेह जाणवत आला अशी काही माणसं. माणूस जगात एकटाच येतो आणि एकटाच जातो असं म्हणतात ते खरंच आहे; परंतु माणूस या जगात येण्यापासून ते

त्याने या जगाचा निरोप घेईपर्यंतच्या काळात तो एकटा नसतो हे सत्यही नाकारता येणार नाही.'' यातून आपल्या सभोवतालची माणसं आपल्या जगण्यात किती महत्त्वपूर्ण असतात याचे मर्मही वाचकांच्या मनात नकळत ठासून जाते. लेखकाच्या आयुष्यात आलेली ही माणसं का भावली, याचा शोध घेताना वाचकांच्या लक्षात येते, की ते त्यांचं खाजगी आयुष्य किंवा त्याने केलेली मदत हे सांगत बसत नाहीत. तर ती माणसं सर्वांसाठीच कशी महत्त्वपूर्ण होती किंवा सर्वांनाच ती महत्त्वाची का वाटतात, याचा अंदाज त्यांच्या लेखातून येतो. लेखाच्या प्रारंभी स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे पहिले कुलगुरू, लातूरचे जनतेतून निवडून आलेले पहिले नगराध्यक्ष व माजी खासदार डॉ. जनार्दन वाघमारे यांच्याविषयी लिहिताना त्यांनी एका कार्यक्रमप्रसंगी मांडलेली भूमिका आपल्यासमोर ठेवतात. डॉ. जनार्दन वाघमारे आपल्या अमृतमहोत्सवानिमित्तच्या कार्यक्रमात म्हणाले होते, माझ्या जीवनात तीन उत्कट आसक्ती आहेत. ज्ञानार्जन, दु:खितांविषयीची अनुकंपा आणि समाजपरिवर्तन. समाज परिवर्तनाशिवाय सामान्य माणसाला न्याय मिळत नाही. प्रत्येक माणसाला स्वाभिमानाने जगता आले पाहिजे. माणसाला माणूस म्हणून प्रतिष्ठा मिळायला हवी. त्याचा धर्म, त्याची जात, त्याचे जन्मस्थान, लिंग, भाषा, रंग अशा कोणत्याही गोष्टीचा अडथळा त्याच्या मार्गात येता कामा नये. हे मनोगत वाचकासमोर ठेऊन लेखक म्हणतात, त्यांच्या कार्याचे, जीवनदृष्टीचे, एकूण व्यक्तिमत्त्वाचे सार या त्यांच्या विधानात साठवलेले आहे. त्यावरून वाचकांना लक्षात येतं, ही माणसं लेखकालाच नाही तर कुणालाही का भावतात? याचं प्रतिबिंब या निरीक्षणातून दिसून येते. जागतिक मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष होऊन गेलेले आणि मराठी साहित्यात 'अस्मितादर्श' या नियतकालिकाने एक महत्त्वाची मौलिक भर टाकलेले डॉ. गंगाधर पानतावणे सर्वांना परिचित आहेत. अर्थात, आज ते आपल्यात नसले तरी त्यांचे लेखन, त्यांचे विचार आजही लोकांच्या मनात घर करून आहे. उपेक्षित लेखकांना लिहिण्यासाठी एक स्वत:चं व्यासपीठ तयार करून देण्याचं काम डॉ. गंगाधर पानतावणे सरांनी आपल्या अस्मितादर्श या नियतकालिकातून अनेक वर्षे केले. त्या नियतकालिकाने मराठी साहित्याला खूप मोठे लेखक दिले. आज मराठी साहित्यात नावाजलेल्या खूप मोठ्या लेखकांनी आपल्या लेखनाची सुरुवात या नियतकालिकातून केलेली आहे. उपेक्षित, दलित समाजातील अनुभव मांडण्यासाठी हे नियतकालिक फार महत्त्वपूर्ण होते. यांच्याविषयी लिहिताना लेखक म्हणतात, माझ्या लक्षात आले, की दलित साहित्याची सैद्धांतिक मांडणी सुरुवातीच्या काळात ज्या महनीय व्यक्ती करीत होत्या त्यात पानतावणे सर आघाडीवर होते. बोलताना किंवा चर्चा करताना त्यांच्या विचारात कडवेपणा




जाणवत नसे. दलितांच्या वाट्याला आलेले क्लेशदायी जीवन हे धार्मिक आणि वर्णव्यवस्था असून आलेले आहेत त्यामुळे त्यांचा संघर्ष कोणा व्यक्तीच्या विरुद्धचा नाही. तो आहे त्याला कारणीभूत ठरणाऱ्या प्रवृत्तीविरुद्ध, हे या मांडणीतून पानतावणे सर आपल्या समोर उभे राहतात. विद्रोह, नकार, बंड ही दलित साहित्याची लक्षणे जरी असली तरी त्यात आक्रोशपणा किंवा कडवेपणा न येता सम्यक पद्धतीने मानवतावादी विचारसरणी मांडण्याचे महत्त्वाचे काम पानतावणे सर करीत होते.

मराठी साहित्यातील सुप्रसिद्ध समीक्षक डॉ. द. भि. कुलकर्णी यांचा लेखात आलेला अनुभव तर मुळातून वाचण्यासारखा आहे. आपल्या मृत्यूच्या दोन दिवस अगोदर लेखकासोबत साहित्याविषयी त्यांनी केलेली चर्चा आजही वाचकांना अंतर्मुख करुन सोडते. त्यांचा आपलेपणा, त्यांचं प्रेम, जिव्हाळा आणि समीक्षालेखन करण्याचा वेगळेपण हा लेख वाचकांच्या लक्षात आणून देतो. पंडित नाथराव नेरळकर हे संगीतातील एक फार मोठं नाव. त्यांच्याविषयी लिहिताना लेखक म्हणतात, नाथरावांना जेवढी संगीताची आवड आहे तेवढीच माणसांची आवड आहे. त्यांचा मित्रपरिवार त्यामुळे विशाल आहे. त्यांना मैत्रीसाठी जात-पात, प्रतिष्ठा, सामाजिक-आर्थिक स्तर, वय काहीही आडवे येत नाही. गाणे इतकाच गोष्टीवेल्हाळपणा आणि निरीच्छ प्रेम यामुळे त्यांच्याभोवती सतत माणसांचा गराडा असतो. मला तर ते जगद्मित्रच वाटतात. यातूनच त्यांच्याविषयी लेखकाचे असलेले प्रेम आणि त्यांचा स्वभाव सहज लक्षात येतो. कुठल्याही कार्यक्रमाला गेल्यानंतर मानधनाची फारशी पर्वा न करणारे; परंतु आपल्या सदाबहार संगीताने रसिकांची मनं जिंकणारे असे व्यक्तिमत्व आपणास हवेहवेसे वाटते. त्यांच्याविषयी अनेक प्रसंग लेखकांनी या लेखात नोंदविलेले आहेत. थोडक्यात, उत्तुंग व्यक्तिमत्त्व असलेली आणि आपल्या जगण्यातून समाजासमोर एक आदर्श समोर ठेवलेली यातील व्यक्तिरेखा म्हणजे जणू काही छोटेखानी चरित्रग्रंथच आहे. एकाच ग्रंथात वेगवेगळ्या माणसांचा आलेख वाचकांना वाचायला मिळतो ही या ग्रंथाची मोठी उपलब्धी आहे. अर्थात, अशा महान व्यक्तिमत्त्वाचा आलेख मांडताना लेखकाला लेखनाच्या काही मर्यादाही पडलेल्या आहेत. कारण त्यांच्याविषयी आलेले सर्वच अनुभव नोंदवणे शक्य नसल्याने काही ठळक पण महत्त्वपूर्ण समाजाला दिशादर्शक आणि वाचकाला प्रेरणा ठरणारे हे लेख आहेत, हे मात्र निश्चितच खरे आहे. •••


**(लेखक विचारवंत आणि साहित्यिक आहेत)**


# मांजरे(कर) यांचा गोडसे कोणतं सत्य सांगणार?



हिंदुत्वाच्या महाकथेत अनेक नायक, महानायक आहेत. व्यवस्थेत जे खलनायक, खूननायक असतात ते या महाकथेत आले, की त्यांचे पद-प्रतिष्ठा, चाल-चलन बदलते किंवा जाणीवपूर्वक बदलली जाते. न्यायालयाने ज्याला खुनी, हत्यारा असल्याचे सिद्ध केले आणि फासावर लटकवण्यास सांगितले तो नथुराम गोडसे हिंदुत्ववाद्यांचा नायक बनला, हुतात्मा बनला. महान धर्म आणि हिंदूराष्ट्राचा योद्धा बनवला गेला. राष्ट्रपित्याची हत्या करणाऱ्याचे पुतळे उभारण्याचा प्रयत्न झाला. त्याच्यावर कविता आल्या, त्याचं चारित्र्य आलं. त्याला महान राष्ट्रभक्त बनवण्यासाठी आणखी काही काही गोष्टी सातत्यानं आल्या. हिंदुत्ववाद्यांच्या अनेक शाळांमध्ये त्याची जयंती झाली. अजून काही दिवसांत त्याचं एखाद्या राष्ट्रमुद्रेत रुपांतर झालं तर आश्चर्य वाटायला नको, अशी परिस्थिती आपल्याभोवती आहे. या परिस्थितीला जो प्रश्न विचारण्याचा प्रयत्न करेल त्यालाच कदाचित राष्ट्रद्रोही ठरवले जाईल. जसे की म. गांधींची प्रतिमा राष्ट्रद्रोह्याप्रमाणे, एखाद्या गुन्हेगाराप्रमाणे तयार केली जात आहे. 'ज्याच्या हाती ससा, तोच पारधी' या न्यायाने जे सत्ता संपादन करतात ते आपल्या म्हणजे स्वतःच्या इतिहासाचे पुनर्लेखन करतात, त्यांना पुनर्जीवनही देतात. जसं की, राजस्थान उच्च न्यायालयाच्या आवारात जातसंहिता लिहिणाऱ्या मनुचा पुतळा उभा आहे. अनेकांनी त्याविरूद्ध आवाज उठवला. मनू म्हणजे विषमतेचं प्रतीक असं न्यायालयाला वाटलं. काहींनी पुतळ्याला रंग फासण्याचा प्रयत्नही केला; पण तरीही १९८९ पासून मनुचा पुतळा उभा आहे. मनू म्हणजे राष्ट्रनिर्माता, समाजनिर्माता वगैरे, वगैरे. नेमकं तसंच गोडसेचं होतंय. राष्ट्रपित्याचा खून, हत्या केल्याबद्दल न्यायालयानं त्याला शिक्षा दिली असली तरी हिंदुत्ववादी मात्र त्याला मरणोत्तर महान बनवण्याचा प्रयत्न करत असतात. आता त्यात महेश मांजरेकर हा चित्रपट निर्माताही सहभागी झालाय. तो गोडसेवर सिनेमा काढणार आहे. बापूच्या जन्मदिनी म्हणजे २ ऑक्टोबरला त्यानं ही घोषणा केलीय. विशेष म्हणजे, 'गोडसे'कडून बापूजींना वाढदिवसाच्या शुभेच्छा इंग्रजीत दिल्या गेल्या आहेत. अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या नावाखाली मांजरेकरला कोणी विरोधही करणार नाही. 'गोडसे' चित्रपटाच्या माध्यमातून कुणाला न गवसलेलं सत्य सांगण्याचा प्रयत्न मांजरेकर करणार आहे. भारताबाहेर कोणत्याही देशात आपले कारभारी गेले, की ते मोठ्या स्वाभिमानानं सांगतात, की मी बुद्धाच्या आणि बापूजींच्या देशातून आलोय. प्रत्यक्षात आपल्या देशात बापूजींचं नेमकं काय घडत आहे, हे मात्र सांगत नाहीत. दोन ऑक्टोबरला सोशल मिडियावरून हिंदुत्ववादाचा जयजयकार करणाऱ्या असंख्य लोकांनी गोडसेचं अभिनंदन केलं. कारण त्यानं बापूजींची हत्या केली होती.

ज्यांचं आडनाव मांजरावरून पडलेलं असतं, ते नेहमीच अशा काही तरी सनसनाटी गोष्टीच्या शोधात असतात. गोडसे अनेक वर्षे माझ्या हृदयात राहिला आहे, हेही मांजरेकरानं सांगून टाकलं हे बरंच केलं. त्यावरून त्याची वृत्ती, विकृती लक्षात आली. आतापर्यंत आतापर्यंत लोक त्याच्याकडे डोळेझाक करून बघत होते. आता बरंच झालं, की लोकांचे डोळे उघडले जातील आणि काही काही मांजरे डोळे उघडे करून दूध पितात, हेही लक्षात येईल. बापूजी म्हणजे हिंदू राष्ट्रनिर्मितीमधील एक अडथळा, धर्मात सुधारणा करण्याचा आग्रह धरणारा खलनायक अशी त्यांची प्रतिमा हिंदुत्ववाद्यांनी तयार केली आहे. हीच प्रतिमा आता पडद्यावर येईल. मांजरेकराच्या मते, तो गोडसेविषयी काही वेगळं सांगणार आहे. आता हे वेगळं काय असतं हेही साऱ्यांना ठाऊक आहे. इतिहासात मीठ टाकणारी ही मंडळी चरित्र्यहननाचा आणखी एक प्रयत्न करणार आणि तोही अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या नावाखाली.





# ‘किंग’चा दिवटा बनला रुपेरी-चंदेरी व्हिलन



भारतीय चित्रपटसृष्टीत किंग खान म्हणून ओळखल्या जाणाऱ्या शाहरूख खानच्या दिवट्याला म्हणजे पोरगा आर्यनला अंमली पदार्थ सेवन केल्याच्या आरोपाखाली अटक झाली आहे. खरं तर, या अशा बातम्या आता नित्याच्याच झाल्या आहेत. रेव्ह पार्टी नित्याचीच झाली आहे. देशी पिणाऱ्यांची जास्त चर्चा होते; पण या मोठ्या माणसाच्या रेव्ह पार्टीची चर्चा तेवढी होत नाही. पार्टीत पकडलेल्यांचे काय होते, हेही कुणाला कळत नाही. कानून के हात लंबे असतात तसेच या बड्या मंडळींचे हातही लंबेच असतात. त्यांच्याकडे मोजता येणार नाही एवढा पैसा असतो. उदंड लोकप्रियता असते. ते रोडमॉडेल असतात. स्वाभाविकच आपल्या नायकाला त्याच्या गुण-अवगुणांसह चाहते स्वीकारत असतात. आर्यनचं काय होणार याविषयी समाजाला काही वाटणार नाही. रेव्ह पार्टीत त्यानं जायचं नाही, तर मग काय बीपीएलवाल्या किंवा फुकटात थाळी खाणाऱ्यातं जायचं का, असा प्रश्न विचारायलाही चाहते कमी करणार नाहीत.

आर्यन प्रकरणात सर्वप्रथम पोलिसांना धन्यवाद द्यावे लागतील. कशाचीही तमा न बाळगता बिघडलेल्या दिवट्याला त्यांनी अटक केली. अशा बातम्या खूपच दुर्मीळ झाल्या आहेत. तर हा आर्यन एका बोटीवर रेव्ह पार्टीत सापडतो. त्याच्याबरोबर चंदेरी दुनियेतील आणि बापकमाईवर मस्ती करणाऱ्या दुनियेतील अनेकजण सापडले आहेत. हे सारे अंमली पदार्थ सेवन करून बेधुंद होऊन नाचणं, स्वतःला विसरून जाणं, बीभत्स, अश्लील वर्तन करणं, कानाचे पडदेच शिल्लक राहणार नाहीत अशा मोठ्या आवाजातील संगीत ऐकणं, आपण कुठे आलो आहोत हे विसरून जाणं याला रेव्ह पार्टी म्हणतात. लाखो, कोट्यवधीत फी असते. मोजक्या, निवडक, मोठ्या घरातील पोरांनाच तेथे प्रवेश असतो. अपना टाइम आयेगा किंवा अपना टाइम जायेगा, यही है जिंदगी असं काही तरी सूत्र पकडून मोठ्यांची पोरं झिंगत असतात. झिंगण्यालाच ते चालणं समजतात. आपण कितीही झिंगलो तरी आपले पालक आपल्याला कायद्याच्या कचाट्यातून सोडवायला समर्थ असतात, याची त्यांना खात्री असते. बापाचं ओळखपत्र ते वापरत असतात. छोट्यांना शिक्षा करण्याऐवजी त्यांना सुधारण्याची संधी दिली पाहिजे. त्यांनी एक झाड तोडलं तर त्यांच्याकडून दहा झाडं लावून घेतली पाहिजेत. त्यांनी एक हरिण मारलं तर त्यांना दहा हरणांना सांभाळण्याचं काम दिलं पाहिजे, असे मानवतावादी विचार पुढे येतात. त्या आणणाऱ्या काही व्यावसायिक, पण सामाजिक संस्था असतात. राजालाच शिक्षा दिली, त्यालाच तुरूंगात टाकलं तर जनतेचं काय होईल? बापाचं नाव वापरून ज्यानं हजारो फॅन म्हणजे चाहते मिळवले, त्या चाहत्यांचं काय होईल आणि विशेष म्हणजे किंगच्या उच्च कुळाचं काय होईल, असे किती तरी प्रश्न निर्माण होतात. आर्यन याचाच अर्थ उच्च कुळातला, बाहेरून आलेला, अनेक भाषा बोलणारा असा होतो. आर्यनचं कुळ खरोखरचं उच्च आहे. आई गौरी आणि बाप शाहरूख. अर्थात, आर्यनच्या कृत्याबद्दल पालकांना दोष द्यायचा की नाही हे पालकनीतिची खरेदी-विक्री करणाऱ्यांनाच कळतं. पंक्चरवाल्याला ते कसं कळणार? झगमगाटात जगणाऱ्यांचं चंगळवादी जीवन नेहमीच कौतुकाचा विषय ठरतं. त्यांची प्रत्येक कृती कौतुकाची ठरते. कोणत्या नटीचं चुंबन कोणी किती अंशावर राहून घेतलं, यावरही चर्चा होत असते. अभावग्रस्त जनता दुसरं करणार तरी काय?

अंमली पदार्थाच्या नादी लागलेल्या, बिघडलेल्या आणि सुधारलेल्याही दिवट्यांची परंपरा चंदेरी दुनियेत आहे. महान अभिनेते सुनील दत्तचा मुलगा संजय दत्त, फिरोज खानचा मुलगा फरदीन खान, राज बब्बरचा मुलगा प्रतीक, प्रसिद्ध नेते प्रमोद महाजन यांचा दिवटा राहुल, सैफची पोरगी सारा अली, श्रद्धा कपूर, सुशांत सिंग राजपूत अशी लांबलचक यादी देता येईल. संजय दत्तवरील संजू चित्रपटात तर हे सारं स्पष्ट दाखवलं आहे. माझा किती महिलांशी संबंध आला-नाही हेही त्यात अगतिक होऊन कबूल करतो, संजू चित्रपट हिट होतो. आता बोला? आता पुन्हा एकदा ‘शिक्षा नको, मदत करा’ हा मंत्र मानवतावादी आळवत राहतील. भूकेपोटी भाकरीची चोरी करणाऱ्याला गुन्हेगार ठरवलं जातं, तेव्हा हा मंत्र कुठं गेलेला असतो?

बापानं खूप मोठं नाव कमावलं. बाप जगातला चौथा मोठा श्रीमंत कलाकार झाला. जाहिरातीत काम करताना रोज तो एक कोटी रुपये चित्रणासाठी घेतो. बापानं नाव कमावलं, पैसा कमावला, इज्जत कमावली. पोरानं त्याला कात्री लावली. थोडं मागं जा. जेव्हा या लाडक्या दिवट्याचा म्हणजे आर्यनचा जन्म झाला होता, त्यानंतर म्हणजे १९९७ च्या दरम्यान सिमी गरेवालच्या एका कार्यक्रमात हा किंग शाहरूख म्हणाला होता, की मी ज्या गोष्टी माझ्या तरूणपणी करू शकलो नाही, त्या माझ्या मुलानं आर्यननं त्याच्या तरूणपणी कराव्यात. म्हणजे त्यानं मुलींना डेट करावं, ड्रग आणि सेक्सचा अनुभव घ्यावा. अनेक मुलींना त्यानं त्रास द्यावा. त्यांच्या आई-वडिलांनी तक्रारी घेऊन माझ्याकडं यावं... एका किंग बापानं आपल्या दिवट्याविषयी हे स्वप्न बघितलं होतं. अर्थात, किंगनं हे विनोदानं सांगितलं होतं. आर्यननं मात्र ते वास्तवात आणलं. असा कसा आज्ञाधारक मुलगा?

# वेताळ बनतोय ईडी भाजपसाठी देतोय शिडी...



आर्थिक गुन्हे शोधून काढण्यासाठी तयार करण्यात आलेला 'ईडी' असा अचानक जागा होईल, भाजपच्या विरोधकांनी लावलेल्या झाडावर वेताळासारखं चढून बसेल. झाडाखालून येणाऱ्या-जाणाऱ्या लाल दिव्यांच्या गाड्यांकडे आणि त्यात तीन पायानं बसलेल्या सत्ताधाऱ्यांकडे पाळत ठेऊन तीक्ष्ण नजरेनं बघत राहील, असं कुणाला वाटलं नव्हतं. खुद्द 'ईडी'लाही आणि त्यांना वेसण घालणाऱ्या कारभाऱ्यांनाही वाटलं होतं. अशा व्यवस्था कारभारी तयार करतात आणि बहुतेकवेळा आपल्या हितासाठी आणि आपल्या विरोधकांचा काटा काढण्यासाठी वापरत असतात. स्वाभाविकच त्यांना म्हणजे ईडीबीडीला कधी विश्वासार्हता लाभत नाही. प्रत्यक्षात मात्र अनेकांना म्हणजे कारभाऱ्यांच्या विरोधकांना घुसमट सहन करावी लागते. गेल्या सात-आठ वर्षात हा ईडी बाटलीतून बाहेर पडला. कुणाच्या दारात जायचं यासाठी त्याला पासवर्ड आणि गुगल साहेबांनी तयार केलेला मॅप देण्यात आला, त्याच्यासाठी रिमोट तयार करण्यात आला. बटण कुणा कारभाऱ्याच्या हातात आलं. ईडी या बटणाच्या हालचाली लक्षात घेऊन स्वतः हालचाली करू लागला. दिल्लीतल्या भल्या मोठ्या विरोधकापासून त्याचा प्रवास सुरू झाला. अनेक वर्षे रुजलेली कथित पाळेमुळे तो खोदू लागला. कधी आजीबाईंनी पुरून ठेवलेला हंडा हाताला लागला, कधी वडिलोपार्जित म्हणून सांगितली जाणारी संपत्ती हाताला लागली. कधी बेनामी संपत्ती हाताला लागली.



आता हे सारं सारं अद्याप कागदावर आहे. तोपर्यंत अनेकांचे चेहरे कलंकित करण्यात आले. जे शहाणे होते आणि सावध होते, ते कारभाऱ्याच्या वळचणीला गेले. तेथे कारभाऱ्यांच्या खास लॅबमध्ये तयार करण्यात आलेलं तीर्थ, डिटर्जंट पावडर वापरून त्यांना शुद्ध करण्यात आलं. टेस्टेड आणि ॲक्सेप्टेड असा शिक्का त्यांच्या आधारकार्डावर मारण्यात आला. अनेकांनी असं कार्ड मिळवलं. ईडी त्यांच्या दारातून मागं परतला. मग त्याच्यासाठी आणखी वगेळा मॅप देण्यात आला. तो घेऊन तो पुन्हा फिरू लागला.

काळा पैसा खोदून-खोदून काढणार असं आश्वासनं कारभाऱ्यानं मुद्दाम रुंद केलेली छाती बडवून दिलं होतं. या वयात छाती एवढी रुंद कशी असते, हेही भल्याभल्यांना न समजलेलं, उमजलेलं एक कोडंच आहे. तर कारभाऱ्याला एक काळी पै सापडली नाही. हजाराच्या नोटा बंद करूनही हे शक्य झालं नाही. आता कारभाऱ्यांच्या विरोधात असलेल्यांचं वस्त्रहरण करण्याचा प्रयोग सुरू झाला. कोटीच्या कोटी उड्डाणे सांगितली जाऊ लागली. लोक उत्सुकतेनं ऐकतात. दुसरी भागनड आली की पहिली विसरतात. भ्रष्टाचार निपटून काढायला विरोध कोणाचाच नाही. भ्रष्टाचाराचा सर्वात मोठा फटका सामान्य माणसाला आणि शेवटी देशालाच बसत असतो. तो निपटून काढण्यासाठी सर्वप्रथम लोकांनी जागं व्हायला पाहिजे. पण लोक जागे होत नाहीत आणि कारभारी भ्रष्टाचाराचं पेटंट फक्त आपल्या विरोधकाकडे आहे असंच समजून वागतात. सत्ताधाऱ्यातले असंख्य लोक श्रीमंत कसे काय झाले? त्यांची उड्डाणे कोटींच्या घरात कशी गेली. सत्तेचा स्पर्श होण्यापूर्वी कोण सामान्य होतं, कोण शेतकरी होतं, कोण मजूर होतं, कोण सोशिक होतं. पण सत्तेचा स्पर्श होताच ते कसे काय श्रीमंत झाले. त्यांच्यापण संस्था आहेत, कारखाने आहेत, खाजगीत हेलिकॉप्टर आहेत. फाटक्या-तुटक्या माणसाला दिसणाऱ्या गोष्टी ईडीला आणि त्याचा रिमोट बाळगणाऱ्यांना कशा दिसत नाहीत किंवा त्या पहायचंच नाही असं ठरवलं गेलं आहे, याचा उलगडा काही होत नाही. हा उलगडा झाला पाहिजे, म्हणजे एकूणच भ्रष्टाचाराचं सडकं स्वरूप लोकांसमोर येईल. पण ते करण्यासाठी एक क्षमता, एक नैतिक शक्ती लागते. ती कुणी कुणाला अजून मनिऑर्डर पाठवून देत नाही. सत्ताधारी नेहमी शुद्ध आणि स्वच्छच असतो, या सिद्धांतानुसारच सारं काही चाललंय...

●●●

# कविता



## दीक्षाभूमी

दीक्षाभूमीच्या उजेड प्रांगणी
माणसांच्या समुद्रात वाहू दे
आसमंतात निनादणाऱ्या
जयभीमच्या घोषात दुदंभून जाऊ दे
आजी लावते तिथली माती नम्रपणे
कपाळी
तिच्या श्रद्धेचं सत्त्व स्पर्शून जाऊ दे
विषमतेच्या युगाचा काळ होऊ दे
फुंकून टाकीन सगळा अंधार
जाळ होऊ दे
घेऊ दे सर्वांनाच कवेत
आभाळ होऊ दे
पुस्तकांच्या गर्दीतूनच गवसेल
वाट क्रांतीच्या मुक्कामाची
अक्षरांच्या दाटीवाटीत
मला डोळे ठेवू दे !

**– प्रा. राजेंद्र गोणारकर**

## कविता काय असते?

वसंत शृंगार
वेदनांची कपार
प्रतिभेची किनार
असते कविता

सृजनाचा कोंब
काठोकाठ तुडुंब
हृदयीचा आगडोंब
असते कविता

अस्तित्वाची जाण
चाहुलीची कमान
गरिमाचे भान
असते कविता

धगधगती आग
अस्वस्थाचा माग
पहाटेची जाग
असते कविता

सोसाट्याचा वारा
ओथंबत्या जलधारा
भोवऱ्यात किनारा
असत कविता

आतुनी कीर्तन
सत्याचे दर्शन
नित्यनूतन
असते कविता

कडवी जहाल
स्फुरणाची मिसाल
क्रांतीची मशाल
असते कविता

बदलाचा मंत्र
गजराचे तंत्र
अत्र – तत्र सर्वत्र
असते कविता

वेगवान धार
दुधारी तलवार
शत्रूवर वार
असते कविता

आक्रोशाचा एल्गार
वेदनांचा झंकार
जीवनाचे सार
असते कविता

**– प्रा. शिवाजी वाठोरे**

# कोण काय बोलतं



**तृणमूल काँग्रेसमध्ये प्रवेश करताना काँग्रेस परिवार एकत्र आणणे आणि भाजपचा पराभव करणे हे माझे मुख्य ध्येय आहे**
**– लुईझिनो फालेरिओ** (माजी काँग्रेस नेते आणि गोव्याचे माजी मुख्यमंत्री)



**देशाचे पंतप्रधानच भारतीयांमधील नाती तोडत असतील, तर हा नात्यांचा पूल पुन्हा बांधणे हे माझे कर्तव्य आणि बांधिलकी आहे**
**– खासदार राहुल गांधी** (काँग्रेस नेते)



**नोकरीच्या बाजारपेठेत मागणी आणि पुरवठा यामध्ये खूप मोठी तफावत आहे. ती दूर करत बेरोजगारीला तोंड देण्यासाठी सॉफ्ट स्किल आवश्यक आहे**
**– डॉ. बिंदू अरोरा**
(सेंटर पॉइंट स्किल्सच्या सीईओ)



**प्रमोद महाजन यांच्या हत्येची घटना दुर्दैवीच होती. दोघा भावांमधला तो विषय होता. त्याची माहिती मला अजूनही नाही**
**– सारंगी महाजन** (प्रमोद महाजन हत्या प्रकरणातील आरोपी प्रवीण महाजन यांच्या पत्नी)



**मोदी सरकारने केलेल्या तीन कृषी कायद्यांच्या विरोधात दहा वर्षे ही आंदोलन करण्यास आम्ही तयार आहोत. सरकारचा अहंकार टिकतो, की अन्नदात्याचा निर्धार, हे जगाला दिसेलच**
**– राकेश टिकैत** (शेतकरी नेते)




**कोरोना संसर्गस्थितीने जगभरातील अन्याय आणि असमानता उघडकीस आणली असून याचा फटका दुर्लक्षित घटकांमधील बालकांना बसला आहे**
**– कैलास सत्यार्थी** (नोबेल पारितोषिक विजेते सामाजिक कार्यकर्ते)



**पुढील दोन विश्वचषक स्पर्धांसाठी रोहित शर्मा भारतीय संघाचा कर्णधार असावा. या स्पर्धा लागोपाठ असल्यामुळे कर्णधार बदलणे परवडणारे नाही**
**– सुनील गावस्कर** (भारतीय क्रिकेट संघाचा माजी कर्णधार)



**बॉक्सिंगमुळे गरिबीतून बाहेर पडण्याचा मार्ग मला मिळाला. आता राष्ट्रपतीच्या निवडणुकीसाठी बॉक्सिंगमधून संन्यास घेतला. हा जीवनातील सर्वात कठीण निर्णय आहे.**
**– मॅनी पॅकियाओ**
(फिलिपाईन्सचे नामवंत बॉक्सर)



**भौगोलिक परिस्थिती नेहमी बदलत असते. त्यामुळे सिंधू नदी पुनश्च भारताचा भाग असेल**
**– भगतसिंह कोशारी**
(महाराष्ट्राचे राज्यपाल)



**अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना भरपाई दिली नाही, तर विमा अधिकाऱ्यांना जेलमध्ये पाठवू**
**– विजय वडेट्टीवार** (महाराष्ट्राचे मदत आणि पुनर्वसन मंत्री)

# दिवाळी अंक लवकरच...

पाक्षिक

समाज आणि राष्ट्राच्या नवरचनेसाठी

## द पीपल्स पोस्ट



**पहिलाच दिवाळी अंक मोठ्या दिमाखात प्रसिद्ध होत आहे**

**नोव्हेंबरच्या पहिल्या आठवड्यात**

किंमत - ५० रुपये.



**अस्वस्थ वर्तमानाच्या पोटात दडलेल्या अनेक घटना–घडामोडींचा वेध घेणारा आणि मानवी जीवनातल्या सर्व पैलूंवर प्रकाश टाकणारा अंक.**

### या अंकाचे मानकरी

डॉ. रावसाहेब कसबे (मुलाखत), प्रो. सुखदेव थोरात, डॉ. माया पंडित, दत्ता देसाई, प्रा. प्रकाश पवार, भगवान माने, बी.जी.वाघ, हरी नरके, विजय नाईक, देविदास तुळजापूरकर, प्रसाद कुलकर्णी, सुरेंद्र जोंधळे, भास्कर नाशिककर, यशवंत मनोहर, नागनाथ कोत्तापल्ले, जयदेव डोळे, मुक्ता मनोहर, भालचंद्र कांगो.